उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८५ ■ अंक : २१३ ■ नाशिक, शुक्रवार, दि. २६ एप्रिल २०२४ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा



व्यावसायिकाचे दीड लाख लुटले../८



उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ ../८

## महत्त्वाचे

### हेमंत सोरेन यांची सर्वोच्च न्यायालयात धाव

**नवी दिल्ली :** आर्थिक गैरव्यवहारात प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) केलेल्या अटकेविरुद्ध आव्हान देणाऱ्या त्यांच्या याचिकेवर उच्च न्यायालय निर्णय देत नाही, असे झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी बुधवारी सर्वोच्च न्यायालयात सांगितले. सोरेन यांची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठाला सांगितले की, सोरेन यांच्या याचिकेवर उच्च न्यायालयाने २८ फेब्रुवारी रोजी निकाल राखून ठेवला होता, परंतु अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. सिब्बल म्हणाले की, सोरेन यांनी २ फेब्रुवारी रोजी त्यांच्या अटकेविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती, परंतु खंडपीठाने त्यांना दिलासा मिळवण्यासाठी उच्च न्यायालयात जाण्यास सांगितले.

### संजय दत्त, तमन्ना भाटिया यांना नोटीस

**मुंबई :** अभिनेता संजय दत्त आणि



दाक्षिणात्य अभिनेत्री तमन्ना भाटिया आयपीएल सामन्यांच्या बेकायदेशीर स्ट्रीमिंग प्रकरणी वादात अडकली आहे. या प्रकरणी महाराष्ट्र सायबर शाखेने त्यांना चौकशीसाठी समन्स बजावल्याचे समजते. बॉलिवूड आणि दाक्षिणात्य अभिनेत्री तमन्ना भाटियाने आजवर अनेक भूमिका साकारून एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. बाहुबलीसारख्या प्रचंड गाजलेल्या सिनेमात ती मुख्य भूमिकेत दिसली होती. तिचा चाहतावर्गही मोठा आहे. मात्र, सध्या तमन्ना एका अडचणीत सापडली आहे. महाराष्ट्र सायबर सेलकडून तिला समन्स बजावण्यात आलं आहे. २०२३ चं आयपीएल 'फेअरप्ले'वर प्रसारित केल्याप्रकरणी तिच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. त्यासाठी तिला २९ एप्रिलला चौकशीला हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### मोईत्रांना दिलासा! मानहानीचा खटला मागे

**नवी दिल्ली :** वकील जय अनंत देहाद्राई यांनी तृणमूल काँग्रेसच्या नेत्या महुआ मोईत्रा यांच्याविरोधातील मानहानीचा खटला मागे घेतला आहे. 'लाइव्ह लॉ'ने दिलेल्या बातमीनुसार, वकील जय अनंत देहाद्राई यांनी दिल्ली हायकोर्टामध्ये यासंदर्भात अर्ज करत मानहानीचा खटला मागे घेत असल्याचं कळवलं आहे. देहाद्राई यांनी महुआ मोईत्रा यांच्याविरोधात मानहानी खटला दाखल केला होता. महुआ मोईत्रा यांनी सोशल मीडियावर काही पोस्ट केल्या होत्या. त्यामध्ये देहाद्राई यांच्या खासगी आणि व्यावसायिक कामाबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप आहे. त्यानंतर देहाद्राई यांनी महुआ मोईत्रा यांच्याविरोधात दिल्ली हायकोर्टात २ कोटी रुपयांचा मानहानीचा खटला दाखल केला होता.

### सिसोदिया यांच्या कोठडीत ७ मेपर्यंत वाढ

**नवी दिल्ली :** मद्यधोरण गैरव्यवहार प्रकरणातील आरोपी आणि आम आदमी पक्षाचे (आप) नेते मनीष सिसोदिया यांच्या कोठडीत राऊज अव्हेन्यू न्यायालयाने सात मेपर्यंत वाढ केली आहे. याच प्रकरणात आरोप असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल तसेच भारत राष्ट्र समितीच्या(बीआरएस) नेत्या के. कविता यांची कोठडी अलीकडेच न्यायालयाने वाढवली होती. केंद्रीय अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) दाखल करावयाच्या दोषारोपपत्राच्या अनुषंगाने न्यायालयात स्वतंत्र सुनावणी झाली. यावेळी एक तक्ता बनवून सिसोदिया यांच्याविरोधातील पुरावे द्यावेत, असे निर्देश न्यायालयाने दिले. मद्यधोरण गैरव्यवहार प्रकरणी सीबीआयने गतवर्षीच्या फेब्रुवारी महिन्यात सिसोदिया यांना अटक केली होती. त्यानंतर सक्तवसुली संचालनालयाकडून (ईडी) नऊ मार्च २०२३ रोजी सिसोदिया यांना अटक झाली होती.

# दुसऱ्या टप्प्यासाठी आज मतदान

## राज्यातील आठ तर देशभरातील 88 जागांचा 'फैसला'

**मुंबई : प्रतिनिधी**


**लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात १३ राज्यांतील ८८ मतदारसंघांत मतदान होणार आहे. या टप्प्यात उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातील प्रत्येकी ८ जागांसाठी आणि बिहारमधील ५ जागांसाठी मतदान होणार आहे. केरळमधील सर्व २०, कर्नाटकातील १४, राजस्थानमधील १३, मध्य प्रदेशातील ६, आसाममधील ५, पश्चिम बंगाल आणि छत्तीसगडमधील प्रत्येकी ३, मणिपूर, त्रिपुरा आणि जम्मू-काश्मीरच्या केंद्रशासित प्रदेशातील प्रत्येकी १ जागेवर दुसऱ्या टप्प्यात मतदान होत आहे. या टप्प्यात काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधींपासून ते लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यापर्यंत अनेक दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. दुसऱ्या टप्प्यात ज्या ८८ जागांसाठी मतदान होणार आहे, त्यापैकी काही जागा काही विशेष राजकीय घडामोडींमुळे चर्चेत आहेत, तर काही बड्या नेत्यांनी निवडणूक लढविल्यामुळे या जागांवर हायव्होल्टेज अशी लढत आहे. यामुळे दुसऱ्या टप्प्यासाठी आता प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात येत आहे.**



या लोकसभा मतदारसंघांत मतदान होणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची अमरावतीत, तर काँग्रेस नेते राहुल गांधी यांची परतवाडा व सोलापूरमध्ये सभा पार पडली आहे.

**राज्यातील या आठ जागांवर मतदान**





**बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशीम, हिंगोली, नांदेड आणि परभणी**

### नाशिक, दिंडोरीसाठी आजपासून अर्ज विक्री

**नाशिक : प्रतिनिधी** नाशिक आणि दिंडोरी लोकसभा मतदारसंघासाठी आजपासून अर्ज विक्री आणि स्वीकृतीला प्रारंभ झाला आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय सज्ज झाले आहे. नाशिक लोकसभा मतदारसंघात सध्या फक्त महाविकास आघाडीचे उमेदवार राजाभाऊ वाजे आणि वंचितचे करण गायकर यांचीच उमेदवारी जाहीर झालेली आहे. तर दिंडोरीत भाजपाच्या डॉ. भारती पवार आणि महाविकास आघाडीचे भास्कर भगरे यांची उमेदवारी जाहीर झालेली आहे. वंचितने येथे उमेदवार बदलला आहे. अर्ज दाखल करण्याचा आजचा पहिलाच दिवस उजाडला असला तरी अजून नाशिकमध्ये महायुतीच्या उमेदवारीचा घोळ कायम आहे.

## वर्षा गायकवाड यांना मुंबई उत्तर मध्यची उमेदवारी



**मुंबई :**

लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीने आणखी एक उमेदवाराच्या नावाची घोषणा केली आहे. लोकसभा निवडणूक २०२४ साठी काँग्रेसने वर्षा गायकवाड यांना मुंबई उत्तर मध्य मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे. महाविकास आघाडीने उत्तर मध्य मुंबई मतदारसंघ काँग्रेससाठी सोडला होता. काँग्रेसने आता या जागेवर वर्षा गायकवाड यांना लोकसभेची उमेदवारी दिली आहे. /-...५

**हाय व्होल्टेज लढती**

**आऊटर मणिपूर-** हिंसाचारामुळे चर्चेत असलेल्या मणिपूरच्या आऊटर मणिपूर जागेसाठी दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

**वायनाड-** राहुल गांधी केरळच्या वायनाडमधून निवडणूक लढवत आहेत. या जागेवरून डाव्यांनी नी राजा यांना, तर भाजपने के. सुरेंद्रन यांना उमेदवारी दिली आहे.

**कोटा-** लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला भाजपच्या तिकिटावर कोटा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. ओम बिर्ला यांच्यासमोर भाजपला राम राम ठोकून काँग्रेस पक्षात दाखल झालेल्या प्रल्हाद गुंजाळ यांना काँग्रेसने तिकीट दिले आहे.

**मेरठ-** अरुण गोविल उत्तर प्रदेशातील मेरठमधून उमेदवारी केल्यामुळे चर्चेत आहेत. भाजपने रामायण मालिकेतील राम पात्र साकारणारे अरुण गोविल यांना मेरठमधून उमेदवारी दिली आहे.

**पूर्णिया-** पप्पू यादव बिहारच्या पूर्णिया मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहेत. पप्पू यादव हे काँग्रेसकडून तिकिटासाठी उमेदवार होते, पण राजदने या जागेवरून आपला उमेदवार उभा केला.

**खजुराहो-** मध्य प्रदेश भाजपचे अध्यक्ष व्ही. डी. शर्मा खजुराहो मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात आहेत, परंतु ही जागा इंडिया आघाडीचे उमेदवाराने अर्ज नाकारल्यामुळे चर्चेत राहिली आहे.

**बंगळुरू ग्रामीण-** बंगळुरू ग्रामीण मतदारसंघातून माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचे जावई सी. एन. मंजुनाथ यांच्या उमेदवारीची चर्चा आहे. उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांचे भाऊ डी. के. सुरेश यांच्याविरोधात भाजपने सी. एन. मंजुनाथ यांना तिकीट दिले आहे.




## गॅस पाचशेला, शेतीवरील जीएसटी रद्द

### राष्ट्रवादी काँग्रेसचा जाहीरनामा

**मुंबई : प्रतिनिधी**

इंडिया आघाडीची सत्ता आल्यास स्वयंपाकाचा गॅस पाचशे रुपयांना तर शेतीवरील जीएसटी पूर्णपणे रद्द करण्याचे वचन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने आपल्या जाहीरनाम्यात दिले आहे. काल पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला.

जाहीरनामा प्रकाशित करताना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार तसेच प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील उपस्थित होते. या जाहीरनाम्यात समाजाचे विविध प्रश्न समोर ठेवून अनेक लोकप्रिय घोषणा करण्यात आल्या आहेत. जाहीरनामा प्रकाशित करताना जयंत पाटील म्हणाले, सर्वसामान्यांना न्याय देण्याच्या दृष्टिकोनातून विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. स्वयंपाक गॅसच्या किमती ५०० रुपयांपर्यंत आणण्याचा प्रयत्न करणार असून, यासाठी सबसिडी देण्यात येणार आहेत. तसेच पेट्रोल-डिझेलचे दर मर्यादित करण्यासाठी प्रयत्न करणार, असं /-...५



## शेतकऱ्यांना कर्जमुक्त करणार ठाकरे गटाचा वचननामा

**मुंबई :**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने काल जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे. या जाहीरनाम्याला ठाकरे गटाच्या वतीने वचननामा असे म्हटले आहे. उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत या जाहीरनाम्याची घोषणा केली. या जाहीरनाम्यात विविध मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. यामध्ये शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याच्या आश्वासनासह केंद्र सरकारकडून होणाऱ्या अन्यायापासून मुक्ती देण्याचे आश्वासन यावेळी उद्धव ठाकरे यांनी दिले आहे.

याबरोबरच महाराष्ट्रामध्ये उद्योग आणण्यासाठी प्राधान्य देणार, तसेच महाराष्ट्रातून बाहेर जात असलेले प्रकल्प /-...५

## मोदींसह राहुल गांधींनाही निवडणूक आयोगाची नोटीस

**सोमवारपर्यंत उत्तरे द्यावी लागणार**

**नवी दिल्ली :**

देशात सर्वत्र लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी पाहायला मिळत आहे. या लोकसभा निवडणुकीदरम्यान सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वी काँग्रेसच्या जाहीरनाम्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी टीका केली होती. त्यावरून राहुल गांधी यांनी टीका केली. काँग्रेसने मोदींच्या टीकेतील वक्तव्याविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार नोंदवली. त्यानंतर भाजपनेही राहुल गांधी यांच्याविरोधात आयोगाकडे तक्रार नोंदवली. या सर्व राजकीय घडामोडींवरून आता केंद्रीय निवडणूक आयोगाने दोन्ही नेत्यांना नोटीस /-...५



## रक्षा खडसे, स्मिता वाघ यांचा अर्ज दाखल

### जळगावात महायुतीकडून शक्तिप्रदर्शन

**जळगाव :**

रावेर लोकसभा मतदारसंघात भाजपकडून पुन्हा एकदा रक्षा खडसे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. तसेच जळगाव लोकसभा मतदारसंघात भाजपकडून स्मिता वाघ यांनी उमेदवारी देण्यात आली आहे. काल रक्षा खडसे आणि स्मिता वाघ यांनी जळगावात मोठं शक्तिदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.



जळगाव जिल्ह्यातील रावेर लोकसभेसाठी रक्षा खडसे तर जळगाव लोकसभेसाठी स्मिता वाघ यांनी सकाळीच आपापले नामनिर्देशनपत्र जिल्हाधिकारी कार्यालयात गिरीश महाजन, आमदार मंगेश चव्हाण, आमदार सुरेश भोळे, आमदार संजय सावकारे, जिल्हाध्यक्ष अमोल जावडे, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर जळकेकर महाराज, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नामदार अनिल भाईदास पाटील, उमेश नेमाडे या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत भरले. यानंतर रक्षा खडसे आणि स्मिता वाघ यांच्या प्रचारार्थ जळगावात जाहीर सभा पार पडली.

**गर्दी बघून विरोधकांना धक्का बसला असेल : खडसे**

जाहीर सभेत रक्षा खडसे म्हणाल्या की, आजची गर्दी बघून विरोधकांना धक्का बसला असेल हे नक्की. कारण एवढ्या उन्हात आपण सर्वांनी मला आणि स्मितातार्ईंना आशीर्वाद देण्यासाठी आला आहात. समोरचे आज कितीही मुद्दे घेऊन सांगत असतील की, दहा वर्षांत आम्ही काही केलं नाही./-...५

## मविआचे इंजिन एकाच जागेवर ठप्प पडून


### देवेंद्र फडणवीसांनी डागली तोफ

**जळगाव :**

इंडिया आघाडीच्या इंजिनमध्ये फक्त त्यांच्या परिवारासाठी जागा आहे. सामान्य माणसासाठी नाही. यांच्यासाठी यांचा परिवार दुनिया आहे, पण पंतप्रधान मोदींसाठी संपूर्ण देश त्यांचा परिवार आहे आणि त्या परिवारासाठी ते काम करतात, असं म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इंडिया आघाडीवर निशाणा साधला आहे.

कडाक्याच्या उन्हात तुम्ही समर्थन देण्यासाठी आले आहात, दोन्ही उमेदवार पाच लाख मतांनी निवडून येतील, असा विश्वास फडणवीसांनी व्यक्त केला आहे. विरोधक ही निवडणूक ग्रामपंचायत निवडणूक असल्यासारखे वागत आहे. हा देश कोणाच्या हातात द्यायचा, त्याची ही निवडणूक आहे. राहुल गांधी यांच्या नेतृत्वात २६ पक्षांची खिचडी आहे. आपल्याकडे मोदींच्या इंजिनवर चालणारी पॉवरफुल गाडी आहे, सबका साथ सबका विकास धोरण ठेवून काम केले जात आहे, असं फडणवीसांनी सांगितलं.

इंजिनमध्ये केवळ चालक बसतो. शरद पवार यांच्याकडे सुप्रिया सुळे यांना जागा आहे. उद्धव ठाकरे /-...५



**प्रत्येक जण स्वत:ला इंजिन समजतोय**

इंडिया आघाडी २६ पक्षांची खिचडी आहे. आपल्या महायुतीच्या गाडीचं मोदीजी हे पावरफुल इंजिन आहेत. आपल्या इंजिनाला सर्वपक्षाच्या बोग्या लागल्या आहेत, ज्यामध्ये सर्व समाजाचे लोक आहेत. इंडिया आघाडीमध्ये प्रत्येक जण स्वत:ला इंजिन समजत आहे. सगळेच इंजिन स्वत:ला समजत आहेत. इंडिया आघाडीत बोग्याचं नाहीत. प्रत्येक जण स्वत:ला इंजिन समजतोय. राहुल गांधी म्हणतात मी इंजिन, शरद पवार म्हणतात मी इंजिन, उद्धव ठाकरे म्हणतात मी इंजिन, स्टॅलिन म्हणतात मी इंजिन, ममता बॅनर्जी म्हणतात मी इंजिन, लालूप्रसाद यादव म्हणतात मी इंजिन. तिथे इंजिनच आहेत. बोगीच नाहीत. इंजिनमध्ये सामान्य माणसाला बसायला जागा नसते, फक्त चालक बसतो.

### आमदार अपात्रता प्रकरण सुनावणी लांबणीवर

**नवी दिल्ली :**

शिवसेना फुटीचे पडसाद लोकसभा निवडणुकीतही दिसत आहे. शिवसेना फुटीनंतर राज्यातील काही लोकसभा मतदारसंघात ठाकरे गट आणि शिंदे गट आमने उभे ठाकले आहेत. अशातच दुसरीकडे शिवसेना आमदार अपात्र प्रकरण कोर्टात सुरू आहे. याच प्रकरणात राहुल नार्वेकरांनी दिलेल्या निर्णयाविरोधातील याचिकेवरील सुनावणी पुढे ढकलली आहे. यामुळे या प्रकरणी सुनावणी १४ मे रोजी होण्याची शक्यता आहे.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी दिलेल्या निर्णयाविरोधात ठाकरे गटाने कोर्टात धाव घेतली होती. त्यानंतर कोर्टाने शिंदे गटाच्या आमदारांना नोटीस पाठवली होती. याच प्रकरणावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या निर्णयाविरोधीत ठाकरे गटाच्या याचिकेवरील कालची सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे.



**जळगाव : छत्रपती संभाजीनगर येथे महायुतीचे उमेदवार संदीपान भुमरे यांच्या प्रचार रॅलीत सहभागी झालेले कार्यकर्ते.**

## महत्त्वाचे

### पंचवटी, म्हसरूळमधून दोन दुचाकी पळवल्या

**नाशिक : प्रतिनिधी**

पंचवटी, म्हसरूळ परिसरातून दोन दुचाकी चोरीला गेल्या. आकाश हरी म्हस्के (रा. पेठरोड, पंचवटी) यांची ३० हजारांची दुचाकी (एमएच १५ एफडब्ल्यू ७३७५) मंगळवारी (ता. २३) पहाटे साडेचार ते दुपारी एक वाजेदरम्यान अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी पंचवटी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### तांबे मळ्यातून गाडा नेला

**नाशिक :** म्हसरूळ हद्दीतील तांबे मळ्यातून २९ हजारांचा गाडा अज्ञात चोरट्याने चोरून नेला. रतन भीमाशंकर तांबे (रा. तांबे मळा, शांतीनगर) यांचा गाडा बुधवारी (ता. २४) तांबे मळ्यातून पहाटे तीन ते सहा या दरम्यान अज्ञात चोरट्याने चोरून नेला. याप्रकरणी म्हसरुळ पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### सराईत गुन्हेगाराला शिवाजीनगरला अटक

**नाशिक :** गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेल्या सराईत गुन्हेगाराला गंगापूर पोलिसांनी शिवाजीनगर परिसरातून अटक केली. अक्षय संजय जगताप (३०, रा. अमोलकुंज रोहाऊस, शिवाजीनगर) असे संशयिताचे नाव असून, त्यास शहर-जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आलेले आहे. गंगापूर पोलिसांना अक्षयची खबर मिळताच बुधवारी (ता.२४) अटक केली. याप्रकरणी गंगापूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### जुगार खेळताना एकास अटक

**नाशिक :** हिरावाडी रोड परिसरात आयपीएलमधील सामन्यावर सट्टा लावून जुगार खेळताना पंचवटी पोलिसांनी एकाला अटक केली. किशोर गणपत ढगे (४२, रा. ओमीशा अपार्टमेंट, दत्तनगर, पेठरोड) असे संशयिताचे नाव आहे. किशोर हा बुधवारी (ता. २४) रात्री हिरावाडी रोडवरील नंदिनी अगरबत्ती जवळच्या गाळ्याबाहेर आयपीएलमधील गुजरात विरुद्ध दिल्ली सामना सुरू होता. या सामन्यावर संशयित किशोर याने बेटींग खेळत व खेळविताना आढळून आला. पोलिसांनी त्यास अटक केली असून, त्याच्याकडून मोबाइल फोन व जुगाराचे साहित्य असा ५ हजार ५०० रुपये असा मद्देमाल जप्त केला.

### साईनगर येथे महिलेचा विनयभंग

**नाशिक :** पंचवटीतील साईनगर येथे पाणी पिण्याच्या बहाण्याने घरात आलेल्या संशयिताने महिलेचा विनयभंग केला. ईश्वर मुरलीधर सोनवणे (४०, रा. त्रिकोणी बंगला, साईनगर, पंचवटी) असे संशयिताचे नाव आहे. पीडितेच्या फिर्यादीनुसार, मंगळवारी (दि.२३) दुपारी दोन वाजेच्या सुमारास सदरचा प्रकार घडला. याप्रकरणी पंचवटी पोलिसांत विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सिटीलिंक वाहक ठेक्याच्या निविदेला आचारसंहितेचा फटका

## शासनाकडे पत्र पाठवून मागितली निविदेसाठी परवानगी

**नाशिक : प्रतिनिधी**

मागील दोन वर्षांत सिटीलिंकचा नऊ वेळा वाहकांनी संप पुकारला. मागील संप तर तब्बल नऊ दिवस सुरू होता. दरम्यान, सिटीलिंकच्या तपोवन डेपोतील दोनशे बसेसचा वाहक ठेका जुलैला संपुष्टात येत असून, त्यासाठी मनपा प्रशासनाने राबविलेली निविदा प्रक्रिया लोकसभा आचारसंहितेच्या कचाट्यात अडकली आहे. निविदा खोलण्यासाठी शासनाच्या नगरविकास विभागाला पत्र पाठवण्यात आले असून, त्यांच्या सिग्नलकडे लक्ष लागून आहे.

ठेकेदाराच्या चुकीच्या धोरणामुळे सिटीलिंक प्रशासनाला याचा फटका बसतो आहे. ठेकेदाराची ही मक्तेदारी मोडीत काढत मनपाने तपोवन व नाशिकरोड डेपो ठेक्याची विभागणी केली. या अगोदर एकाच ठेकेदाराकडे अडीचशे वाहक पुरविण्याची जबाबदारी होती.



विभागणीमुळे नाशिकरोड डेपोतील शंभर वाहकांसाठी नवीन ठेकेदार नेमण्यात आला. तर तपोवनातील डेपोतील ठेकेदार सद्यस्थितीत दोनशे वाहक पुरवत आहे. दरम्यान, हा ठेका जुलैअखेर संपुष्टात येत असून, मनपा प्रशासनाने नव्याने निविदा प्रक्रिया राबवली. चार ते पाच कंपन्यांनी निविदाही भरल्या. मात्र, लोकसभेची आचारसंहिता लागल्याने निविदा खोलता येणार नाही. त्यामुळे ही प्रक्रिया रखडली आहे.

शासनाकडे निविदा खोलण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. महापालिकेसाठी सिटीलिंक बससेवा पांढरा हत्ती पोसणे ठरत आहे. त्यात ठेकेदाराचा आडमुठेपणा व वाहकांचा संप यामुळे मनपा प्रशासन बेजार झाली आहे.

> लोकसभेची आचारसंहिता सुरू झाल्याने निविदा खोलता येणार नाही. त्यास परवानगी मिळावी यासाठी शासनाला पत्र पाठवले आहे. तपोवन डेपोतील वाहक ठेका जुलैअखेर संपुष्टात येत आहे.
>
> **- बाजीराव माळी,** यांत्रिकी विभागप्रमुख, मनपा

# वैभव देवरेच्या अडचणी वाढल्या; मालमत्तेची पोलीस करणार मोजदाद

**नाशिक : प्रतिनिधी**

खंडणीखोर वैभव देवरेच्या अडचणी वाढल्या आहेत. त्याच्यावर दाखल पाच गुन्ह्यांतील दुसऱ्या गुन्ह्यांत तो नव्याने अटक असून, पोलीस कोठडीची मुदत संपणार असल्याने शुक्रवारी (दि. २६) त्याला न्यायालयात हजर केले जाणार आहे. दरम्यान, इंदिरानगर पोलिसांनी देवरेच्या एकूण मालमत्तेचे मूल्यांकन करण्याचा निर्णय घेतला असून, त्यासाठी जिल्हा उपनिबंधकांना पत्रव्यवहार केला आहे.

कमी कर्ज असूनही जास्तीची मुद्दल सांगत पंधरा पटीने वसुली करणाऱ्या संशयित वैभव यादवराव देवरे (रा. चेतनानगर) याच्या गुन्हेगारी स्वरूपाच्या व्याजवसुलीमुळे त्रस्त पाच ते सहा कर्जदारांनी फिर्याद नोंदविल्या आहेत. त्यानुसार इंदिरानगर पोलिसांत पाच स्वतंत्र गुन्हे दाखल असून, व्यावसायिक विजय खानकरी यांना बारा लाखांची खंडणी मागितल्याप्रकरणी देवरेविरुद्ध गुन्हा नोंद आहे.

त्याच्या घरझडतीत पंधरा ते सोळा बँक खात्यांची पुस्तके, एका व्यक्तीसह हॉटेलचे पंचावन्न लाख रुपयांचे बेअरर चेक, पाच कार, एक ट्रॅक्टर व चार दुचाकी असल्याचे समोर आले. यासह सटाण्यात पाच एकरचे फार्महाउस असून, पत्नीच्या नावे तीन फ्लॅट आहेत, असे आढळून आले.

दरम्यान, (दि. १३) इंदिरानगरातील कर्जदार महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार तिने देवरेकडून तीन लाख रुपये कर्ज घेतले. प्रतिमहा दहा टक्के दराने व्याजाचे तीस हजार रुपये दिले. तरीही देवरेने तिच्या दोन कार बळजबरीने ताब्यात घेतल्या. यासह अश्लील भाषेत शिवीगाळ करून विनयभंग केला.

तर, भाजपचे तत्कालीन पदाधिकारी जगन पाटील यांनाही २० लाख रुपयांचे कर्ज देत देवरेने व्याजासह तब्बल तीन कोटी रुपये उकळत प्रॉपर्टी नावावर करून घेतली.

### तक्रारी घटल्या

देवरेविरुद्ध पहिला गुन्हा दाखल झाल्यावर इतर त्रस्त कर्जदारांनी पोलीस ठाणे गाठत तक्रारींचा पाढा वाचला. त्यानुसार मागील काही दिवसांत पाच ते सहा तक्रारदार समोर आले. त्यानंतर विविध कलमांन्वये गुन्हे नोंदविण्यात आले. मात्र, आता नव्याने देवरेविरुद्ध तक्रार आलेली नाही. तर, आता अवैध सावकारीतून देवरेने कमविलेली प्रॉपर्टी, दागिने, बंगला, महागडी वाहने, जमीन, फार्महाउसची मोजदाद सुरू झाली आहे.




# आरटीई प्रवेशाबाबत जनहित याचिका टाकण्याचा इशारा

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

राइट टू एज्युकेशन अंतर्गत याआधी सर्वच शाळांचा पर्याय खुला होता. मात्र, आता या राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने एक अन्यायकारक निर्णय घेत फक्त आणि फक्त स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्येच राइट टू एज्युकेशन अंतर्गत गरीब, वंचित घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे. यातून सर्वच खासगी शाळांना वगळण्यात आल्या आहेत. यातून या योजनेच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासण्यात आले आहे. यावर त्वरित सुधारणा न केल्यास ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्या नेतृत्वात जनहित याचिका दाखल करू, असा इशारा दीपक डोके, संस्थापक अध्यक्ष गुणरत्न अयोग्य मदत व कौशल्य विकास केंद्राचे संस्थापक अध्यक्ष तथा आरोग्यदूत दीपक डोके यांनी दिला आहे.

शिक्षण हा मुलांचा अधिकार असून, शिक्षणामुळेच देशाची भावी चांगली पिढी घडू शकते. त्यामुळे यापूर्वी शासनाने खाजगी शाळांमध्ये गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्यासाठी आरटीई अंतर्गत २५% सवलत प्रदान केली होती. यामुळे आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणे सोयीचे होते, परंतु अचानकपणे यंदाच्या वर्षापासून शासनाने आटीईच्या प्रवेशांतर्गत केवळ मनपा शाळांचा समावेश करीत खासगी शाळांमध्ये प्रवेश नाकारण्याचे धोरण तयार केले असून, ते वंचितांच्या व आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांचे हिताचे नाही. त्यामुळे यापूर्वीप्रमाणे खासगी शाळांमध्ये आटीई अंतर्गत आर्थिक दुर्बल घटकातील वंचित विद्यार्थ्यांसाठी प्रवेश मिळण्यासाठी आदेश पारित करून शिक्षण हक्काला न्याय मिळवून देण्याच्या मागणीचे निवेदन शिक्षणाधिकारी बी. टी. पाटील यांना देण्यात आले. यावेळी सुभाष मुंढे, प्रशांत खरात, प्रकाश अलाटे, सुनील कांबळे, शेखर साळवे, संजय थोरात आदी उपस्थित होते.

# निमाचे स्टार्टअप समिट उद्योजकांसाठी दिशादर्शक : शर्मा

## निमा संकुलात भरला उद्योजकांचा कुंभमेळा

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक निमातर्फे आयोजित स्टार्टअप समिट राज्यातील उद्योजकांसाठी दिशादर्शक ठरेल आणि त्याने उद्योग क्षेत्रातील नवनवीन कलाविष्कारांना प्रोत्साहन मिळेल, अशा शब्दांत जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी उपक्रमाचे कौतुक केले.

नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनतर्फे निमा संकुल परिसरात आयोजित राज्यातील पहिल्याच भव्य दिव्य आणि नावीन्यपूर्ण अशा निमा स्टार्टअप समिटचा शुभारंभ जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या हस्ते तसेच जीएसटीचे अतिरिक्त आयुक्त अजित दान, निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, सचिव निखिल पांचाळ आणि कौशल्य विकास विभागाच्या सहसंचालक अनिसा तडवी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. त्यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते.




कौशल विकास विभागाच्या सहसंचालक श्रीमती अनिसा तडवी यांनी जिल्ह्यातील स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी शासनातर्फे सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती दिली व खरंतर हे शासनाचे काम आहे परंतु निमा हे सर्व करीत आहे. त्यामुळे त्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच असल्याचेही त्यांनी नमूद केले. निमा स्टार्टअप समिटच्या माध्यमातून २५० हून अधिक स्टार्टअप आणि शंभरहून अधिक युवा व महिला उद्योजकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न असून, त्यात आम्ही निश्चितच यशस्वी झाल्याचा अभिमान वाटतो आणि राज्यातील उद्योजकांसाठी आम्ही आदर्श निर्माण करणार, असा विश्वास निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे यांनी व्यक्त केला. समिटमध्ये राज्यातील तसेच राज्याबाहेरील २००हून अधिक गुंतवणूकदारांनाही पाचारण करण्यात आले आहे. स्टार्टअप, उद्योग उभारणी, पेटंट नोंदणीची माहिती, बँका व शासनाच्या विविध योजनांची माहितीसुद्धा समिटमध्ये विविध चर्चासत्रद्वारे उपलब्ध होणार असल्याने समिटचा लाभ घेण्यासाठी उद्योजकांनी एकच गर्दी केली आहे. नवीन कलाविष्कारांचे ५० स्टॉल्सही सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. उद्घाटन सोहळ्यास उद्योग सहसंचालक लक्ष्मण शेळके, जिल्हा उद्योग केंद्राचे सहसंचालक संदीप पाटील, औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी नितीन गवळी, कार्यकारी अभियंता नितीन हरगुडे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी श्री. भड, कामगार उपायुक्त विकास माळी, निमा उपाध्यक्ष आशिष नहार, राजेंद्र अहिरे, कोषाध्यक्ष राजेंद्र वडनेरे, सहसचिव मनीष रावल, कैलास पाटील, विरल ठक्कर, नितीन आव्हाड, सतीश कोठारी, राजेंद्र कोठावदे, चंद्रशेखर सिंग, स्टार्टअप समितीचे समन्वयक श्रीकांत पाटील, आयमाचे अध्यक्ष ललित बूब, सचिव प्रमोद वाघ आदींसह सुमारे २५० हून अधिक उद्योजक व स्टार्टअप्स व महिला उद्योजिकाही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती परीक्षेत यश; पालकांनी काढली शोभायात्रा

**नाशिकरोड : वार्ताहर**

साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या चेहडी येथील एस. के. पांडे विद्यालयाच्या २६ विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक योजनेत तर ११ विद्यार्थ्यांना सारथी शिष्यवृत्ती गुणवत्तेत यश मिळाले आहे.

या विद्यार्थ्यांना इयत्ता नववी ते बारावीपर्यंत दरवर्षी १२ हजार रुपये याप्रमाणे चार वर्षांत ४८ हजार रुपये शिक्षणासाठी मिळणार आहेत. शाळेच्या प्राचार्या सुनंदा बोराडे व संस्थेचे अध्यक्ष प्रविण जोशी यांनी विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक कामगिरीचे कौतुक केले आहे. दिक्षा हिरणवाळे, आनंद आवारी, श्रद्धा ताजनपुरे, श्रावणी माळी, अखिलेश ताजनपुरे, कौस्तुभ शिंदे, तनिष्का देशमुख, जान्हवी भावसार, श्लोक गायखे, जीवन जाधव, आर्यन मुसळे, श्रावणी पाळदे, गणेश दोंड, प्रिती कबीराज, कोमल पगारे, यश गायखे, असित सोनकांबळे, संस्कृती पोरजे, ऋषीकेश टिळे, शारदा पोरजे, मयुर बोराडे, आदित्य गवई, अनुष्का पवार, वैभव शिंदे, तुषार ताजनपुरे, श्रावणी गायकवाड याशिवाय याच शाळेतील ११ विद्यार्थ्यांना सारथी शिष्यवृत्तीही गुणवत्तेच्या आधारावर प्राप्त झाली आहे. तेही इयत्ता नववी ते बारावीपर्यंत दरवर्षी ९६०० रुपयांप्रमाणे चार वर्षांत ३८,८०० रुपये शिक्षणासाठी मिळतील. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे शालेय पालक शिक्षक समितीतर्फे गौरविण्यात आले. सारथी शिष्यवृत्ती मिळविणारे विद्यार्थी असे पूर्वा शिंदे, प्रतीक सातपुते, साई गुळवे, रसिका बोराडे, प्रथमेश आहेर, विराज ताजनपुरे, साक्षी सातपुते, कृष्णा सातपुते, ईश्वरी ताजनपुरे, आदेश ताजनपुरे, साई गवांदे हे सर्व विद्यार्थी आहे. या सर्व विद्यार्थ्यांची शोभायात्रा काढण्यात आली. ठिकठिकाणी त्यांचे औक्षण करून पेढे भरविण्यात आले. मिरवणुकीत वाकचौरे सर, सौ. पाठक, श्रीमती वर्षा कुलथे, जयश्री सोनवणे, सविता कापडणीस यांनीही सहभाग घेतला.




# घराला आग लावून फरार झालेल्या संशयितास अटक

**नाशिक : प्रतिनिधी**

घराला बाहेरून आग लावत जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या संशयितास गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने पुणे येथून ताब्यात घेतले आहे. निखिल उर्फ स्वप्निल बोराडे (२३, रा. पिंपळपट्टी रोड, जेलरोड) असे पकडलेल्या संशयिताचे नाव आहे.

जेलरोड येथील पिंपळपट्टी परिसरातील रहिवासी कल्याणी मोरे यांच्या फिर्यादीनुसार, संशयित निखिल याने शुक्रवारी (दि.१९) रात्री साडेदहा ते अकराच्या सुमारास जाळपोळ केली. तक्रार केल्याचा राग मनात ठेवून निखिलने कल्याणी यांना घरात कोंडून घराच्या खिडकी, दरवाजास आग लावली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी कल्याणी यांच्या फिर्यादीनुसार, नाशिकरोड पोलिस ठाण्यात निखिलविरोधात गुन्हा दाखल आहे.

घटना घडल्यानंतर संशयित फरार होता. गुन्हे शाखा युनिट एकचे पोलिस नाईक मिलिंदसिंग परदेशी यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे संशयित निखिल पुणे येथील हिंजवडी येथे असल्याचे समजले. त्यानुसार पथकाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मधुकर कड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक उपनिरीक्षक सुगन साबरे, हवालदार महेश साळुंके, नाइक परदेशी, अंमलदार राहुल पालखेडे, चालक समाधान पवार यांचे पथके पुणे येथे गेले होते.






# सिन्नर फाटा भागात हनुमान जयंतीची ६८ वर्षांची परंपरा

**नाशिकरोड : वार्ताहर**

नाशिकरोड पूर्व भागातील रेल्वे स्थानकाशेजारील सिन्नर फाटा विष्णूनगरमध्ये पूर्वीपासून श्रमिकांची वस्ती आहे. हे सर्व गत ६८ वर्षांपासून रामनवमी ते हनुमान जयंतीपर्यंत दरवर्षी हरिनाम सप्ताहाचे आयोजन करत असतात. महाप्रसादाची रेलचेल असते. व्यापारी व मळेकऱ्यांचे त्यांना सहकार्य असते. यावर्षीही हरिनाम सप्ताह हनुमानाची शोभायात्रा काढत हनुमान जयंती साजरी करण्यात आली.

या सप्ताहात ह.भ.प. अनिता मनमाडकर, सूर्यकांत महाराज सहाणे, माधव महाराज काजळे, शिवा महाराज आडके, रेखा हांडगे, विकास महाराज गोरसे, भाऊसाहेब बोराडे, अतुल महाराज तांबे या हरिभक्त परायणांची प्रवचन व कीर्तने सात दिवस सकाळ, संध्याकाळ झाली. हनुमान मंदिरात रोज ज्ञानेश्वरी पारायण व हरिपाठही घेण्यात आले. ह.भ.प. कालिकानंद महाराजांच्या काल्याच्या कीर्तनाने हनुमान जयंतीला सांगता करण्यात आली. भव्य शोभायात्रा काढण्यात आली. यात चित्ररथात श्रीराम व हनुमान यांची वेशभूषा केलेली बालके लक्ष वेधत होती.

शोभायात्रेच्या पुढे डोक्यावर कलशधारी सुवासिनी आणि त्यापुढे भजनी मंडळ यामुळे ही शोभायात्रा परिसरात लक्षवेधी ठरली. या कार्यक्रमासाठी या भागातून दुसरीकडे राहायला गेलेले मूळचे रहिवासीही या धार्मिक कार्यक्रमात आवर्जून उपस्थित होते. तरुण महाराष्ट्र मित्र मंडळ हे या धार्मिक कार्यक्रमाचे ६८ वर्षांपासून संयोजन करत आलेले आहे. त्यात मंडळाचे अध्यक्ष किशोर चव्हाण, उपाध्यक्ष सुरेश वाजे, सेक्रेटरी संजय घुले, सहसेक्रेटरी राजेंद्र पवार, नारायण मोरे, बबनराव गवळी, सागर बारगळ, गणेश कोकाटे, संतोष शिंदे, सागर कोकाटे, दिलीप पवार, जितेंद्र वराडे, प्रशांत बारगळ, शुभम पवार, अशोक जाधव, मंगेश वराडे, तुषार डोके, महेश मोरे, सागर वराडे, रामेश्वर गायकवाड, शरद चव्हाण, संदिप गायकवाड, गणेश गायकवाड, गणेश वावधने, अनिल देसाई यांचा सहभाग होता. आठ दिवस या परिसराला यात्रेचे स्वरूप येते. मंगलमय गीतांनी परीसर दुमदुमुन जातो. श्रमिकांची श्रीराम व हनुमानावरील भक्तीचे हे प्रतीक या कष्टकऱ्यांना प्रेरणा देते.

# मीटर टेस्टिंगच्या नावाखाली ६७ लाखांची फसवणूक

## महावितरणच्या मुख्य अभियंत्यांनी दिलेले चौकशीचे आदेश धाब्यावर

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

महावितरणच्या नाशिक मंडळ विभागात गेल्या १४ वर्षांत ग्राहकांकडून मीटर टेस्टिंगच्या नावाखाली अंदाजे ३ करोड रुपये शुल्क आकरण्यात आले, परंतु मीटर टेस्टिंग मात्र करण्यात आलेली नाही. मुख्य अभियंता नाशिक मंडळ यांनी चौकशीचे २ वेळा आदेश देऊनदेखील त्यांच्यावर कार्यवाही झालेली नाही.

महावितरणच्या मध्यवर्ती सुविधा केंद्र कार्यालयात प्रतीवर्षी सरासरी १० हजार ग्राहकांकडून मीटर शुल्क तपासणीच्या नावाखाली सरासरी २८ लाख रु. शुल्क जमा केले जाते परंतु त्या वीजमीटरची तपासणी केली जात नाही, अशी तक्रार सामाजिक कार्यकर्ते दर्शन लडढा यांनी मुख्य अभियंता यांना केली होती. दि. ७ फेब्रुवारी २०२४ च्या पत्रानुसार ७ दिवसांत पडताळणी अहवाल सादर करण्याचे २ वेळा आदेश दिले असताना अधीक्षक अभियंता पडळकर यांनी मात्र पडताळणी अहवाल सादर केलेला नाही. वीज मीटरचा मालकीहक्क बदल करण्यासाठी महावितरणच्या मध्यवर्ती सुविधा केंद्र (उउत्रऊ) कार्यालयात अर्ज केल्यास महावितरण कंपनीचे सर्व्हिस शुल्क व मीटर तपासणी शुल्क असे ३६० रु. शुल्क फी जमा करावी लागते. त्यानुसार मीटर तपासणी करणे हे महावितरण अधिकाऱ्यांचे काम आहे असे असून देखील गेल्या १४ वर्षांत असे मीटर तपासणी अहवाल महावितरणकडे उपलब्ध नसल्याचा खुलासा नाशिक मंडळ प्रमुख ज्ञानदेव पडळकर यांच्या कार्यालयातून देण्यात आलेला आहे. सामाजिक कार्यकर्ते दर्शन लडढा यांनी माहिती अधिकार कायद्यानुसार १४ वर्षांच्या माहितीची मागणी अधीक्षक अभियंता कार्यालयाकडे केली होती. त्यानुसार वर्ष २०२१, २०२२, व २०२३ या ३ वर्षांसाठी २३६१८ ग्राहकांकडून ६६ लाख ८० हजार ९५० रुपये मीटर तपासणी शुल्क जमा केल्याचे महावितरण अधिकाऱ्यांनी कळवले परंतु २३६१८ ग्राहकांचे मीटर तपासणी अहवाल उपलब्ध नसल्याचे महावितरण अधिकाऱ्यांनी कळवले. दर्शन लड्ढा यांनी दिलेल्या माहितीनुसार बोटावर मोजण्याइतके ग्राहक सोडल्यास इतर ग्राहकांचे मीटर तपासणी झालेली नाही. मुख्य अभियंता मीटर तपासणी आदेशाबाबत नाशिक मंडळ प्रमुख ज्ञानदेव पडळकर हे अनभिज्ञ होते. या सर्व प्रकारामुळे मुख्य अभियंता दीपक कुमठेकर यांचे कार्यालय व इतर महावितरण कार्यालय हे रामभरोसे काम करत असल्याची चर्चा ग्राहकांमध्ये आहे.



> ऊर्जामंत्री व मुख्य अभियंता यांनी २ वेळा चौकशीचे पत्र देऊनही अधिकारी आदेश मानत नसतील, ७ दिवसांत अहवाल अपेक्षित असताना तो मिळाला नाही तर मुख्य अभियंता यांच्याकडून कार्यवाही अपेक्षित होती. अधिकारी महाराष्ट्र सरकारचे नाव खराब करत असून, महावितरणमध्ये ग्राहक तक्रार निवारणसाठी सक्षम यंत्रणा नाही. आतातरी मुख्य अभियंता यांनी चौकशी करून ही रक्कम ग्राहकांना परत करावी.
>
> **- दर्शन लड्ढा,** सामाजिक कार्यकर्ते



> गिरीश घोटेकर यांच्याकडून मी घर खरेदी केले, डिसेंबर २०२३ मध्ये मीटर टेस्टिंग चार्जेस भरलेले होते, परंतु मीटर टेस्टिंग करण्यात आलेले नाही. ग्राहक म्हणून माझी फसवणूक झाली आहे.
>
> **- स्वप्निल लद्दड,** ग्राहक

## महत्त्वाचे

### उमराणे जि.प. शाळेतर्फे मतदार जागृती रॅली



**उमराणे : प्रतिनिधी**

येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने मतदार जनजागृती अभियानांतर्गत शाळा समिती अध्यक्ष लक्ष्मण देवरे, मुख्याध्यापक संजय हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जागृती रॅली काढून अभियानास प्रारंभ करण्यात आला. येत्या २० मे रोजी होणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीत मतदानासाठी नागरिकांनी स्वतःहून दक्ष राहून १०० टक्के मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. लोकशाहीत मतदार हा सार्वभौम असून, संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकार प्रत्येक मतदाराने बजावला पाहिजे. हे रॅलीद्वारे मतदारांना पटवून देण्यात आले. जि.प. शाळेपासून विविध घोषणा देत रॅली शिवाजी चौक शहीद स्मारक भगतसिंग चौक व्यायामशाळा, गणेश मंदिर मेनरोड आदी मार्गाने नेण्यात आली. रॅलीत विद्यालयाचे मुख्याध्यापक शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

### ऑनलाइन फसवणूक होणार नाही यासाठी काळजी घ्या


**ओझर : वार्ताहर**

ऑनलाइन फसवणूक होऊ नये म्हणून आपली पोर्टल माहिती साध्या पासवर्डसह कोणाला देऊ नका तसेच अनोळखी व्यक्तीकडून कॉल आल्यानंतर त्याला ओटीपी देऊ नका. ऑनलाइन फसवणूक होणार नाही यासाठी सर्वांनी काळजी घ्यावी, असे आवाहन अरुण धनवडे यांच्यासह ओझर पोलिसांनी केले आहे. ऑनलाइन फसवणुकीच्या अनेक तक्रारी पोलिसांना प्राप्त होत आहेत. त्यामध्ये डिजिटल लेंडींग ॲप तसेच कंपन्यांच्या माध्यमातून मध्यमवर्गीय नागरिक, सेवानिवृत्त नागरिक, वयोवृद्ध नागरिक तसेच विद्यार्थी यांची पैसे दामदुप्पट करून देणे, नोकरी या माध्यमातून ऑनलाइन फसवणूक मोठ्या प्रमाणात होत असल्याची बाब सायबर क्राइमच्या निदर्शनास आली आहे. नागरिकांनी डिजिटल लेंडींग ॲप तसेच कंपन्यांमध्ये गुंतवणूक करताना सावधगिरी बाळगावी, तसेच विद्यार्थ्यांनी नोकरी शोधत असताना अशा प्रकारच्या ॲपला बळी न पडता सदर ॲप तसेच ॲडची संपूर्ण चौकशी करूनच त्याचा वापर करावा. फसवणूक टाळण्यासाठी आपण आपली पोर्टल माहिती साध्या पासवर्डसह कोणालाही देऊ नका आणि कोणत्याही अनोळखी व्यक्तीकडून कॉल आल्यानंतर मोबाइलवर आलेला ओटीपी देऊ नका. शक्यतो कोणत्याही अनोळखी व्यक्तीने केलेला कॉल स्वीकारला जाणार नाही याची काळजी घ्या तसेच कोणतीही ऑनलाइन वेबसाइट उघडू नका, कोणतेही ॲप्लिकेशन डाउनलोड करू नका तसेच कुठले ही डिजिटल लेंडींग ॲपच्या माध्यमातून फसवणूक झाल्यास तात्काळ ओझर पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा, असे आवाहन ओझर पोलिसांनी केले आहे.

### चांदवडला दिवसाढवळ्या घरात शिरून लॅपटॉपची चोरी

**चांदवड : वार्ताहर**

शहरातील घोडकेनगर येथे दिवसाढवळ्या घरात शिरून अज्ञात चोरट्यांनी २५ हजार रुपये किमतीचा लॅपटॉप चोरून नेल्याची घटना घडली. सदर घटना सीसीटीव्हीमध्ये चित्रित झाली आहे. याबाबत अज्ञात चोरट्यांविरोधात पोलिसांत चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चांदवड शहरातील घोडकेनगर येथे सौरभ बाळासाहेब पाटील (२६) यांच्या घरातून सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास एका अज्ञात चोरट्याने लॅपटॉप चोरी करून पळ काढला. यावेळी पाटील यांनी त्याचा शोध घेतला मात्र तो आढळून आला नाही. हा चोरीचा सर्व प्रकार एका सीसीटीव्हीत चित्रीत झाला आहे. भरवस्तीत दिवसाढवळ्या घरात घुसून चोरीची घटना घडल्याने परिसरातील नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. या घटनेबाबत सौरभ पाटील यांनी अज्ञात चोरट्याविरोधात फिर्याद दिल्याने पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पुढील तपास पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक स्वप्नील जाधव पुढील तपास करीत आहेत.



### चांदवड तालुक्यात रेशन दुकानदारांना ॲड्रॉइड पॉस मशीन

**चांदवड : वार्ताहर**

येथे तालुक्यातील सर्व रास्तभाव दुकानदार यांची तहसीलदार चांदवड यांचे अध्यक्षतेखाली दि.२४ एप्रिल रोजी बैठक घेण्यात आली व सर्व रास्त भाव दुकानदारांना नवीन ॲड्रॉइड पॉस मशीनचे वितरण तहसीलदार मंदार कुलकर्णी व प्र. पुरवठा निरीक्षण अधिकारी बाबासाहेब खेडकर यांच्या हस्ते करण्यात आले आणि कंपनी प्रतिनिधी बापू पवार यांनी सदर नवीन पॉस हाताळणी व वापराबाबत तांत्रिक प्रशिक्षण दिले. तसेच प्रसंगी पुरवठा निरीक्षक चांदवड विशाल लोहटे, पुरवठा लिपिक व्ही. आर. साबळे व सर्व रास्त भाव दुकानदार उपस्थित होते. नवीन ४ ई-पॉस मशीनचे वापरामुळे जुन्या २ ई-पॉस मशीन संदर्भातील असलेल्या अडचणी दूर होणार असून, धान्य वितरण अधिक सोयीचे व जलद होणार आहे.

# वाडीवऱ्हेजवळ इको वाहन उलटून आठ प्रवासी जखमी

**इगतपुरी : प्रतिनिधी**

मुंबई-आग्रा महामार्गावर असलेल्या वाडीवऱ्हेजवळ प्रवासी इको गाडीवरील चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने गाडी उलटल्याने अपघात घडला. या अपघातात ८ जण जखमी झाले होते.

या अपघाताची माहिती मिळताच गोंदेदुमाला येथे उभी असलेली जगत्गुरू नरेंद्रचार्य महाराज संस्थानची मोफत रुग्णवाहिकेचे चालक निवृत्ती गुंड यांनी अपघातस्थळी धाव घेऊन अपघातात जखमी झालेल्या दोन जणांना वाडीवऱ्हे येथील मल्टिस्पेशालिस्ट हॉस्पिटलमध्ये दाखल केले तर ६ जणांना नाशिक येथील जिल्हा रुग्णालयात दाखल केले.

गुरुवार दि. २५ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारात मुंबईहून नाशिककडे जात असताना वाडीवऱ्हेजवळ हा अपघात झाला. या अपघातात कौशल्या गायकवाड, वय ६०, सावित्री गुंजाळ, वय ७०, अनिता गुंजाळ, वय ५०, आनंद गुंजाळ, वय ५३ हे सर्व रा. मुलुंड, मुंबई तर दीपक गुंजाळ, वय ६०, रा. दौंड, पांडुरंग मारूती लेंडवे, वय ५५, रा. ठाणे, सोनाली उरूडे, वय ३०, रा. मध्य प्रदेश हे जखमी झाले आहेत. तर यातील एका जखमी महिलेचे नाव समजले नाही.



इगतपुरी : वाडीवऱ्हेजवळ अपघात झालेले इको वाहन. (छाया : ओंकार गवांदे)

### दरवाजा तोडून ९८ हजारांचा ऐवज लंपास

**चांदवड : वार्ताहर**

तालुक्यात उर्धुळ शिवारात मध्यरात्रीच्या सुमारास घराच्या पाठीमागचा दरवाजा दगडाच्या सहाय्याने तोडून अज्ञातांनी घरातून ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल लुटून पळ काढला. याप्रकरणी मधुकर सुखदेव ठाकरे (२८, रा. उर्धुळ, ता. चांदवड) यांनी वडनेरभैरव पोलिसांत फिर्याद दिली असून, अज्ञात तिघा चोरट्यांविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला. मंगळवार (दि. २३) रोजी ठाकरे यांच्या घराचा मागील दरवाजा चोरट्याने दगडाच्या सहाय्याने तोडला. आत प्रवेश करत लाकडी कपाटात ठेवलेले ५३ हजारांची रोकड, ३० हजार रुपये किमतीचा दीड तोळ्याचा सोन्याचा नेकलेस, पंधरा हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्रे असा एकूण ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल घेऊन पोबारा केला. सकाळच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर ठाकरे, पोलीस उपनिरीक्षक रावसाहेब त्रिभुवन यांनी घटनास्थळी पंचनामा केला. मनमाडचे पोलीस उपाध्यक्ष बाजीराव महाजन यांनी घटनास्थळी पाहणी करीत तपासाच्या सूचना केल्या आहेत.

## नाशिकचा शाळकरी मुलगा चक्रतीर्थाच्या प्रवाहात बुडाला

**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी**



त्र्यंबकेश्वर तालुक्यातील बेझे चाकोरे चक्रतीर्थ येथील नदी प्रवाहात बुडाल्याने नाशिक येथील १५ वर्षांच्या शाळकरी मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

गुरुवार दिनांक २५ एप्रिल रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास मोहंमद खान माजीद खान पठाण (वय १५, रा. काठे गल्ली, द्वारका, नाशिक) हा मुलगा त्याच्या पाच मित्रांसह बेझे चाकोरे चक्रतीर्थ येथे फिरायला आला होता. चक्रतीर्थाच्या पुढे गोदावरी नदीचा प्रवाह आहे. सर्व मुले तेथे सोबत आणलेले खाद्यपदार्थ खाण्यास बसले असता त्यांनी रस्त्यात तोडलेली कैरी धुण्यासाठी मोहंमद पाण्याकडे गेला. कैरी धुवत असताना पाय घसरला व तोल जाऊन तो पाण्यात पडला. हा प्रकार पाहून त्याच्या मित्रांनी आरडाओरड केली. जवळच वीजपंपाने शेतीला पाणी भरत असलेल्या शेतकऱ्यांनी धाव घेतली. गटांगळ्या खात असतानाच त्याला बाहेर काढले.

ही सर्व मुले दोन स्कूटर घेऊन आलेले होते. त्यांनी मोहंमद याला स्कूटरवर टाकत घेऊन जाण्याचा प्रयत्न केला, मात्र ते शक्य झाले नाही. तेथे उपस्थित ग्रामस्थांनी वाहनाने त्याला त्र्यंबक उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले, मात्र तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता. दरम्यान, या सर्व मुलांची गुरुवारी सकाळी फुटबॉल मॅच होती. ती रद्द झाल्याने सर्वांनी फिरायला जाण्याचा बेत आखला. त्यात मयत मोहंमद पठाण हा यापूर्वी या चाकोरे परिसरात येऊन गेलेला होता व तो सर्वांना या ठिकाणी घेऊन आला होता, अशी माहिती त्याच्या मित्रांनी येथील ग्रामस्थांना दिली. त्र्यंबक पोलीस ठाण्याचे हवालदार रूपेश मुळाणे यांनी घटनेची माहिती मिळताच घटनास्थळाकडे धाव घेतली. बेझे चाकोरे सरपंच कैलास पोटिंदे, सुरेश चव्हाण, बाळू शेवरे, रामा शेवरे, समाधान आलवने आदींनी मदत करत सर्वांना बेझे गावापर्यंत घेऊन आले. तेथून पोलिसांना संपर्क करत रुग्णवाहिका मागवली.

## येवला शहरात नगरपालिकेतर्फे मतदान जनजागृती

**येवला : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर येवला शहरात निवडणूक आयोगाच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत नगरपालिकेच्या वतीने जनजागृती अभियान राबविण्यात आले, दरम्यान पालिकेचे मुख्याधिकारी किरण देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली डॉक्टर असोसिएशनची काल सायंकाळी ठीक ४ वाजता बैठक बोलावण्यात आली होती.

निवडणूक आयोगाच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी नगर परिषदेचे मुख्याधिकारी देशमुख यांनी केलेल्या आवाहनाला शहरातील डॉक्टर असोसिएशन यांनी चांगला प्रतिसाद दिला. मतदानाच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावलेल्या मतदारांसाठी सवलत देण्याची भूमिका काल जाहीर केली. मुख्याधिकारी देशमुख यांनी आपल्या दालनात शहरात वैद्यकीय व्यवसाय करणारे डॉक्टर्स यांच्याशी निवडणुकीत आपले योगदान व सहभागी होण्याचे आवाहन केले. त्याला प्रतिसाद म्हणून शहरातील डॉक्टर संघटनेचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर क्षेत्रीय, डॉ. असोसिएशनचे सचिव डॉ. महेश्वर पगारे, डॉ. योगेश जेजुरकर, डॉ. स्मित पवार, डॉ. जयप्रकाश करवा, डॉ. आनंद खांगटे, डॉ. रोहन पाटील उपस्थित होते.

जे नागरिक २० मे रोजी मतदान करतील त्यांना आरोग्य तपासणी फी व इंजेक्शन फी यात सवलत देण्याचे डॉक्टर असोसिएशन यांच्यातर्फे कळवण्यात आले. शहरात व तालुक्यात उष्माघातामुळे नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून या ठिकाणीदेखील डॉक्टर असोसिएशनची टीम उपलब्ध राहून सेवा पुरवण्याचा निर्णय यावेळी डॉक्टर असोसिएशन कमिटीतर्फे घेण्यात आला. कार्यक्रमाला उपमुख्याधिकारी रोहित पगारे, स्वच्छता व पाणीपुरवठा अभियंता रूपाली भालेराव, राजेंद्र सुतावणे उपस्थित होते.

**नागरिकांनी मतदानाचा हक्क बजवावा**

''लोकसभा सार्वत्रिक निवडणूक दिनांक २० मे रोजी होत आहे. या पार्श्वभूमीवर अधिक मतदान वाढवण्यासाठी डॉक्टर असोसिएशनने घेतलेला निर्णय कौतुकास्पद असून, सर्व नागरिकांनी मतदान करून आपला हक्क बजवावा''. – **किरण देशमुख**, मुख्याधिकारी






देवळा : तालुका टीडीएफ शिक्षक संघटनेचे नवनियुक्त पदाधिकारी. समवेत संजय देवरे, गोविंद पगार, संजय पाटील आदी. (छाया : विनोद देवरे)

## देवळा तालुका टीडीएफ शिक्षक संघटनेच्या अध्यक्षपदी सागर

**देवळा : प्रतिनिधी**

देवळा तालुका टीडीएफ संघटनेची बैठक नुकतीच संघटनेचे जिल्हा नेते व एनडीएसटी सोसायटीचे माजी अध्यक्ष संजय देवरे यांच्या अध्यक्षतेखाली व माध्यमिक शिक्षक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद पगार, एनडीएसटी सोसायटीचे संचालक संजय पाटील, टीडीएफ शिक्षक संघटनेचे मावळते अध्यक्ष मनोज सिरसाठ यांच्या उपस्थितीत होऊन सन २०२४ ते २०२७ या तीन वर्षांसाठी नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

देवळा तालुका टीडीएफ शिक्षक संघटनेच्या अध्यक्षपदी देवळा येथील रामरावजी आहेर माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक सतीश सागर तर कार्यवाहकपदी दहिवड येथील जिजामाता विद्यालयाचे शिक्षक विनोद शिंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली व नवनियुक्त पदाधिकारी यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व पुढील कामकाजास शुभेच्छा देण्यात आल्या. बैठकीस शिवाजी मराठा इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुनीता पगार, पर्यवेक्षक एन. के. चव्हाण, जिजामाता कन्या विद्यालयाचे पर्यवेक्षक पगार तसेच तालुक्यातील माध्यमिक शाळांचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीचे प्रास्ताविक मावळते अध्यक्ष मनोज सिरसाठ यांनी केले तर उपस्थितांचे आभार संजय पाटील यांनी मानले. नवनियुक्त कार्यकारिणी उपाध्यक्ष मनोहर सावंत व ज्योत्स्ना सूर्यवंशी, कार्याध्यक्षपदी संदीप देवरे, सहकार्यवाह शैलेंद्र खैरनार व वैशाली निकम, कोषाध्यक्षपदी विरेंद्र महाले, जिल्हा प्रतिनिधी संजय पाटील, गोविंद पगार, अनिशा आहेर, तालुका सदस्यपदी सुनील आहेर, मोहनदास गवळी, नितिन निकम,कैलास निकम, महेंद्र सोनवणे, भाऊसाहेब देवरे, परीक्षित घुगे, निशिकांत बागूल, हेमंत देवरे, संतोष बच्छाव, सुनीता पाटील, ईश्वर थोरात, विलास गांगुर्डे, प्रकाश देवरे.



## घोटी शहरात रामदेवबाबा मंदिर येथे पिपाजी महाराज जयंती

**नाशिक : प्रतिनिधी**

घोटी शहरातील क्षत्रिय समाजातील समाजबांधवांनी रामदेवबाबा मंदिर व परिसरात पिपाजी महाराज जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरा करण्यात आला. यावेळी इगतपुरी तालुक्यातील श्री पिपाजी क्षत्रिय समाजाच्या वतीने चैत्र पौर्णिमाच्या दिनी सालाबादप्रमाणे पिपाजी जयंती महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाने झाले.

पिपाजी महाराज जयंती महोत्सवाच्या निमित्ताने नाशिक जिल्ह्यातील क्षत्रिय समाज मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. याप्रसंगी सकाळी महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवानिमित्त इगतपुरी तालुक्यातील विविध समाजबांधव या कार्यक्रमास सहभागी झाले होते. शेकडो भाविकांनी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. महाभिषेक, भजन, हवन, सामुदायिक आरती व महाप्रसाद आदी कार्यक्रम झाले. पिपाजी महाराज जयंती महोत्सव समितीच्या वतीने नरसिंग राखेचा, भवरीलाल राखेचा, मोहनलाल राखेचा, जयनारायन राखेचा, राजेंद्र राखेचा, बापूलाल राखेचा, पारस राखेचा, रूपचंद राठोड, अनिल दैय्या, दिनेश राखेचा, पुरुषोत्तम राठोड, तुषार राखेचा, कमलेश दैय्या, निलेश तंवर, कैलास सोलंकी, योगेश राखेचा, लखन मखाने, गोपाल राखेचा, निलेश राखेचा, सुजित राखेचा, अजय राखेचा यांच्यासह सर्व स्तरातील समाजबांधव या ठिकाणी उपस्थित होते.

## करिअर गायडन्स सेमिनारचे शनिवारी कालिदासला आयोजन

**नाशिक : प्रतिनिधी**



महात्मा जोतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त भारतीय हित रक्षक सभा भारत या संस्थेने कालिदास कलामंदिर या ठिकाणी दिनांक २७ एप्रिल २०२४, शनिवारी सकाळी ११ ते ४ या दरम्यान माईंड पॉवर व करिअर गायडन्स सेमिनारचे आयोजन केले आहे.

प्रत्येक विद्यार्थ्याचे मन हे अफाट शक्तिशाली आहे. या अफाट शक्तीचा वापर करून पाहिजे ते सक्सेस विद्यार्थी अचिव करू शकतो. म्हणून मानसोपचार तज्ज्ञ डॉ. प्रमिला पवार (फाउंडर आणि सीईओ ब्रेन सिक्रेट कौन्सलिंग अँड रिसर्च सेंटर) या विद्यार्थ्यांना मनाच्या शक्तीचा वापर कसा करायचा व ध्येय प्राप्त करण्यासाठी ब्रेनची प्रोग्रामिंग कशी करायची यावर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. भालचंद्र चव्हाण, जिल्हा परिषद नाशिक, रवींद्र जोगदंड, अधिकारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मार्ट सिटी संभाजीनगर, प्रशांत बच्छाव डीसीपी, नाशिक, श्रीकांत सोनवणे (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक रिलेशन), तायडे, पोलीस इन्स्पेक्टर, उमेश आव्हाड, मुंबई विद्यापीठ, नागार्जुन वाडेकर, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक, अब्दुल्ला खान, सीईओ रिलॅक्स डोमस वेअर कंपनी असतील.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी किरण मोहिते, कृष्णा शिंदे, अजमल खान, मौलाना सलीम, डॉ. विशाल जाधव, प्रिन्सिपल अश्विनी यात्रे, रवींद्र गायकवाड, तुषार दोंदे, किशोर केदारे, संदीप मोरे, नीलेश खरे, आशिष गायकवाड यांनी प्रयत्न केले आहेत. कार्यक्रमासाठी विद्यार्थी, पालक व शिक्षक यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.



## बोरस्ते विद्यालयाचे पथनाट्य, बाइक रॅलीद्वारे मतदार जनजागृती

**ओझर : वार्ताहर**

भारत एक शक्तिशाली लोकशाही प्रजासत्ताक देश आहे. लोकशाहीत प्रत्येक नागरिकास स्वतंत्र हक्क असल्याने प्रत्येकाचे मत अतिशय मौल्यवान असून, येत्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी प्रत्येकाने मतदान करणे ही काळाची गरज असल्याचे प्रांताधिकारी हेमांगी पाटील यांनी मतदार जनजागृती बाइक रॅलीस संबोधित करताना केले.

खंडेराव महाराज यात्रा मैदानावर मतदार जनजागृती बाइक रॅलीस संबोधित करताना व नवमतदार महिला तरुणांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या. व्यासपीठावर ओझर नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. किरण देशमुख, बोरस्ते विद्यालयाचे मुख्याध्यापक सोपान वाटपाडे, उपमुख्याध्यापिका सुनीता नलावडे, मंगल सावंत, शीतल आहेर, मोनाली निकम, अरुण सावंत, सुनील पाटील, बाळासाहेब ढेपले आदी उपस्थित होते. यावेळी मतदार जनजागृती घोषवाक्यांनी ओझर परिसर दुमदुमला. बाइक रॅलीत महिला शिक्षकांनी सफेद रंगाचा गणवेश परिधान केला होता. ओझरकर तरुणांनी रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यापूर्वी ही मतदान जागृतीसंदर्भात बोरस्ते विद्यालयाने विविध उपक्रम राबवून जनजागृती केली होती. पथनाट्य रांगोळी चित्रकला पोस्टर वक्तृत्व पत्रलेखन घोषवाक्ये आदींसह आयोजन केले होते. रॅलीसाठी ओझर केंद्रातील शिक्षण आरोग्य महसूल विभागातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# दगडपिंप्री येथे शेतकऱ्यांसाठी खरीप हंगाम बैठक

**दिंडोरी : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग कार्यालय दिंडोरी यांच्यामार्फत खरीप हंगाम सन २०२४ च्या पूर्वतयारीसाठी तालुक्यातील सर्व गावांमध्ये गाव बैठकांचे आयोजन विभागीय कृषी सहसंचालक नाशिक विभागाचे मोहन वाघ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नाशिक विवेक सोनवणे, उपविभागीय कृषी अधिकारी कळवण अशोक डमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुका कृषी अधिकारी विजय पाटील यांच्या नियोजनानुसार करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून मौजे दगडपिंप्री येथे खरीप हंगाम पूर्व गाव बैठकीचे आयोजन करण्यात आले.

सदर गाव बैठकीत कृषी सहाय्यक संदीपकुमार बोरवे यांनी शेतकरी बांधवांना खरीप हंगाम पूर्व करावयाच्या बाबी पूर्व मशागत तसेच घरगुती सोयाबीनचे बियाणे वापरण्यापूर्वी सोयाबीन बियाण्याची उगवण क्षमता चाचणी घेऊन ते पेरणीयोग्य आहे की नाही, याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. बीजप्रक्रिया, बियाणे व खते खरेदी करताना काय काळजी घ्यावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.



**शेतकरी बांधवांनी उपस्थित राहावे**

दिंडोरी तालुक्यातील सर्व गावांमध्ये कृषी विभागामार्फत खरीप पूर्व हंगाम सन २०२४ च्या पूर्वतयारीसाठी गाव बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये तालुक्यातील सर्व कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, व मंडळ कृषी अधिकारी नियोजनानुसार गाव बैठका घेऊन शेतकरी बांधवांना मार्गदर्शन करणार आहेत. तरी जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी गाव बैठकांना उपस्थित राहावे.

– **विजय पाटील** (तालुका कृषी सहाय्यक अधिकारी, दिंडोरी)

कृषी पर्यवेक्षक उत्तम भुसारे यांनी डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन या योजनेबाबत शेतकरी बांधवांना सेंद्रिय शेतीचे महत्त्व पटवून दिले व सेंद्रिय शेती काळाची गरज असल्याचे सांगितले तसेच मंडळ कृषी अधिकारी वणी पंडित कन्होर यांनी शेतकरी बांधवांना कृषी विभागाच्या महाडीबीटी पोर्टल अंतर्गत येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली तसेच शेतकरी बांधवांनी जास्तीत जास्त अर्ज करून योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी सहाय्यक सूरज चव्हाण यांनी केले. कृषी सहाय्यक देवीदास महाले यांनी आभार मानले. सदर गावबैठका चौसाळे, पिंगळवाडी, पिंप्री अंचला, हस्ते दुमाला, माळेदुमाला, कोल्हेर खोरीपाडा आदी गावांत झाल्या.

कार्यक्रमास मंडळ कृषी अधिकारी पंडित कन्होर, कृषी पर्यवेक्षक उत्तम भुसारे, कृषी सहाय्यक संदीपकुमार बोरवे, सूरज चव्हाण, देवीदास महाले, खोरीपाडा येथील वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कारप्राप्त शेतकरी सम्राट राऊत, युवराज भरसट, नारायण तुंगार, संदीप जोपळे, मधुकर चौधरी, धर्मा चौधरी, वसंत चौधरी, विजय चौधरी, दत्तात्रेय चव्हाण, हनुमंत खांडवी, युवराज चौधरी, दामू चौधरी, धनराज चौधरी, प्रदीप महाले, रवींद्र हडस आदींसह शेतकरी बांधव उपस्थित होते.



# मंत्री छगन भुजबळांकडून येवल्यातील शिवसृष्टी प्रकल्पाच्या कामाची पाहणी

**येवला : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित असलेला शिवसृष्टी प्रकल्प येवला शहरात उभारण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या सुरू असलेल्या कामाची राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी पाहणी केली. यावेळी संबंधित कंत्राटदाराला काम जलद गतीने करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राधाकिसन सोनवणे, येवला बाजार समितीचे सभापती किसनराव धनगे, विधानसभा अध्यक्ष वसंत पवार, पालिकेचे माजी नगराध्यक्ष भोलानाथ लोणारी, युवा नेते विक्कीभाई बिवाल, सचिन कळमकर, सुनील पैठणकर, भाऊसाहेब धनवटे, संतोष खैरनार, गोटू मांजरे, मलिक मेंबर, सचिन सोनवणे, गणेश गवळी, आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मंत्री छगन भुजबळ यांच्याकडून विंचूर चौफुली परिसराची पाहणी**

येवला शहरातील विंचूर चौफुली येथे वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी होत आहे. या ठिकाणी अपघातामध्ये एका शाळकरी मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाला. काल राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी विंचूर चौफुली परिसराची पाहणी केली. यावेळी पोलीस प्रशासनासह संबंधित विभागाला येथील अतिक्रमण दूर करून नियमित वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी तात्काळ सिग्नल बसविण्याच्या सूचना केल्या. याप्रसंगी पोलिस निरीक्षक विलास पुजारी, तसेच नगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## निविदा सूचना

### किराणा माल खरेदी

राज्यातील किराणा पुरवठादारांकडून संस्थेसाठी आवश्यक वार्षिक किराणा मालाची खरेदी करावयाची आहे. त्याकरीता निविदा मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| निविदा फॉर्म मिळण्याचे ठिकाण | विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण |
| निविदा भरणेची अंतिम दिनांक | ०८/०५/२०२४ |
| निविदा प्रक्रिया नोंदणी फी | रु. २५००/- Nonrefundable |
| निविदा फॉर्म फी | रु. ५०००/- Nonrefundable |
| निविदा डिपॉझिट रक्कम | रु. १००००/-Refundable |
| निविदामधील किराणा मालाची वार्षिक खरेदी अंदाजे रक्कम | रु. २३००००००/- |
| निविदा उघडण्याची दिनांक व वेळ | ०९ मे २०२४ सकाळी ९ ते सायं ५.०० |
| निविदा उघडण्याचे ठिकाण | विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण, ता कोपरगाव जि. अहमदनगर |

किराणा साहित्य यादी व सविस्तर माहितीचा तपशिल आपणांस ऑनलाईन व ऑफलाईन पहाण्यास मिळेल. व निविदा ऑनलाईन व ऑफलाईन प्राप्त करून घेता येईल व भरता येतील.

संपर्क:- ऑनलाईन माहिती व निविदा www.atmamalikonline.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

फोन/व्हॉट्सअॅप नंबर : ७५८८६९४०५६/८९७५६६५२५५

ईमेलआयडी:- vishwatmak.purchase@gmail.com

सरचिटणीस / अध्यक्ष

विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण

## जाहीर इशारा नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, **मौजे धोंडगव्हाण**, ता. चांदवड, जि. नाशिक या गावचे शिवारातील मिळकत गट नं. ६३४ यांसी एकूण क्षेत्र ०० हे. ५१ आर, आकार ०१ रू ५९ पैसे यांसी चतुः सिमा रेकॉर्ड ऑफ राईटस् प्रमाणे.

वर नमुद मिळकत ही **यशवंत कृष्णा पवार व शंकर कृष्णा पवार** यांचे वडीलोपार्जीत मालकी हक्काची व एकत्र कुटूंबाचे कब्जे वहिवाटीतील अशी आहे. सदरची मिळकत यशवंत कृष्णा पवार यांनी विक्री करण्याचे ठरविले अशी खात्रीलायक माहिती आमचे पक्षकार **पुंडलीक यशवंत पवार** यांना झाली आहे. सदरच्या मिळकती मध्ये आमचे पक्षकार यांचा वडीलोपाजर्मीत वारसा हक्काने हिस्सा आहे. त्यामुळे सदरची संपूर्ण मिळकत ही यशवंत कृष्णा पवार यांना विक्री करण्याचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नाही. त्यामुळे आमचे पक्षकारांची यशवंत कृष्णा पवार यांना सदरचे क्षेत्र विक्री करणेकामी हरकत आहे. त्यामुळे सदर मिळकती संबंधाने कोणत्याही इसमांनी कोणत्याही प्रकारचे यशवंत कृष्णा पवार यांचेसोबत करार मदार, विसार पावती, साठेखत, खरेदीखत, बक्षीसपत्र अगर सदर मिळकत हस्तांतरण होईल असे कोणतेही व्यवहार करू नयेत त्याकामी सदरची जाहिर इशारा नोटीस प्रसिध्द केली आहे.

सबब सदर मिळकतीसंबंधाने कोणत्याही इसमांनी यशवंत कृष्णा पवार यांचेसोबत वर नमुद मिळकती संबंधाने कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो आमचे पक्षकाराचे हिश्याचे क्षेत्रावर बंधनकारक राहणार नाही, तसेच सदर मिळकतीसंबंधाने कोणत्याही इसमाने यशवंत कृष्णा पवार यांचेशी व्यवहार केल्यास त्यास सर्वस्वी तेच जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. कळावे, ही जाहीर इशारा नोटीस...

**दिनांक : २५/०४/२०२४**

**आमचे मार्फत प्रसिध्द**

**श्री. शांताराम सुभाषराव भवर, अॅडव्होकेट**

**पत्ता - २, पहिला मजला, शेतकरी संघ, पोलीस स्टेशन समोर, कसबेवणी ता. दिंडोरी, जि. नाशिक मोबा. ९८६०१०४१७०**

# अमेरिका, युरोपला उच्चांकी द्राक्ष निर्यात

**पुणे :** यंदाच्या द्राक्ष हंगामात पंधरा एप्रिलपर्यंत देशातून १,८१,३९६ टन द्राक्ष निर्यात झाली आहे. अमेरिका युरोपीयन युनियनला उच्चांकी १,३१,४२१ टन, तर अन्य देशांना ५०,१९५ टन द्राक्ष निर्यात झाली आहे. अमेरिका आणि युरोपीयन युनियनला सरासरी ९० हजार ते एक लाख टन निर्यात होते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका दिंडोरी पैकी **मौजे खतवड** येथील मिळकत गट नं. २३८ चे एकूण क्षेत्र १ हे. १९ आर, यांसी आकार रु. १. ६२ पैसे यापैकी क्षेत्र ०० ५७ आर, आकार रु. ०० ७९ पैसे येणेप्रमाणे सदर मिळकत खरेदी दयावयाची ठरलेली आहे. तसेच सदर मिळकतीत जाणेयेणे साठी पूर्वापारचे वागवहिवाटीचे रस्त्याचे हक्कासह दरोबस्त मिळकत.

उपरोक्त मिळकत ही **केदु भिका खुर्दळ** यांचे मालकीची व कब्जेवहिवाटीची असून त्यांनी सदर मिळकत विक्रीचा **संतोष बाळु दाते**, रा. रानवड, ता. निफाड, जि. नाशिक यांचे सोबत व्यवहार ठरवून व्यवहारापोटी विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. तरी सदर मिळकतीचे टायटलबाबत खात्री करण्याकरीता आमचे पक्षकाराचे सांगण्यावरून सदरची नोटीस प्रसिध्द केलेली आहे. सबब सदर वर नमूद मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोजा जसे गहाण, दान, लिन, लिज, अन्नवस्त्र, तारण, बँक बोजा, कुळ, वारस, वारसा हक्क, कोर्टखटले अथवा कुठल्याही प्रकारचे करार मदार असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१०** दिवसांच्या आत नमूद केलेल्या पत्त्यावर कागदपत्रांच्या पुरव्यानिशी लेखी हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली हरकत किंवा मुदतीनंतर आलेली हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहाणार नाही याची नोंद घ्यावी, कळावे. ही जाहीर नोटीस

ता. २५/०४/२०२४

**आमचे मार्फत प्रसिध्दीस खाना**

**ज्ञानेश्वर एकनाथ शिंदे, गौरव ज्ञानेश्वर शिंदे**
**अॅडव्होकेटस**

**ऑ.:- ऑफिस नं. २०५, दुसरा मजला, निफाड कोर्ट, मो.नं. ९८८११०८७७०**

## वारस नोटीस

**श्रीमती पार्वताबाई मनोहर गायकवाड, रा. पेठ, ता. पेठ यांचे पती कै. मनु काळु गायकवाड हे दि. १७/०३/२०२४ रोजी मयत झाले आहे. मयत व्यक्तीच्या वारसांना शासनाकडुन देय रकमा मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज सादर केला असुन त्यात खालील प्रमाणे वारस असल्याचे दर्शविलेले आहे.**

| अ.क्र. | वारसाचे नाव | वय | नाते |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती. पार्वताबाई मनोहर गायकवाड | ७९ | पत्नी |
| २ | श्री. संजय मनोहर गायकवाड | ४७ | मुलगा |
| ३ | श्री. विजय मनोहर गायकवाड | ४५ | मुलगा |
| ४ | सौ. भारती नामदेव दळवी | ५० | मुलगी |
| ५ | सौ. सुरेखा हरी खुरकुटे | ४३ | मुलगी |
| ६ | सौ. विमल पंडीत गावीत | ४० | मुलगी |

**या जाहिर नोटीसद्वारे सुचित करण्यात येते की, वरील वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्रास कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहिर नोटीस प्रसिध्दीच्या तारखेपासुन ०७ (सात) दिवसांचे आत तहसिल कार्यालय पेठ येथे सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास सबंधितास वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

दिनांक २५/०४/२०२४

**तहसिलदार, पेठ**

## टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस

आमच्या पक्षकारांच्या समक्ष सांगितलेवरून व दाखविलेल्या कागदपत्रावरून तमाम लोकांस

जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे देवळा, ता. देवळा, जि. नाशिक येथील बिनशेती मिळकतीचे वर्णन

| ग.नं./सन | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी | आकार रु.पैसे | मालकाचे नांव |
|---|---|---|---|---|
| १०८४ | ४ | १२६.०० | १२.६० | देवयानी दिपक आहेर |

यांसी चतु:सीमा : पूर्वेस- ग.नं. १०८५, पश्चिमेस प्लॉट नं.३, दक्षिणेस-९ मीटर कॉलनी रोड, उत्तरेस- ग.नं. ११३३

वर वर्णन केलेली मिळकत ही वर वर्णन केलेल्या मालकाच्या कब्जा वहिवाटीत आहे. सदर मिळकत ही तारण देवून आमचे पक्षकार यांना बँकेमार्फत कर्ज प्रकरण दाखल करून कर्ज घ्यावयाचे आहे. त्यामुळे सदर मिळकतींचे मालकी व निर्वेधपणाचे खात्री करिता सदरची जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतींवर कोणाचाही कोणत्याही कागदपत्रांच्या आधारे कोणताही हक्क, अधिकार, हितसंबंध, करार-मदार, गहाण, दान, लिन, लिज, मुखत्यार, ईसारपावती, साठेखत, बँक बोजा अगर इतर कोणत्याही प्रकारे हक्क, अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत खालील पत्यावर पुराव्यानिशी तक्रार दाखल करावी. वरील मुदतीत कोणाची तक्रार न आल्यास अथवा परस्पर वर्तमानपत्रात हरकत नोंदविल्यास आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व आमचे पक्षकार बँकेचे कर्ज प्रकरण दाखल करून व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर कोणाचेही काहीही ऐकले जाणार नाही. कळावे ही जाहिर नोटीस,

स्थळ: सटाणा, दिनांक : २६/०४/२०२४

**आमचे मार्फत प्रसिद्ध**

**अॅड. मोरेश्वर आर. हिरे, मो.नं.९०२८३२८६४८**
**सटाणा, ता. बागलाण (नाशिक)**

## जाहीर फारकत नोटीस

**श्री. संजय ज्ञानेश्वर कासार**, रा. निमज, ता. संगमनेर, जि. अहमदनगर यास..

तुझे व माझे लग्न ता. ०५.०३.२०२२ रोजी झाले. मला तु लग्नानंतर दीड महिना बऱ्यापैकी नांदविले, त्यानंतर तू मला रात्रीबेरात्री दारु पिवुन येवुन शिवीगाळ, मारहाण करू लागला, माझ्यावर संशय घेऊ लागला, मला रात्री बेरात्री घराचे बाहेर काढून देवु लागला. मला जिवे मारण्याची धमकी देत होता, नेहमी घरातून निघून जाण्याची भाषा करत असत. मी तुझ्याकडे नांदत असतांना दोन महीन्यापूर्वी मला बेदम मारहाण करून, जिवे मारण्याची धमकी देवून, शिवीगाळ दमदाटी करून एका वस्त्रानिशी घराचे बाहेर काढून दिले. तुझा स्वभाव संशयी असून तुला दारूचे व्यसन आहे, तुझ्यापासून माझ्या जिवीतास धोका आहे. मला तू चांगले नांदवशिल अशी खात्री राहिली नाही. मी तुला या जाहीर फारकतीने फारकत देत असून तुझे व माझे दरम्यानचा पती-पत्नीचा नातेसंबंध संपुष्टात आणत आहे. यापुढे जो तो दुसरा घरोबा अगर विवाह करण्यास मोकळे झालेलो आहे. कळावे ही जाहीर फारकत नोटीस. ता. २५.०४.२०२४

**सही/- सौ. वैष्णवी संजय कासार,**
**ह.मु. कोचरगांव, ता. दिंडोरी, जि. नाशिक**

# येवल्यातील पटेल कुटुंबाचे मंत्री भुजबळ यांनी केले सांत्वन

**येवला : प्रतिनिधी**



गेल्या काही दिवसांपूर्वी येवला शहरात कु. भूमिका परेश पटेल या शाळेत जाणाऱ्या मुलीचे अपघातात निधन झाले होते. या घटनेने पटेल परिवाराला मोठा धक्का बसला होता. दरम्यान, येवला दौऱ्यावर आलेले मंत्री छगन भुजबळ यांनी पटेल यांच्या निवासस्थानी भेट देऊन पटेल परिवाराचे सांत्वन केले. स्वर्गीय भूमिका पटेल हिच्या प्रतिमेला मंत्री भुजबळ यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी पटेल परिवारातील परेश पटेल तसेच कुटुंबातील नागरिक, महिला, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

**बागलाण येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात**

क्र. अभिलेख/मृत्यू नोंद आदेश/एसआर/१५/२०२४

**श्री/श्रीमती. गुलाब देविदास माळी** रा. पिंपळकोठे, ता. बागलाण **अर्जदार**

**विरुध्द**

**ग्रामसेवक पिंपळकोठे ग्रामपंचायत** ता. बागलाण जि. नाशिक **सामनेवाला**

अर्ज-जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे जन्माची नोंद होणेबाबत.

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे जन्माची नोंद होणे कामी, अर्जदार यांनी त्यांचा स्वत:चा **गुलाब देविदास माळी** यांचा जन्म दाखला मिळणेसाठीचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांचा **स्वत:चा गुलाब देविदास माळी** हे **दिनांक ०३/०६/१९९५** रोजी **मौजे पिंपळकोठे** ता. बागलाण जि.नाशिक येथे जन्म झालेला आहे. ग्रामसेवक पिंपळकोठे, ग्रामपंचायत, ता. बागलाण, जि. नाशिक यांचेकडेस अर्जदार यांनी त्यांचा स्वत:चा **गुलाब देविदास माळी** यांच्या जन्माची नोंद झालेबाबत चौकशी/तपास केला असता सदर नोंद आढळून येत नाही असे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सामनेवाले विरुध्द प्रस्तुतचा अर्ज तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, बागलाण यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. त्याअर्थी याव्दारे फर्मविण्यात येते की, सदर किरकोळ फौजदारी अर्जाविरुद्ध कोणाचीही काही हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून **तीस** दिवसांच्या आत किंवा **दिनांक २२/०५/२०२४** रोजी सकाळी ११.०० वाजेपावेतो मे. तहसिलदार बागलाण, ता. बागलाण, जि. नाशिक येथे स्वत: अथवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत आपली हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाची काहीएक हरकत नाही असे समजुन उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी घेऊन जन्माची नोंद घेणे बाबतचा आदेश पारीत करण्यात येईल. आज **दिनांक १६/०४/२०२४** रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

(शिक्का) **तहसिलदार**
**तथा कार्यकारी दंडाधिकारी बागलाण**

## जाहीर नोटीस

**बागलाण येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात**

क्र. अभिलेख/मृत्यू नोंद आदेश/एसआर/११७/२०२४

**श्री/श्रीमती. संजय गोपा सोनवणे** रा. तिळवण, ता. बागलाण **अर्जदार**

**विरुध्द**

**ग्रामसेवक तिळवण** ता. बागलाण जि. नाशिक **सामनेवाला**

अर्ज-जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे मृत्यूची नोंद होणेबाबत.

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे मृत्यूची नोंद होणे कामी, अर्जदार यांनी त्यांचे वडील **कै. गोपा देवमन सोनवणे** यांचा मृत्यू दाखला मिळणेसाठीचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार त्यांचे वडील **कै. गोपा देवमन सोनवणे** हे **दिनांक १२/०२/२००२** रोजी **मौजे तिळवण** ता. बागलाण जि.नाशिक येथे मयत झालेले आहेत. ग्रामसेवक, तिळवण, ता. बागलाण जि.नाशिक यांचेकडेस अर्जदार यांनी त्यांचे वडील **कै. गोपा देवमन सोनवणे** यांच्या मृत्यूची नोंद झालेबाबत चौकशी/तपास केला असता सदर नोंद आढळून येत नाही असे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सामनेवाले विरुध्द प्रस्तुतचा अर्ज तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, बागलाण यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. त्याअर्थी याव्दारे फर्मविण्यात येते की, सदर किरकोळ फौजदारी अर्जाविरुद्ध कोणाचीही काही हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून **तीस** दिवसांच्या आत किंवा **दिनांक १६/०५/२०२४** रोजी सकाळी ११.०० वाजेपावेतो मे. तहसिलदार बागलाण, ता. बागलाण, जि. नाशिक येथे स्वत: अथवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत आपली हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाची काहीएक हरकत नाही असे समजुन उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी घेऊन मृत्युची नोंद घेणे बाबतचा आदेश पारीत करण्यात येईल. आज **दिनांक १६/०४/२०२४** रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

(शिक्का) **तहसिलदार**
**तथा कार्यकारी दंडाधिकारी बागलाण**

## जाहीर नोटीस

**बागलाण येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात**

क्र. अभिलेख/मृत्यू नोंद आदेश/एसआर/११२/२०२४

**श्री/श्रीमती. जिलानी आब्दुल रहेमान पिंजारी** रा. तिळवण, ता. बागलाण **अर्जदार**

**विरुध्द**

**मुख्याधिकारी सटाणा नगरपरिषद** ता. बागलाण जि. नाशिक **सामनेवाला**

अर्ज-जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे जन्माची नोंद होणेबाबत.

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे जन्माची नोंद होणे कामी, अर्जदार यांनी त्यांचा स्वत: **जिलानी आब्दुल रहेमान पिंजारी** यांचा जन्म दाखला मिळणेसाठीचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांचा **स्वत: जिलानी आब्दुल रहेमान पिंजारी** हे **दिनांक १०/०५/१९७६** रोजी **मौजे सटाणा** ता. बागलाण जि.नाशिक येथे जन्म झालेला आहे. सटाणा नगर परिषद,ता.बागलाण, जि. नाशिक यांचेकडेस अर्जदार यांनी त्यांचा स्वत: **जिलानी आब्दुल रहेमान पिंजारी** यांच्या जन्माची नोंद झालेबाबत चौकशी/तपास केला असता सदर नोंद आढळून येत नाही असे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सामनेवाले विरुध्द प्रस्तुतचा अर्ज तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, बागलाण यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. त्याअर्थी याव्दारे फर्मविण्यात येते की, सदर किरकोळ फौजदारी अर्जाविरुद्ध कोणाचीही काही हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून **तीस** दिवसांच्या आत किंवा **दिनांक १६/०५/२०२४** रोजी सकाळी ११.०० वाजेपावेतो मे. तहसिलदार बागलाण, ता. बागलाण, जि. नाशिक येथे स्वत: अथवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत आपली हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाची काहीएक हरकत नाही असे समजुन उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी घेऊन जन्माची नोंद घेणे बाबतचा आदेश पारीत करण्यात येईल. आज **दिनांक १६/०४/२०२४** रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

(शिक्का) **तहसिलदार**
**तथा कार्यकारी दंडाधिकारी बागलाण**

**श्रीमान सुगनमलजी सुराणा व्यापारी सहकारी पतसंस्था मर्यादित, देवळा, ता. देवळा, जि. नाशिक**

**धनसुगंध, सटाणा रोड, देवळा, ता. देवळा, जि. नाशिक. फोन नं. (०२५९२) २२८२६३**

## कर्जाकरीता गहाण घेणेच्या मिळकतीबाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांस या गहाण घेणेचे मिळकतीचे संबंधाने कळविण्यात येते की-

१. मौजे देवळा, ता. देवळा, जि. नाशिक येथील महसुली हद्दीतील गट नं. ६२ पैकी प्लॉट नं. १३ क्षेत्र ०.७८.२५ आर चौ. मिटर आकार रुपये ७.८० पैसे

नगर पंचायत नमुना ८ नुसार नगर पंचायत मिळकत नं १७७३ क्षेत्र ३७X२३= ८५५ चौ.फुट आकार ९१५ रुपये यासी चतुः सिमा

पूर्वेस प्लॉट नं. १२, पश्चिमेस-प्लॉट नं. १४, दक्षिण कॉलणी रस्ता, उत्तर प्लॉट नं. १८. येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत कर्जदार (नगर पंचायत नमुना ८ नुसार सह कर्जदार) यांचे मालकी व कब्जा वहीवाटीतील अशी मिळकत आहे.

२. कर्जदाराचे नांव : श्री. राजेंद्र मार्तंड वाघ, रा. देवळा. ता. देवळा, जि. नाशिक.

३. सहकर्जदाराचे नावं : सौ. सरला राजेंद्र वाघ, रा. देवळा. ता. देवळा, जि. नाशिक.

४. नोटीसीचा उद्देश : टायटल व्हेरीफिकेशन

५. ज्याअर्थी वरील कर्जदार यांनी श्रीमान सुगनमलजी सुराणा व्यापारी सहकारी पतसंस्था मर्यादित देवळा, मुख्य शाखा देवळा यांचेकडून वर नमुद केलेली कर्जदार (सह कर्जदार) यांची वर नमूद केलेली कलम १ मधील मिळकत गहाण / तारण देवुन कर्जाची मागणी केली आहे.

६. त्याअर्थी वर कलम १ मध्ये वर्णन केलेली कर्जदार व सह कर्जदार यांची मिळकत पूर्णपणे निर्वेध व बिनबोजाची आहे असे सांगून कर्ज मागणी कर्जदाराने केलेली आहे. सदर मिळकतीवर श्रीमान सुगनमलजी सुराणा व्यापारी सहकारी पतसंस्था मर्यादित देवळा, यांचा रक्कम रुपये २,००,०००/- अक्षरी दोन लाख मात्रचा कर्जाचा बोजा नोंदणीकृत गहाणखत दस्त क्र. दलव ७२५/२०१३ दि. २१ मे २०१३ (नोंद नं. ११५५६) व रक्कम रुपये २,००,०००/- अक्षरी दोन लाख मात्रचा कर्जाचा बोजा नोंदणीकृत गहाणखत दस्त क्र. दलव १३२४/२०१८ दि. २ ऑगष्ट २०१८ रोजीच्या पतसंस्थेच्या लाभात लिहुन दिलेल्या दस्तानुसार आहे. (नोंद नं. १३६५२) अशा नोंदी पारीत झालेल्या आहेत. तथापी, वरील मिळकतीवर अन्य कोणचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, साठेखत, करारनामा, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, वारसाहक्क, मनाई हुकुम कोर्ट जप्ती वगैरे स्वरुपाचा काही हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **७ (सात)** दिवसांच्या आत आमच्या खालील पत्यावर व संस्थेच्या कार्यालयात संबंधित कागदपत्रे व साक्षी पुराव्यानिशी समक्ष येवून हरकत नोंदवावी. मुदतीनंतर येणाऱ्या व परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही कर्जदार व संमतीदार यांच्या कथनानुसार व दाखल केलेल्या कागदपत्रानुसार निर्बंध व बिनयोगाची आहे. असे समजुन योग्य ते गहाणखत करून मिळकत कर्जासाठी तारण घेतली जाईल व कर्ज वितरण केले जाईल. करीता जाहीर नोटीस असे

स्थळ -देवळा, दिनांक २३/४/२०२४ **श्री. महेश दिनकर जोशी, व्यवस्थापक**

**आमचे मार्फत प्रसिद्ध**

**अॅड. श्री.के.पी. भदाणे**

**दिवाणी न्यायालयासमोर सटाणा, ता. बागलाण, जि. नाशिक**

# सेंट लॉरेन्स हायस्कूलमध्ये ज्ञानवर्धक उपक्रम

**नाशिक:** अश्विन नगर सिडको नाशिक येथील सेंट लॉरेन्स हायस्कूलच्या प्राथमिक विभागातील पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांनी एक नाटिका सादर केली.यामध्ये एका अस्वलाची गोष्ट सांगण्यात आली. गोष्टींमध्ये घरातील सर्वजण जास्त प्रमाणात टीव्ही बघतात म्हणून घरातील आईने टीव्ही कायमस्वरूपी बंद केला.त्यानंतर घरातील मुलांना बैठे खेळ,मैदानी खेळ आईने शिकविले त्यानंतर विविध गोष्टींचे पुस्तक वाचली पाहिजेत हे देखील विद्यार्थ्यांना सांगितले विद्यार्थ्यांना या सर्व गोष्टींमध्ये रस निर्माण झाला आणि आईने पुन्हा टीव्ही चालू केल्यानंतर विद्यार्थ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले.

## जाहीर नोटीस

अॅड.श्री.आर.एस.दराडे, आडगाव, जि. नाशिक

निशाणी फौजदारी चौकशी नंबर १२८/२०२३

नांदगाव येथील मा. दिवाणी न्यायाधीश क स्तर आडगाव, जि. नाशिक यांचे न्यायालयात

**कचरू सोमा फेकळे** वय ४८, रा. पिंपरखेड, ता. नांदगाव, जि. नाशिक **अर्जदार**

**विरुध्द**

**मे ग्रामसेवक सो**
**ग्रामपंचायत कार्यालय, पिंपरखेड** **सामनेवाले**

अर्ज:-जन्म मृत्यू नोंद अधीनियमाचे तरतुदी अन्वये जन्म तारखेची नोंद होण्यासाठी

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. **इंदा कचरू फेकळे** यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९९९ रोजी सायंकाळी ६.३० पिंपरखेड येथे झाला आहे. अर्जदार यांच्याकडून नजरचुकीने सामनेवाले यांची जन्म मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये जन्माची नोंद करणे राहून गेली आहे. अर्जदाराला शासकीय कामासाठी व अन्य खाजगी कामासाठी जन्माच्या दाखल्याची आवश्यकता व गरज आहे. जन्माची नोंद सामनेवाले यांनी त्यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नोंद करून तसा जन्माचा दाखला मिळण्याबाबतचा अर्जदाराने या न्यायालयात सादर केला आहे. याबाबत कोणाचे म्हणणे अथवा तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत अगर दि. ०७/०५/२०२४ रोजी अगर तत्पुर्वी मे दिवाणी न्यायालय क स्तर नांदगाव येथे स्वतः अगर वकिलामार्फत हजर होऊन लेखी म्हणणे दाखल करावे. वरील मुदतीत कोणाचे काहीही म्हणणे न आल्यास मे. न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. आज दि.२३/०४/२०२४ रोजी मी माझे सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे,

हुकुमावरून
सहा. अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, क. स्तर, नांदगाव
जि. नाशिक

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषत: पंढरीनाथ बाबुराव फडोळ (मयत) यांचे वारस प्रमोद पंढरीनाथ फडोळ व इतर, सिकंदर रामलाल गुलाठी (मयत) अविवाहीत तथा संन्यासी यांचे बेकायदेशीर वारस लवण अनिलकुमार गुलाठी व इतर, नाशिक नाजकम चे अप्पर जिल्हाधिकारी तहसिलदार सहायक नगर रचनाकार, नायब तहसिलदार, श्री अनिल दौंडे, तत्कालीन तहसिलदार तथा विद्यमान उपजिल्हाधिकारी (प्रशासन) उस्मानाबाद, श्री रोकडे नाशिक शहर मंडल अधिकारी, श्री वाघ तलाठी नाशिक शहर, भातांबरीकर आणि कंपनी, भामरे आणि कंपनी, बागड कन्स्ट्रक्शन कंपनी, युटीलीटी सेंटर एस-१८ दुसरा मजला, राजीव गांधी भवना समोर, शरणपुर रोड, नाशिक व यांचे मुंबई उच्च न्यायाल -यातील लोक सेवक अज्ञात न्यायाधीश यांना सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१) मिळकतीचे वर्णन-शासकिय कडई पत्रक १८७८ मधील जिल्हा तुकडी नाशिक,पोटतुकडी तालुका नाशिक, मनपा हद्दीतील मौजे नाशिक शिवारातील सरकारी जमीनीचे सर्व्हे नं.६४ व ६५यांसी सामाईक क्षेत्र १३ एकर ०५ आर बिनशेती दरबोस्त मिळकती.

२) वरिल कलम १ मधील सरकारी जमीन असल्याचे पुरावे माहीत असतानाही नाजकमचे वरील महसूल अधिकारी यांनी संगनमताने बेकायदेशीर मालक सिकंदर सिकंदर रामलाल गुलाठी (मयत) अविवाहीत संन्यासी यांना बायको,मुले, मुली नसतांनाही बेकायदेशीर वरिल वारस नामे लवण अनिलकुमार गुलाठी व इतर तसेच मे.मुंबई उच्च न्यायालयाने अपिल नं. ६५८/१९७० मधील अपिलातून नोकर सिध्द बाबूराव नारायण फडोळ (मयत) यांचे झालेले वरिल बेकायदेशीर मालक फडोळ परिवार यांनी संगनमताने कलम १ मधील सरकारी जमीनीला नाजकम अधिनियम १९७६ लागू नसतानाही कलम १२६ नुसार प्रतिबंध असतानाही विविध हस्तांतर परवानग्या, सिलींग परवानग्यां मधून शासन व जन सेवेस पात्र नसल्याचा ज्वलंत पुरावा सादर केला आहे.

३) कलम १ मधील सरकारी जमीनीला कुळ कायदा लागू होत नाही असे अधिकृत पुरावे माहीत असतांनाही तत्कालीन तहसीलदार नामे . श्री अनिल दौंडे यांनी कुळ कायदा कलम ३२-एम च्या बेकायदेशीर टेनन्सी केस नं.११/२०२२ नुसार मुंबई उच्च न्यायालयाने सन १९७०मधील निकालपत्रातील नोकरीचे वारसांना मालक दर्शविल्याच्या निकाल पत्रावरून बेकायदेशीर नोंद नं. ११४४८१ कायम रद्द करून बेकायदेशीर मालकांची नांवे ७/१२ उताऱ्यावरून कमी करून मालक सदरी महाराष्ट्र शासन व जोगळेकर इनाम मॅन्युअल कलम १३४ नुसार देवस्थान इनाम वर्ग ३ यांची नांवे लावणेस कायदेशीर व न्यायीक असतानाही वरिलमहसूल विभागातील लोक सेवकांनी असे कायदेशीर केले नाही. उलट संगनमताने वरील कंपन्यांपैकी बागड कन्स्ट्रक्शन कंपनीच्या मालक व भागीदार श्री बागड यांनी सदर बेकायदेशीर नोंदीतील बेकायदेशीर मालकांची नावे कायम ठेवण्यासाठी मे. मुंबई उच्च न्यायालयातील संबंधीत लोकसेवक न्यायाधीश करणार असल्याची धमकी अशिक्षीत व विवाहीत महंत सितारामदास गुरु टिकमदास बैरागी यांचे अधिकृत वारसांना साक्षीदारा समक्ष दिल्यावरून मे. सर्वोच्य न्यायालयातील केस नं. १२९/२०१५ दिनांक १३/०४/२०१५चे निकाल पत्रातील आदेशाचा भंग केल्याचे पुराव्यावरून फौजदारी कलम १९७चा दुरूपयोग करणारे सदर लोकसेवकांना शासनाचे अभय रद्द केल्याचे पुराव्यावरून संबंधीत पोलीसठाणे व न्यायालयातून विविध फौजदारी गुन्हे यासह फौजदारी कलम १५६ (१) (३) नुसार कायदेशीर व न्यायीक गुन्हे दाखल करण्यास पात्र असल्याचे विविध अधिकृत पुरावे नुसार जाहीर नोटीस देणार हे विविध कायद्यांसह संविधान रक्षक म्हणून सक्षम व कार्यक्षम आहेत.

४) वरिल कलम १ मधील सरकारी जमीनीचे शासकिय रेडी रेकनर नुसार सामाईक रक्कम रूपये ३५,७३,९७,५००/- व बाजार भावानुसार व बाजारभाव किमान सामाईक रक्कम रूपये १५० कोटी असतानाहीशासनाच्या महसूल व वन विभाग मंत्रालयाची परवानगी नसतानाही कलम३मधील बेकायदेशीर टेनन्सीकेस व निकालपत्रा नुसार संबंधीत दुय्यम निबंधक यांचे कार्यालयात केवळ रूपये ५००/-मुद्रांक मोबदल्यात बेकायदेशीर खरेदी दस्त नं. ४४५०/२०२३ नोंदविल्याचे पुराव्या नुसार दर्शविल्याचे अधिकृत सदर खरेदीदस्त पुराव्यावरून वरिल सर्व संशयीत आरोपी व संशयीत आरोपी लोकसेवक यांचेवर देशद्रोही कलम १२१, १२१- अ, १२४, १२४ अ व अन्य कलमांसह फौजदारी कायद्यातील विविध कलमांसह वरिल फौजदारी कलमान्वये अजामीन पात्र गुन्हे दाखल करून ३ ते १० वर्ष सक्त मजुरीच्या शिक्षेसह जन्मठेप व मरेपर्यंतच्या शिक्षेस पात्र असल्याचे विविध अधिकृत- पुरावे उपलब्ध असुन कलम १ मधील सरकारी जमीनीवरील बेकायदे शीर मालकांची नांवे बेकायदेशीर नोंद नं. ११४४८१ कायम रद्द करून मालक सदरी वरिल प्रमाणे महाराष्ट्र शासन व देवस्थान इनाम वर्ग ३ चे नांव दाखल करणे कायदेशीर व न्यायीक आहे.

५) वरिल कलम १ मधील सरकारी जमीनीवर शासन नियमानुसार शासनाच्या विविध सार्वजनीक योजना, सार्वजनीक शैक्षणीक योजना, बेघर असलेले सरकारी कर्मचारी यांना सार्वजनिक घरकुल योजना, मागास वर्ग गृहनिर्माण संस्था या सारखे विविध शासकिय योजना व प्रकल्प राबविणे करिता मा. बुधाभाऊ दादाजी साळवे, संविधान रक्षक यांनी शासन व जन हितार्थ सुरूकेलेल्या कायदेशीर व न्यायीक कार्यवाही करिता व वरिल सर्व संशयीत आरोपी व संशयीत लोक सेवक आरोपी यांचेवर वर वरिल विविध कायद्यानुसानर मे. सर्वोच्य न्यायालयातील दि.१३/०४/२०१५च्या निकाल पत्रातील आदेशा नुसार वरिल लोकसेवकांनी संगनमताने दुरूपयोग केल्याचे अधिकृत पुराव्या नुसार वरिल प्रमाणे कायदेशीर व न्यायीक कारवाईकरिता सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द केली आहे.

६) नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात दि. ०९/०४/ २०१७ रोजी महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेच्या वतीने महाराष्ट्र शासनाने महसूल विभागाकडे ब्रिटीश कालीन कार्यकारी दंडाधिकारी तथा अन्य दंडाधिकारी पदे ही गृह विभागाचे पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक,ता.पोलीसठाणे यांचेकडे वर्ग करण्याच्या निकाला विरूध्द बेकायदेशीर केलेले अंदोलनातून भारतीय राज्य घटनेतील हक्क अधिकार देण्यास महसूल अधिकाऱ्या सह संबंधीत तहसीलदार व नायब तहसीलदार यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६, महाराष्ट्र जमीन महसूल सुधार अधिनियम २०१६, शासकिय कडई पत्रके देवस्थान इनाम वर्ग ३, निरंतर महार वतन इनाम-६,शासकिय इनाम, सरंजाम इनाम, केंद्रसरकारचे विविध कायद्यांसह विविध संरक्षण कायदे यांचे कायदा शुन्य ज्ञान असल्याचे विविध अधिकृत उपलब्ध पुराव्यावरून महसूल विभागाकडील दंडाधिकारी पद कायम कमी करून वरील प्रमाणे शासनाच्या गृह मंत्रालयाच्या विविध विभाग प्रमुखांकडे वर्ग करण्यासाठी व नाशिक सह महाराष्ट्र भ्रष्टाचार मुक्त व गुन्हेगारी मुक्त सिध्दकरणेसाठी बुधाभाऊ दादाजी साळवे संविधान रक्षक यांनी देश, शासन,न्यासंस्था संविधान, सर्वजनहितार्थ, सन्मानार्थ व सुरक्षेकरीता निर्णायक आंदोलन सुरूकेले आहे. सबब, वरिल कलम १ मधील सरकारी जमीनींचे कोणीही त्रयस्थ व्यक्ती अथवा संस्था यांनी खरेदी विक्री दस्तांसह हस्तांतर करारनामे करूनये, अन्यथा. वरिल विविध कायद्यानुसारच्या होणाऱ्या कायदेशीर व न्यायीक कारवाईस सर्वस्वी जबाबदार राहणार आहात याबाबत गांभीर्याने नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस ही आमचे मार्फत प्रसिध्द केली आहे.

**ठिकाण-नाशिक,**
**दिनांक २६/०४/२०२४**
**श्री. बुधाभाऊ साळवे, संविधान रक्षक**
**मो.नं.८३९०५०२१३६**

**अॅड. शिल्पा पी. जगताप**
**जिल्हा न्यायालय, नाशिक-०२.**
**मो ९८९०६२०६१०**

गांवकरी Classified जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

**शैक्षणिक.**

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी प्रवेश देणे आहे. महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ संचालित

प्रबोधन कन्या वस्तीगृह अंबाठा ता. सुरगाणा जि. नाशिक एकूण प्रवेश ५४ मुलींसाठी इयत्ता ५ ते १० पर्यंत अनु.जाती २६% अनु.जमाती ६९% वि. जा. भ. जं. ३% वि.मा.प्र.वर्ग २% तरि वरिल पत्यावर त्वरित संपर्क साधावा.

**शैक्षणिक.**

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी प्रवेश देणे आहे. महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ संचालित

प्रबोधन वस्तीगृह अंबाठा ता. सुरगाणा जि. नाशिक एकूण प्रवेश १२६ मुलांसाठी इयत्ता ५ ते १० पर्यंत अनु.जाती २६% अनु.जमाती ६९% वि. जा. भ. जं. ३% वि.मा.प्र.वर्ग २% तरि वरिल पत्यावर त्वरित संपर्क साधावा.

**पाहिजेत**

होलसेल मेडिकल एजन्सीसाठी किमान १० वी पास मुली पाहिजेत. वयोमर्यादा १८ ते ३५ भेटा. महादेव एजन्सीज, गोळे कॉम्प्लेक्स, गोळे कॉलनी, नाशिक.

--------------------

नाशिक शहराजवळ असलेल्या फार्म हाऊसवर बंगला साफसफाई व स्वयंपाकासाठी विवाहित निर्व्यसनी जोडपे पाहिजे. राहण्याची सोय. **संपर्क- सकाळी १० ते ५. मो.नं.९०४९०-३४९९९**

**विकत देणे/घेणे**

वृंदावनगर म्हसरूळ- दिंडोरी रोड, नाशिक येथील दुमजली प्रशस्त बंगला विकणे आहे. **संपर्क- ९४२३१७४९८७, ९४२३४८०२४२, ८७८८९३३१०१**

**विकत देणे/घेणे**

हफ्त्यावर नाशिक महानगरपालिके लागून ५.७५ हजारात टायटल क्लिअर प्लॉट घ्या... तेही ९,१२ आणि १५ मी. रोडला आपला प्लॉट चॉईस करण्यासाठी आताच कॉल करा. **संपर्क-९५६१३८२७७७**

**पाहिजेत**

डॉ.आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह व शिक्षण मंडळ येवला संचलित. डॉ.आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह, येवला स्वयंपाकी पदासाठी संपर्क साधा: **मो.९०९६१८९३०९ अधिक्षक**

**नावात बदल**

माझे जुने नाव मुसर्रतबानो इम्रान खान पठाण असे होते आता माझे नवीन नाव **मुसर्रतबानो रऊफ पठाण** असे झाले आहे.**आधार क्रमांक ४२७१ ७९५१ ७०१६ नुसार**

**ज्योतिष**

गायत्री ज्योषित- जन्म कुंडली, कुंडली मिलान, कुंडलीवरून भविष्य कथन, खासगी त्रासावर उपाय. **संपर्क-** ज्योतिषाचार्य, कमलेश शास्त्री, इंद्रकुंड, नाशिक. ९१५६१७८९६९

**पाहिजेत**

कारसाठी अनुभवी, निर्व्यसनी - नासिकरोड रहिवासी ड्रायव्हर पाहिजे. **अर्जासह भेटा-** कागज पॅकेजिंग प्रा. लि. ३ रा मजला, स्टार झोन मॉल, पासपोर्ट ऑफिसच्यावर, नासिकरोड.

**कर्जविषयक**

होम लोन-कॅश सॅलरी असेल, आई.टी.रिटर्न नसेल, कुठलीही अडचण असेल तरीही सिडको, म्हाडा, नाशिकमधील कुठलेही घर घेण्यासाठी, घेतलेल्या घरावर शासकीय/प्रायव्हेट बँकेचे होम लोन करून मिळेल.

**संपर्क- ७०५८६५१९३९, ७२४९२७५९४४, ७०२८८४१९३९, ८४८२९५०७०८**

पत्ता-होम लोन एक्सपर्ट- देविका कन्सल्टन्सी, पवननगर, सिडको, नाशिक.

**नशा मुक्ती**

नको कॅन्सरला आमंत्रण देऊ... दारु...अंमली पदार्थ... गॅरेंटेड सुटण्यासाठी. **डॉ.पालवे-** (9552619752) व्यसन+ टेन्शन + भिती + चिंता+ नैराश्य + हस्तकंप+ निद्रानाश... **(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर डॉ.पालवे-नशामुक्ती...)**

## वाढते तापमान, लग्नसराईमुळे मतदानात घट होण्याची भीती

**यवतमाळ :** यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघात उद्या, शुक्रवारी मतदान होत आहे. या निवडणुकीत महायुती विरूद्ध महाविकास आघाडी अशी लढत होत आहे. शुक्रवारी लग्नाचा मोठा मुहूर्त आहे. शिवाय तापमानही ४० अंशाच्या वर असल्याने त्याचा परिणाम मतदानावर होण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे मतदानाचा टक्का वाढविण्याचे मोठे आव्हान महायुती आणि महाविकास आघाडीसह अन्य पक्षांच्या उमेदवारांसमोर आहे.

पूर्व विदर्भात पहिल्या टप्प्यात कमी मतदान झाले. नागपूर, रामटेक, चंद्रपूर अशा शहरी भागात मतदानाचा टक्का घसरल्याने भाजप, शिवसेना महायुतीच्या गोटात अस्वस्थता निर्माण झाली आहे.

पान १ वरून

### शेतीवरील जीएसटी रद्द

पाटील यांनी आश्वासन दिलं. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षांकडून जाहीरनाम्याला शपथनामा असं नाव देण्यात आलं आहे.

शासकीय नोकऱ्यांमध्ये ज्या रिक्त जागा आहेत त्या भरण्यासाठी प्रयत्न करणार. शासकीय नोकरीमध्ये महिलांचं आरक्षण ५०% ठेवण्याचा प्रयत्न करणार शिवाय अप्रेंटिसशिप करताना सक्तीचं स्टायपेंड देण्याचं कायदा करणार आणि स्पर्धा परीक्षांसाठी आकारण्यात येणार परीक्षा शुल्क बंद करणार असल्याची मोठी घोषणा करण्यात आली.

**महिलांच्या सुरक्षेबाबत विशेष काळजी**

तसेच महिलांच्या सुरक्षेबाबत विशेष काळजी घेणार. शेती करण्याच्या नवनवीन पद्धती आणण्यासाठी प्रयत्नशील राहणार. जातीय जनगणना करण्यासाठी आग्रही भूमिका घेणार. शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र आयोग निर्माण करणार. खाजगी शाळांमध्ये देखील विद्यार्थ्यांसाठी आरक्षणाची सुविधा निर्माण करण्यात येणार. तर ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोगाची निर्मिती करणार असून आरोग्य विषयक सोयी सुविधांसाठी अर्थसंकल्पामध्ये चार टक्के अतिरिक्त निधी देण्याचा प्रयत्न करणार. शिवाय शिक्षणाची अर्थसंकल्पीय तरतूद सहा टक्क्याने वाढवणार असल्याची घोषणादेखील यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून करण्यात आली.

शेतीमालावरील जीएसटी एसटी रद्द करणार. वन नेशन वन इलेक्शन , चीनकडून करण्यात येणारे घुसकरी याबाबत पक्षाचे खासदार संसदेत आवाज उठवणार. सक्षम न्यायव्यवस्था करण्यासाठी आवश्यक बजेट पुरवणार. कामगारांचं वेतन हे चारशे रुपये प्रतिदिन असलं पाहिजे याबाबत सरकारमध्ये आल्यास नियोजन करणार. सरकार आल्यास कंत्राटी भरती रद्द करण्यात येणार .गरिबांसाठी रेशन कार्डाच्या मर्यादित सुधारणा करणार.

### ठाकरे गटाचा वचननामा

आणि महाराष्ट्राचं वैभव पुन्हा प्राप्त करुन देण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. तसेच शेतकऱ्यांना लागणाऱ्या खते आणि बियाणांवरील तसेच शेती उपकरणांवरील सर्व जीएसटी माफ करण्याचे आश्वासन ठाकरे गटाने जाहीरनाम्यात प्रसिद्ध केले आहे.

### वर्षा गायकवाड यांना उमेदवारी

मुंबईतील दोन जागावरील उमेदवार अद्यापही महाविकास आघाडीने जाहीर केलेले नव्हते, या दोन्ही जागा काँग्रेसकडे आहेत. यातील एका जागेवर काँग्रेसने उमेदवाराच्या नावाची घोषणा केली आहे. मुंबई उत्तर मध्य मतदारसंघासाठी नसीम खान, भाई जगताप यांच्यासह इतर काही नावांची चर्चा होती. मात्र, अखेर वर्षा गायकवाड यांच्या मुंबई उत्तर मध्य मतदारसंघातील उमेदवारीवर शिक्कामोर्तब करण्यात आला आहे. खरंतर वर्षा गायकवाड दक्षिण मध्य मुंबई मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासही इच्छुक होत्या. मात्र, त्यानंतर दक्षिण मध्य मुंबईसाठी अनिल देसाई यांच्या नावाची घोषणा झाल्याने वर्षा गायकवाड काहीशा नाराज होत्या.

### मोदींसह राहुल गांधींनाही नोटीस

पाठवली आहे. त्यामुळे आता दोन्ही नेत्यांना निवडणूक आयोगाला उत्तरे द्यावी लागणार आहेत.

लोकसभा निवडणुकीदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका समुदायाचा उल्लेख करत केलेल्या टिप्पणीवर काँग्रेस केंद्रीय आयोगाकडे धाव घेतली. त्यानंतर आयोगाने भाजपला नोटीस धाडली. त्यामुळे आता भाजपला २९ एप्रिलला ११ सकाळी वाजेपर्यंत उत्तर देण्यास सांगितलं आहे.

नरेंद्र मोदी यांच्यासह राहुल गांधी यांच्या एका विधानावरून आयोगाने काँग्रेसला नोटीस धाडली आहे. त्यामुळे त्यांच्या विधानावरून काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना उत्तर द्यावे लागणार आहे. भाजपने राहुल गांधी यांच्या विरोधात तक्रार केली. तर नरेंद्र मोदी यांच्या विरोधात काँग्रेसने तक्रार केली होती.निवडणूक आयोगाने लोक प्रतिनिधित्व अधिनियमांतर्गत ७७ कलमांतर्गत स्टार प्रचारकांच्या पक्षाच्या अध्यक्षांना नोटीस धाडल्या आहेत. त्यामुळे दोन्ही नेत्यांच्या वक्तव्यामुळे त्यांच्या पक्षांच्या अध्यक्षांना आयोगाच्या नोटीसला उत्तर द्यावे लागणार आहे. तसेच पक्षांच्या अध्यक्षांना पाठवलेल्या नोटीसमध्ये नेत्यांनी वक्तव्य जबाबदारीने करावे, असं नमूद केलं आहे. तत्पूर्वी, नरेंद्र मोदी यांनी एका भाषणात एका समुदायाचा उल्लेख करत वक्तव्य केलं होतं. त्या वक्तव्यावरून काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप केला. त्यानंतर भाजपने राहुल गांधी यांचा एका विधानाचा दाखला देत आयोगात तक्रार दिली. त्यामुळे आयोगाकडून दोन्ही नेत्यांना संयम राखून भाषणे करण्यास सांगितलं आहे.

### मविआचे इंजिन एकाच जागेवर ठप्प पडून


यांच्याकडे फक्त आदित्य ठाकरे यांच्यासाठी जागा आहे. यांच्या इंजिनमध्ये फक्त यांच्या परिवारासाठी जागा आहे, सामान्य माणसासाठी नाही. यांच्यासाठी यांचा परिवार दुनिया आहे पण, मोदींजीसाठी संपूर्ण देश त्यांच्या परिवार आहे आणि त्या परिवारासाठी ते काम करतात. म्हणून यांच्या इंजिनची अवस्था अशी आहे, राहुल गांधी इंजिन दिल्लीकडे ओढतात, पवार साहेब बारामतीकडे, उद्धव ठाकरे मुंबईकडे ओढतात, स्टॅलिन दक्षिणेकडे ओढतात. यांचं इंजिन हलतही नाही, डुलतही नाही, एका जागेवर ठप्प पडून आहे, असं म्हणत फडणवीसांनी इंडिया आघाडीवर निशाणा साधला आहे.

### रक्षा खडसे, स्मिता वाघ यांचा अर्ज दाखल

पण या जनतेला माहित आहे की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आम्ही या जिल्ह्यात काय काम केले आहेत. ही निवडणूक फक्त खासदार निवडून देण्यासाठी नाही तर देशाच्या निकासाठी आहे. त्यामुळे आपण सर्वांनी संकल्प करायचा आहे की निवडणूक फक्त रक्षाताई आणि स्मिताताई यांना जिंकवण्यासाठी नाही तर देशाच्या विकासासाठी आहेत, असे मत रक्षा खडसे यांनी व्यक्त केले. स्मिता वाघ म्हणाल्या की, ही जनता मला नक्कीच निवडून आणेल, असं मला या ठिकाणी विश्वास आहे. आज सगळ्या विरोधकांनाही लक्षात येईल की त्यांनी काल आम्हाला आव्हान केलं होतं. आमच्यावर वाटेल तसे ओरडले होते, पण जनता ही सुसंस्कृत आहे. 'जनतेला कळतं, कुणाला मत द्यायचं कुणाला नाही, असे मत स्मिता वाघ यांनी व्यक्त करत येणाऱ्या १३ तारखेला आपण सर्वांनी मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन त्यांनी केले.

# शिंदेंच्या शिवसेनेला धक्का; माजी मंत्र्याचा राजीनामा

**छ. संभाजीनगर :** एकनाथ शिंदेंच्या शिवसेनाला मोठा धक्का बसला असून, मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यादिवशीच शिवसेनेच्या माजी मंत्र्याने राजीनामा दिला आहे.



छत्रपती संभाजीनगरचे शिवसेना नेते माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी प्रातिनिधिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे भाजपच्या दबावाखाली असल्याचा आरोप नवले यांनी केला. शिंदेंसोबत आलेल्यांना लोकसभेचं तिकीट मिळायला हवं होतं, पण भाजपमुळे तसं झालं नाही, असंही ते म्हणाले.

मुख्यमंत्र्यांनी मित्रपक्षाचा दबाव झुगारून जे सोबत आले, त्यांना तिकीट देणे अपेक्षित होतं, उमेदवारी देणं अपेक्षित होतं. कृपाल तुमानी हेमंत पाटील, भावना गवळी यांचा बळी गेला. कदाचित हेमंत गोडसे यांचा देखील बळी जाण्याची शक्यता आहे. हे चित्र कशाचं प्रतिक आहे? असा सवाल नवले यांनी विचारला.

प्रा. सुरेश नवले म्हणाले की, जे शिवसैनिक तुमच्या सोबत आले, ते मित्र पक्षाच्या दबावामुळे आले, तुम्ही त्यांना न्याय देत नाहीत असा महाराष्ट्रात चुकीचा संदेश जातोय. शिवसेनेच्या खांद्यावर बसून भाजप सत्तेची फळ चाखत आहे. शिंदेनी उठाव केला म्हणून सत्तेच्या पालखीत भाजपला बसता आलं. नाही तर भाजपला रस्त्यावरती मोर्चे काढावे लागले असते, उपोषण करावा लागलं असतं.

मुख्यमंत्री मित्र पक्षाच्या दबावाला बळी पडत आहेत असा दावा करत सुरेश नवले म्हणाले की, नाशिकची उमेदवारी या क्षणापर्यंत का जाहीर झाली नाही? हेमंत गोडसेंना पाच वेळेस शक्तिप्रदर्शन करावे लागले हे कशाचं प्रतीक आहे? जे तुमच्या सोबत आले त्यांना एक क्षणाचा विलंब न करता त्यांना उमेदवारी मिळायला हवी होती. अनेकांच्या मनात अशीच खदखद, अनेक शिवसेना नेते, उपनेत्यांना हे आवडत नाही. लोकसभेच्या निवडणुकीनंतर शिवसैनिक आणि जनता याचे उत्तर देईल.

मुख्यमंत्री फक्त लाभधारकांच्या गराड्यात अडकलेत असा आरोप करत नवले म्हणाले की, "आढळराव पाटलांनी शिवसेनेमध्ये प्रवेश केला होता, राष्ट्रवादीसाठी त्यांना तिकडून उमेदवारी मिळवावी लागली हे किती वाईट चित्र महाराष्ट्रात जात आहे. भाजप मुख्यमंत्र्याचा हक्क हिरावून घेत आहे. मुख्यमंत्री आता फक्त लाभधारकांच्या गराड्यातमध्ये दिसत आहेत. त्यांच्याभोवती सर्व लाभधारकांचा गराडा असतो. पण त्यातून काहीही निष्पन्न होणार नाही. मी प्रभू रामचंद्राला साकडं घालतो, मित्रपक्षापासून मुख्यमंत्र्यांचे संरक्षण झालं पाहिजे, तरच शिवसेनेला भवितव्य आहे. जर मित्र पक्षाच्या दबावाखाली शिवसेना अशीच वागत राहिली तर प्रभुरामचंद्र या पक्षाला वाचवो असंही नवले म्हणाले.

**सोबत आलेल्यांना तिकीट मिळालं नाही हे दुर्दैव**

प्रा. सुरेश नवले म्हणाले की, गेल्या दीड-दोन महिन्यांपासून शिवसैनिक, शिवसेना नेते, उपनेते यांच्या मनातील भावना मी व्यक्त केलेल्या आहेत. ज्यांनी सर्वस्व पणाला लावून मुख्यमंत्र्याची सोबत देऊन त्यांचे नेतृत्व मान्य केलं त्यांना उमेदवारी मिळत नसेल तर हे दुर्दैव आहे. एका अर्थाने त्यांचे हे राजकीय बळी देण्याचं काम सुरू आहे. हे मी लोकांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला आणि हाच प्रयत्न बहुदा पक्षातील नेतृत्वाला आवडलेला नसावा.

# शिक्षण खात्याचा मुख्याध्यापकांवर भरवसा नाय का?

## वार्षिक निकाल केंद्रप्रमुखांकडून तपासून घेण्याचा फतवा

**नाशिक : प्रतिनिधी**

माध्यमिक शाळांचे ५ वी ते ८ वीच्या वर्गांचे निकाल तपासणीची शिक्षण विभागाने सक्ती करू नये, कारण मुख्याध्यापकांवर शिक्षण विभागाचा भरवसा राहिला नाही का? असा सवाल करणारे निवेदन नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाने शिक्षणाधिकारी प्रविण पाटील यांना दिले आहे.

शिक्षण विभागाने फतवा काढून सन २३ - २४ या शैक्षणिक वर्षाचा इ ५ वी ते ८ वी या वर्गांचा निकाल केंद्रप्रमुखामार्फत तपासणी करून घेण्या बाबत काही तालुक्यात व महानगरात सक्ती होताना दिसत आहे. यापूर्वी याबाबत कधीही अशा प्रकारच्या निकाल तपासणी करण्याबाबत सूचना नव्हत्या. मुख्याध्यापक स्वतःच्या शाळेचा निकाल तपासणीसाठी सक्षम असताना आपल्या यंत्रणेचा मुख्याध्यापकांवर विश्वास नाही का? मुख्याध्यापकांचे महत्व कमी करायचे का? जिल्हयातील कोणतीही शाळा केंद्रप्रमुखाकडून निकाल तपासून घेणार नाही, असे शिक्षणाधिकारी प्रवीण पाटील यांना मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष एस. के. सावंत, सचिव एस. बी. देशमुख, उपाध्यक्ष प्रदीप सांगळे यांनी ठणकावून सांगितले. आम्ही योग्य तो सकारात्मक निर्णय घेऊ, असे शिक्षणाधिकारी प्रवीण पाटील यांनी सांगितले. त्वरित पत्र काढून हा निर्णय मागे घेऊ, असे आश्वासनही त्यांनी दिले. किशोर पालखेडकर, डॉ. अनिल माळी, डी. जे. रणधीर, भगीरथ घोटेकर, डी. यू. आहिरे, दशरथ जारस, एजाज अहमद, आर. एस. देशमुख, एम. डी. काळे यांच्यासह पदाधिकारी हजर होते.



# गुरुकुल लर्निंग हब शिबिरात बालकांचा सहभाग

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकमध्ये प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या विशेष बालकांच्या उन्हाळी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सर्वसामान्य बालके देखील सहभागी झाली. ५ दिवसांत खेळ, मस्ती, खाऊ यासह नवीन गोष्टी एकत्रित शिकण्याचा आनंद सर्वांनी घेतला.

गुरुकुल लर्निंग हबतर्फे समर कॅम्प अर्थात उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शहराच्या मध्यवर्ती कॅनडा कॉर्नर येथे झालेल्या या उपक्रमात ३ ते १९ या वयोगटातील विशेष बालकांसह सर्वसामान्य मुला - मुलींना देखील सहभागी होण्याची संधी देण्यात आली. शिबिर प्रमुख मोनिका गोडबोले - यशोद व सहकाऱ्यांनी हसतखेळत मार्गदर्शन केले.



परगावच्या मुलांना ऑनलाइन सहभागी करून घेण्यात आले. या शिबिरात कराटे व स्वसंरक्षण, शेतीकामाचा परिचय, गॅस न वापरता सुरक्षितपणे सोपे पदार्थ करणे, कोलाज आर्ट आणि टॅलेंट शो यांचा समावेश होता. लीना काळे, मयूर कारंडे, अनुष्का यशोद, ऋतुजा ढोरे यांनी सहकार्य करून मुलांना मार्गदर्शन केले. सर्वांना सहभाग प्रमाणपत्र व विजेत्यांना अवॉर्ड देण्यात आली. याप्रसंगी पालकांनी समाधान व्यक्त करीत शिबिर संयोजकांना धन्यवाद दिले.

### श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे २८ जूनला प्रस्थान

**पिंपरी :** जगद्गुरू संत शिरोमणी तुकाराम महाराजांची पालखी देहू येथून २८ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. १९ दिवसांचा प्रवास करून हा पायी पालखी सोहळा १६ जुलै रोजी पंढरीत दाखल होईल. १७ ते २० जुलै रोजी हा पालखी सोहळा पंढरपूर येथे मुक्कामी राहणार आहे.

वारकरी संप्रदायाला ज्या क्षणाची आस लागून असते, त्या आषाढी पालखी प्रस्थानाची घोषणा झाली आहे. यंदा पालखी सोहळ्याचे ३३९ वे वर्ष आहे.याबाबतची माहिती देहू देवस्थानाचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी दिली. पालखी सोहळा प्रमुख म्हणून विशाल मोरे, माणिक मोरे, संतोष मोरे महाराज यांची निवड करण्यात आली आहे.

# मुरलीधरनगर येथे साई मंदिराचा वर्धापन दिन साजरा

**इंदिरानगर : वार्ताहर**

हनुमान मंदिराचा व साई मंदिराचा पंधरावा वर्धापन दिन मुरलीधरनगर, पाथर्डी फाटा येथे उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

महिला मंडळ हरिपाठ भजनी मंडळातर्फे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संध्याकाळी पालखी मिरवणूक काढण्यात आली. साई व हनुमान गीतांचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता. यावेळी महाप्रसादाचे वाटपही करण्यात आले. यावेळी मनसे शहराध्यक्ष माजी नगरसेवक सुदाम कोंबडे, माजी नगरसेविका पुष्पा आव्हाड, निलेश साळुंखे, बाळकृष्ण शिरसाठ, मदन ढेमसे, श्रुती नाईक, दादा मेढे, द्वारका गोसावी, राहुल महाराज साळुंखे, धनंजय गवळी, सुनील कोथमिरे, तानाजी गवळी, गिरीश जोशी ,संदीप देवरे व अनेकांनी या ठिकाणी आपली उपस्थिती दिली. यावेळी कार्यक्रमाचे आयोजन मंडळाचे अध्यक्ष संदेश एकमोडे, उपाध्यक्ष संजय गायकवाड, सचिव अण्णासाहेब वाणी, खजिनदार अनिल गायकवाड, सहसचिव संतोष विंचू, गोरख गायकवाड, सहखजिनदार राजेंद्र डावरे, संपत जाधव यांनी केले होते.



# गर्भावस्थेतील बाळात दोष आढळल्याने गर्भपातास परवानगी

**मुंबई :**

गर्भावस्थेतील बाळात दोष आढळल्याने कायद्याने घालून दिलेल्या मुदतीनंतर गर्भपाताला परवानगी मिळाली आहे. परंतु, या दोषामुळेच गर्भपात करतेवेळी बाळ जिवंत जन्माला येऊ नये, असा आग्रह एका महिलेने धरला आहे. या महिलेच्या याचिकेच्या निमित्ताने उपस्थित झालेल्या मुद्याची उच्च न्यायालयाने मंगळवारी गंभीर दखल घेतली. तसेच, या मुद्यावर राज्य वैद्यकीय मंडळाने योग्य तो निर्णय घेण्याचे आदेश दिले.

प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. निखिल दातार हेही या महिलेने केलेल्या याचिकेत सहयाचिकाकर्ते असून वैद्यकीय गर्भपात कायद्यातील काही तरतुदींचा पुनर्विचार करण्याची मागण त्यांनी केली आहे. गर्भपातासाठी घालण्यात येणारे निर्बंध हे याचिकाकर्तीच्या जगण्याच्या अधिकाराचे उल्लंघन असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. न्यायमूर्ती ए. एस. चांदुरकर आणि न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने या महिलेच्या आणि डॉ. दातार यांच्यातर्फे केलेला युक्तिवाद थोडक्यात ऐकला. त्यानंतर, याचिकाकर्तीच्या मागणीवर योग्य तो निर्णय घेण्याकरिता राज्य वैद्यकीय मंडळासह २४ एप्रिलपर्यंत बैठक घेण्याचे आदेश डॉ. दातार यांना दिले.

दरम्यान, याचिकाकर्ती २६-२७व्या आठवड्यांची गर्भवती असताना बाळाच्या हृदयात दोष असल्याचे वैद्यकीय चाचणीत आढळून आले. याच कारणास्तव गर्भपातास परवानगी देण्याच्या मागणीसाठी तिने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. जेजे रुग्णालयातील वैद्यकीय मंडळाने तिला गर्भधारणा संपुष्टात आणण्याची परवानगी दिली. तथापि, जिवंत मूल जन्माला आल्यास, त्याला नवजात अतिदक्षता विभागात ठेवण्यात येते. जिवंत मूल जन्माला येण्याची आणि सरकारी रुग्णालयात तिचा गर्भपात केला जाणार असल्याच्या भीतीपोटी याचिकाकर्तीने पुन्हा उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. तसेच, जिवंत बाळ जन्माला येणार नाही अशा पद्धतीने गर्भपातास परवानगी देण्याची मागणी केली आहे. यानुसार, प्रथम गर्भाच्या हृदयाचे ठोके बंद केले जातात. त्यानंतर, गर्भपात केला जातो. खासगी रुग्णालयात गर्भपाताची प्रक्रिया करू देण्याची मागणीही याचिकाकर्तीने केली आहे.याचिकाकर्तीने गर्भपातावेळी जिवंत बाळ जन्माला येण्याची भीती व्यक्त केली आहे. त्यामुळे, जिवंत बाळ जन्माला न येण्याच्या मुद्द्यावर वैद्यकीय मंडळाने विचार करावा, अशी मागणी याचिकाकर्त्यांच्या वतीने वकील मिनाज ककालिया यांनी न्यायालयाकडे केली. सर्व खाजगी रुग्णालये आणि दवाखानांना २४ आठवड्यांचा गर्भपात करण्याची परवानगी आहे. सरकारी रूग्णालयांप्रमाणे खासगी रुग्णालयांमध्येही गर्भाची चाचणी केली जाते. त्यामुळे, याचिकाकर्तीला तिच्या आवडीच्या रुग्णालयात गर्भपातास परवनगी द्यावी, अशी मागणीही याचिकाकर्त्यांतर्फे केली गेली. परंतु, तूर्तास ही मागणी मान्य न करण्याची विनंती सरकारतर्फे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी न्यायालयाकडे केली.





# देवळाली येथे हनुमान जन्मोत्सव साजरा

**देवळाली कॅम्प : प्रतिनिधी**

देवळाली कॅम्प परिसरात हनुमान जयंतीनिमित्त भल्या पहाटे विविध मंदिरांमध्ये हनुमान जन्मोत्सव व दिवसभर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

येथील मेन स्ट्रीटरोडवरील हनुमान मंदिरात पहाटे माजी उपाध्यक्ष तथा नगरसेवक सचिन ठाकरे सपत्नीक व दत्तेश परदेशी यांच्या हस्ते महाअभिषेक करण्यात आला. हनुमान जन्मोत्सवासोबत दिनेश हाबडे, महेश गायकवाड, अजय चौधरी, मनीष परदेशी, रोहित नानेगावकर, नीलेश बंगाली, कुणाल नानेगावकर, राहुल नानेगावकर आदींच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मंदिराच्या वतीने सकाळच्या आरतीनंतर लाडू व १२ पासून महाप्रसाद वाटप करण्यात आले. सायंकाळी हनुमान चालिसा पठण केले. यशस्वीतेसाठी सरस्वती मित्रमंडळाच्या सर्व सदस्यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रयत्न केले.

जय बजरंग मित्रमंडळाच्या वतीने येथील बालगृह रोडवरील दक्षिणमुखी श्री महारुद्र हनुमान मंदिरात पहाटे अभिषेक व महापूजा करण्यात आली. त्यानंतर युवकांनी बजरंगबली की जयचा जयघोष करत सायंकाळी बँड पथकाच्या तालावर भैरवनाथ मंदिर ते विठ्ठलवाडीपर्यंत मिरवणूक व महाआरती होऊन महाप्रसाद वाटप करण्यात आले. चारणवाडी येथील पाषाण तरुण मित्रमंडळाच्या वतीने भव्य मिरवणूक काढण्यात आली होती.

## दस्त गहाळ झालेबाबतची जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :- नाशिक** येथील **सिडको** च्या **तिसऱ्या (३) योजने** मधील **नेबरहुड पौष, सेक्टर एच-१** मधील **घर/टेनामेंट क्र.एन-३२/एच-१/०३/०३** यांसी चतु:सिमा सिडकोच्या मंजुर प्लॅनप्रमाणे. ही मिळकत **श्री.अशोक दगाजी देवरे** यांचे खरेदी मालकीची आहे. उपरोक्त नमुद मिळकतीचे **मुळ ॲलॉटमेंट लेटर, पझेशन रिसिप्ट व इतर कागदपत्रांची पिशवी ही दि.१८/०४/२०२४ रोजी सिडको कार्यालय, नाशिक या परिसरात मिळकत मालक यांचेकडून गहाळ झालेली आहे.** त्याची सत्यता पडताळुन पाहणेकामी व त्या दस्तांचे आधारे जनतेची, वित्तीय संस्थेची अथवा सिडको व शासकीय कार्यालयाची फसवणूक होवू नये, म्हणून सदरची नोटीस प्रसिध्द करीत आहोत. तत्राप, उपरोक्त नमुद मुळ कागदपत्रे हे कोणाकडे अनावधानाने असल्यास किंवा कोणालाही सापडल्यास किंवा ताब्यात असल्यास त्यांनी सदरची कागदपत्रे कृमया खालील पत्त्यावर लवकरात लवकर सुपूर्द करावे. सबब, उपरोक्त नमुद मुळ कागदपत्रे गहाळ झालेबाबत सदरची नोटीस प्रसिध्द केली असे.

कळावे, ही जाहीर नोटीस. नाशिक. दि.२५/०४/२०२४.

**शब्बीर एस.मुल्ला, ॲडव्होकेट**
एन-९/एम-२/२४/२,नवीन सिडको,नाशिक.मो.९८५०१०४७८४

## नाशिक महानगरपालिका, नाशिक
### वृक्ष प्राधिकरण विभाग
### जाहिर नोटीस

नाशिकरोड विभागातील प्र.क्र.२० मधील स.क्र. २३७/ब२३७अ/२पै/२३७अ२/१अ१अ/१अ/अ५/६/१ नाशिक रोड पोलिस स्टेशन समोर, नाशिक पुणे रोड, नाशिकरोड येथील ०२ कडुनिंब, ०२ स्पॉथोडीया, ०२ काशिद, ०२ सुबाभुळ, ०१ जांभुळ, ०१ महारुख, ०१ आंबा, ०१ विलायती चिंच व ०१ चेरी अशी एकुण १३ वृक्ष तोडणेस परवानगी मिळणेबाबत अधिनियमातील कलम ८ (२) अन्वये वृक्ष प्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर केलेला आहे.

ज्याअर्थी, प्राप्त झालेल्या अर्जाबाबत अधिनियमातील कलम ८ (३) अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन कमाल ०७ (सात) दिवस कालावधीमध्ये हरकती तथा सुचना मागविणेचे सुचीत केले आहे.

त्याअर्थी, अर्जदार यांनी सादर केल्यानुसार एकुण १३ वृक्ष तोडणे / वृक्षांचा विस्तार / ऊंची कमी करणे / पुर्नःरोपण करणे / नाकारणे बाबत तांत्रिक दृष्ट्या शक्य होईल. त्याप्रमाणे प्रस्तावित करण्यात येईल. या अर्जाच्या अनुषंगाने महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ च्या कलमांस अधिन राहुन सदर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. प्रस्तृत प्रकरणी हरकती तथा सुचना असल्यास लेखी स्वरुपात नाशिकरोड विभागीय कार्यालय येथे जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन ७ (सात) दिवसाचे मुदतीत दाखल कराव्यात. मुदतींतर प्राप्त झालेल्या हरकती तथा सुचनांचा विचार केला जाणार नाही.

सही /-
तुषार आहेर
विभागीय अधिकारी तथा
वृक्ष अधिकारी (नाशिकरोड)
नाशिक महानगरपालिका नाशिक

जनसंपर्क/जा.क्र./२४/२०२४/
दि.२५/४/२०२४

मुलगा-मुलगी भेद नको, मुलगी झाली खेद नको.

## जाहीर नोटीस

निशाणी २४

**ॲड.प्रियदर्शिनी प्रतिक पिचा**
१,मारुती चेंबर्स,जिल्हा न्यायालय
नाशिक

**किरकोळ दिवाणी अपिल नं.३९/२०१४**

**नाशिक येथील मे.जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब नाशिक**
**(श्री.बदर साहेब)** यांचे कोर्टात ...

**श्री.गोपाल नथमल शर्मा व इतर** ) **ॲपेलंट**

**विरूध्द**

७) **श्री.गोरखनाथ यमाजी मोरे,** )
वय - सज्ञान, व्यवसाय - मजुरी )
रा.व्दारका, हॉटेल कावेरी समोर, नाशिक. )
८) **सौ.वासंती श्रीरंग देशपांडे,** )
वय - ५७, व्यवसाय - नोकरी ) **रिस्पॉंडंट**
रा.शिवनंदन पार्क, थत्तेवाडी, गंगापुर रोड, )
नाशिक - ४२२००५ )
९) **सौ.राधिका कृष्णा गायधनी,** )
वय - ६४, व्यवसाय - शेती )
रा.घर नं.२२८३, गणेश टेक, जुने नाशिक, नाशिक. )

वर नमूद केलेले **रिस्पॉडन्ट नं.७, ८ व ९** यांना कळविण्यात येते की,

ज्याअर्थी ॲपिलंट यांनी वरील रिस्पॉंडन्ट व इतर यांचे विरुध्द नाशिक येथील मे.डिस्ट्रीक्ट जज्जसाहेब नाशिक यांचे कोर्टात सदरचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलात वर नमूद केलेले रिस्पॉंडन्ट यांनी कोर्टात हजर राहाणे जरूरी आहे आणि ज्याअर्थी रिस्पॉंडन्ट यांच्यावर वर नमूद केलेल्या पत्त्यावर नोटीस पाठवूनही त्याची बजावणी होवू शकत नाही आणि त्याअर्थी मे.कोर्टाच्या नि.२१ वरील आदेशाप्रमाणे ही जाहीर नोटीस काढण्यात आली आहे. या जाहीर नोटीसीने वरील रिस्पॉंडन्ट यांना कळविण्यात येते की, **तारीख २१/६/२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता** सदर अपिलाचे कामी स्वत: अगर अधिकृत प्रतिनिधीव्दारे हजर व्हावे. याप्रमाणे हजर होण्यात कसूर केल्यास तुमचे काही म्हणणे नाही, असे समजून तुमचे विरुध्द एकतर्फा काम चालविण्यात येईल व कायद्याने आवश्यक असलेले व उचित असे हुकूम करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस आज तारीख २४ महिना ०४ सन २०२४ रोजी आमच्या सहीनिशी अथवा या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली असे.

सही/- **लिपिक,** जिल्हा व सत्र न्यायालय,नाशिक (कोर्टाचा शिक्का) सही/- **अधिक्षक,** जिल्हा व सत्र न्यायालय,नाशिक

## महत्त्वाचे

### देवगावला सर्पदंशाने मृत्यू

**लासलगाव : वार्ताहर**

देवगाव (ता. निफाड) येथील मच्छिंद्र विठ्ठल खुळे (५७) हे दि.२४ सकाळी ७ वाजता घराच्या पाठीमागे शौचास जात असताना त्यांच्या उजव्या पायाला सर्पदंश झाला. रावसाहेब खुळे यांनी त्यांना तातडीने उपचारासाठी निफाड उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉ. कोते यांनी त्यांना तपासून मयत घोषित केले. त्यांच्या शवविच्छेदनानंतर लासलगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. स.पो.नि बी. जे. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ना. संदीप शिंदे तपास करीत आहेत.

### विनामूल्य संध्या प्रशिक्षण शिबिर

**नाशिक : प्रतिनिधी**

येथील चतु:शाखीय ब्रह्मवृंद गायरान ट्रस्टतर्फे बुधवार दि. १ ते ७ या कालावधीत रोज सायंकाळी ५ वाजता श्री गोपाल मंगल कार्यालय सरदार चौक, पंचवटी नाशिक येथे संध्या शिकायची इच्छा असणाऱ्यांसाठी विनामूल्य संध्या प्रशिक्षण वर्ग आयोजित केला आहे. या प्रशिक्षण वर्गात वे. शा. सं. विनायक शास्त्री साने आणि वे. शा. सं. नरेश शास्त्री पुजारी हे गुरुजी प्रशिक्षण देणार आहेत. दिनांक ३० एप्रिल ही नाव नोंदणीची अंतिम तारीख आहे. तरी इच्छुकांनी ९८९०६०४६८१ आणि ९६९९०८५५७६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून नावनोंदणी करावी असे आवाहन अध्यक्ष मोहन रानडे, कार्यवाह हेमंत कुलकर्णी, खजिनदार प्रमोद गर्गे, विश्वस्त मनोहर पुजारी, सुभाष जोशी, अविनाश भिडे, अजिंक्य साने, सुधीर कावळे यांनी केले आहे.

# बळीराजाला यंदा दमदार पावसाची अपेक्षा

**लासलगाव : वार्ताहर**

निफाड तालुक्यातील ग्रामीण भागात बळीराजाचे मान्सूनपूर्व शेतीकामे अंतिम टप्प्यात आले असून, आता बळीराजाला जून महिन्यातील चांगल्या दमदार पावसाची अपेक्षा आहे. शेतकऱ्यांचा खरीप हंगाम जरी जूनमध्ये सुरू होत असला तरीही त्यांची शेती मशागतीची पूर्वतयारी मात्र एप्रिलच्या पंधरवड्यापासून सुरू होते व मेच्या पंधरवड्याच्या आत म्हणजेच एक महिन्यात पूर्ण करण्यात येते.



सध्या सर्वत्र वातावरणात बदल होत आहेत. त्यातच राज्यात अधूनमधून अवकाळी पाऊस पडत आहे. त्यामुळे आता अवकाळी पावसाच्या रूपाने हजेरी लावणारा पाऊस गेल्या वर्षी सारखा पुढील जून, जुलै महिन्यात दांडी मारतो की काय, अशी भीती सुद्धा शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

गेल्या वर्षीसुद्धा भारतीय हवामान विभागाने खूप पाऊस पडणार असं भाकीत केले होते, पण झालं उलटच. संपूर्ण राज्यात अत्यल्प पाऊस झाल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली. विशेषतः ग्रामीण भागातील जनतेला या दुष्काळाला सामोरे जावे लागले आणि गेल्या आठवड्यात हवामान विभागाने पुन्हा या वर्षी खूप पाऊस पडेल अशी माहिती दिली. या वृत्तामुळे पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

शेतकरी शेतीची मशागत करून तयार झालेल्या शेतात विविध प्रकारच्या पिकांची लागवड करतो. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजनही बिघडण्याची भीती त्यांना असते. सध्या शेतीच्या कामांना ग्रामीण भागात नांगरणी व वखरणी ट्रॅक्टरच्या सहाय्याने ढेकळे फोडून अशी मशागतीचे कामे सुरू झालेली आहेत. शेती व्यवसायात शेतकऱ्याने जरी आधुनिकतेची कास धरली असली तरीदेखील शेतीच्या कामासाठी बैलजोडीची गरज भासत असते.

> गेल्या वर्षीपेक्षा यावर्षी पाऊस चांगला पडण्याची आशा शेतकरी बाळगून आहेत. पावसाला सुरुवात होण्यापूर्वीच शेतीची कामे संपवायला हवी तसेच दुधाळ जनावरांना व बैलांना लागणारी कोरडी वैरण गोठ्यात साठवून ठेवायला सुरुवात केली जात आहे.
> – **सुनील गवळी,** शेतकरी, ब्राह्मणगाव-विंचूर

या वर्षाच्या सुरुवातीपासून शेतकऱ्याच्या कुठल्याच शेतीमालाला उत्पादन खर्च इतकाही भाव न मिळाल्याने तो आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांकडे बैलजोडी नाही असे शेतकरी बैलजोडी खरेदी करण्यासाठी बैलबाजारात फिरताना दिसत आहेत. त्याचबरोबर बैलजोडीचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यामुळे शेतकरी राजाची बैलजोडी घेण्यास दमछाक होत आहे.



# मोहाडी हायस्कूलच्या प्रकल्पाची राष्ट्रीयस्तरावर निवड

**पिंपळगाव बसवंत : वार्ताहर**

१२ वे राज्यस्तरीय इन्स्पायर अवॉर्ड प्रदर्शन यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड, सातारा या ठिकाणी दिनांक २१ एप्रिल ते २४ एप्रिल रोजी संपन्न झाले. त्यामध्ये राज्यातून १३१ प्रकल्पांची मांडणी करण्यात आली होती. त्यामधून संपूर्ण राज्यातून १३ प्रकल्पांची राष्ट्रीय स्तरावर निवड करण्यात आली. यामध्ये नाशिक विभागातून एकच प्रकल्पाची निवड झाली. आयआयटी दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय प्रदर्शनात सहभागी होण्याची संधी मिळाली.

नाशिक विभागातून के.आर. टी. हायस्कूल मोहाडी, ता. दिंडोरी, जि. नाशिक या शाळेचा स्टोअरेज बोक्स शेलव्हस कम्पोनट्स थिंग्स लोकेटर यूसिंग अरडीनो अँड निओ पिक्सेल एलइडी या प्रकल्पाची राष्ट्रीयस्तरावर निवड झाली. बक्षीस वितरण डॉ. दीपक पिंजारी यांच्या हस्ते झाले. राज्य विज्ञान शिक्षण संस्था नागपूरच्या संचालिका डॉ. राधा अतकरी, राज्य इन्स्पायर अवॉर्ड प्रमुख डॉ. राजकुमार अवसरे, प्रा. राजू नेब, विरल चौधरी, लक्ष्मण पामते, अनंत गुप्ता अहमदाबाद. यामध्ये सहभागी विद्यार्थी यशराज शिंदे, मार्गदर्शक शिक्षक अविनाश पालवी व मंगेश वाळके यांच्या उपकरणाची राष्ट्रीय स्तरावर निवड झाल्याने मविप्र संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, मविप्र दिंडोरी-पेठ तालुका संचालक प्रवीण नाना जाधव, जि. प. माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रवीण पाटील, जि.प. चे सर्व उपशिक्षणाधिकारी, दिंडोरीचे गटशिक्षणाधिकारी चंद्रकांत गवळी, मविप्र शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके, मविप्र शिक्षणाधिकारी डॉ. विलास देशमुख, मविप्र शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, पंचायत समिती दिंडोरीचे सर्व विस्ताराधिकारी, जिल्हा विज्ञान अध्यापक संघाचे अध्यक्ष सचिन शेवाळे, दिंडोरी तालुका विज्ञान अध्यापक संघाचे अध्यक्ष दत्तात्रय वाणी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष सुरेश सोमवंशी, उच्च माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष विजय जाधव, अभिनव बालविकास मंदिरचे अध्यक्ष रामराव पाटील, प्राचार्य बाळासाहेब अडसरे, पर्यवेक्षिका सुनीता भामरे, प्रदीप जाधव, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.




# चैतन्य पाटील एनएमएमएस परीक्षेत राज्यात चौथा

**मंगरुळ : वार्ताहर**

एनएमएमएस परीक्षेत श्री नेमिनाथ जैन विद्यालयातील ६ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त होऊन विद्यालयाने घवघवीत यश मिळवल्याची माहिती विद्यालयाचे प्राचार्य शिवदास शिंदे यांनी दिली.

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांसाठी दरवर्षी विद्यालयामध्ये या परीक्षेचे आयोजन केले जाते. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये आयोजित केलेल्या या परीक्षेमध्ये विद्यालयातील चैतन्य संजय पाटील या विद्यार्थ्याने सर्वसाधारण प्रवर्गातून महाराष्ट्रामध्ये चौथा क्रमांक प्राप्त केला असून, शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेला आहे. विद्यालयातील भावेश भामरे, चैतन्य पगारे, अनुष्का डुंगरवाल, श्रद्धा बरकले, केदार मार्कंड हे विद्यार्थीदेखील शिष्यवृत्तीस पात्र झालेले आहेत.

विद्यालयाच्या या यश संपादणुकीबद्दल विश्वस्त समितीचे अध्यक्ष बेबीलाल संचेती, उपाध्यक्ष दिनेश लोढा, प्रबंध समितीचे अध्यक्ष अजित सुराणा, उपाध्यक्ष अरविंद भन्साळी, मानद सचिव जवाहरलाल आबड, विद्यालयाचे समन्वयक शांतीलाल अलिझाड, महावीर पारख, झुंबरलाल भंडारी, महेंद्र पारख यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या परीक्षेमध्ये सहभागी असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयातील स्पर्धा परीक्षाप्रमुख गंगाधर खैरनार, वैशाली भामरे, हंसराज मोरे यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले. या परीक्षेतील विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल विद्यालयाचे उपप्राचार्य संदीप समदडिया, पर्यवेक्षक रवींद्र पवार यांच्यासह विद्यालयातील सर्वच घटकांनी आनंद व्यक्त केला.

# देवळालीत हनुमान जयंती उत्साहात

**देवळाली कॅम्प : प्रतिनिधी**

देवळाली कॅम्प परिसरात हनुमान जयंतीनिमित्त विविध मंदिरांमध्ये हनुमान जन्मोत्सव धार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचे वाटप करून साजरा करण्यात आले.

येथील बनातचाळच्या हनुमान मंदिरात कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या माजी उपाध्यक्षा कावेरी कासार व रतन कासार यांच्या हस्ते पहाटे रुद्राभिषेक व महाआरती झाली. यावेळी महिलांनी सुंदरकांड पारायण तर युवकांनी हनुमान चालिसाचे पठण केले. महिला भजनी मंडळाच्या मीना शिंगार, नीता धडके, प्रतिभा कासट, नंदिनी खापरे, मंदाकिनी मनोहर, दीपाली शिंदे, ज्योती मोहोड यांनी विविध भक्तिगीते सादर केली. याप्रसंगी उत्तम कासार, चंद्रकांत कासट, सतीश मेवानी, कमल देवाडीगा, पोपटराव जाधव, डॉ. जयश्री अहिरराव, सोमनाथ खातळे, संजय आढाव, प्रकाश कासार, तुषार कासट आदीं-सह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

मेन स्ट्रीटरोडवरील हनुमान मंदिरात पहाटे दत्तेश परदेशी व प्रशांत काजळे यांच्या हस्ते महाअभिषेक करण्यात आला. हनुमान जन्मोत्सवासोबत दिनेश हाबडे, महेश गायकवाड, अजय चौधरी, मनीष परदेशी, रोहित नानेगावकर, वैभव हाबडे, कुणाल नानेगावकर, राहुल नानेगावकर आदींच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मंदिराच्या वतीने सकाळच्या आरतीनंतर लाडू व १२ पासून महाप्रसाद वाटप करण्यात आले. सायंकाळी हनुमान चालिसा पठण केले. यशस्वीतेसाठी सरस्वती मित्रमंडळाच्या सर्व सदस्यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रयत्न केले. जय बजरंग मित्रमंडळाच्या वतीने येथील बालगृह रोडवरील दक्षिणमुखी श्री महारुद्र हनुमान मंदिरात पहाटे अभिषेक व महापूजा करण्यात आली. त्यानंतर युवकांनी बजरंगबली की जयचा जयघोष करत सायंकाळी बँड पथकाच्या तालावर भैरवनाथ मंदिर ते विठ्ठलवाडीपर्यंत मिरवणूक व महाआरती होऊन महाप्रसाद वाटप करण्यात आला.





**लासलगाव : पिंपळगावनजीक ज्येष्ठ नागरिक संघास फेसकॉमचे मान्यता प्रमाणपत्र देताना अशोकनाना होळकर, मनोहर वाघ आदी.**
**(छाया : समीर पठाण)**

# पिंपळगाव नजीक ज्येष्ठ नागरिक संघास फेसकॉमची मान्यता

**लासलगाव : वार्ताहर**

पिंपळगाव नजीक येथे ज्येष्ठ नागरिक संघाची स्थापना करण्यात आली असून, या संघास महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेसकॉम) तर्फे संलग्नीकरणाची मान्यता देण्यात आली आहे. हे मान्यता प्रमाणपत्र ज्येष्ठ नागरिक संघ नाशिक प्रादेशिक विभागाचे व ज्येष्ठ नागरिक संघ लासलगावचे अध्यक्ष अशोकनाना होळकर यांच्या हस्ते व कोषाध्यक्ष मनोहर वाघ यांच्या उपस्थितीत ज्येष्ठ नागरिक संघ पिंपळगाव नजीक यांना देण्यात आले

पिंपळगाव नजीक ज्येष्ठ नागरिक संघाची स्थापना व मान्यता ही अल्प कालावधीत पूर्ण केल्याबद्दल अशोकनाना होळकर यांनी संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले व संघास पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. असेच संघ प्रत्येक गावामध्ये स्थापन करण्यात यावेत. जिल्ह्यामध्ये जास्तीत जास्त संघ स्थापन व्हावेत, अशी भावना अशोकनाना होळकर यांनी यावेळी व्यक्त केली.

याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक संघ पिंपळगाव नजीकचे अध्यक्ष प्रमोद आढाव, उपाध्यक्ष विठ्ठलराव खुटे, खजिनदार भाऊसाहेब सोनवणे, सेक्रेटरी राजेंद्र सावंत, सदस्य मधुकर भोर, केदूजी सोनवणे, उपसरपंच लतीफ तांबोळी, फारुक शेख (मौलाना), रामभाऊ घोडे, विजय खाडे, रतन घोडे, निवृत्ती खुटे यांच्यासह लासलगाव ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. शेवटी संघाचे उपाध्यक्ष विठ्ठलराव खुटे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# पदवीधर संघटनेतर्फे नवनियुक्त केंद्रप्रमुखांचा सत्कार

**दिंडोरी : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पदवीधर शिक्षक व केंद्रप्रमुख संघटनेच्या दिंडोरी शाखेच्या वतीने दिंडोरी गटात पदोन्नतीने नियुक्त झालेल्या केंद्रप्रमुखांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रम अध्यक्ष सेवानिवृत्त केंद्रप्रमुख रामदास धात्रक, ज्येष्ठ मार्गदर्शक राजेंद्र गांगुर्डे, जिल्हा नेते एकनाथ अहिरराव, दिंडोरी तालुकाध्यक्ष जयदीप गायकवाड यांच्या उपस्थितीत झाला. दादासाहेब अहिरे ( केंद्र-जानोरी), नंदलाल अहिरे (केंद्र-कोचरगाव), दादा पारधी (केंद्र-रासेगाव/निगडोळ), गोविंद भोये (केंद्र ननाशी/गांडोळे), सुभाष दंडगव्हाळ (केंद्र वणी/चौसाळे /पिंपळपाडा), देवीदास गांगुर्डे ( केंद्र तळेगाव) यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन शिक्षण विभाग पंचायत समिती दिंडोरी येथे सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हा नेते एकनाथ अहिरराव, पदवीधर पतसंस्था संचालक विजय निकम, तालुकाध्यक्ष जयदीप गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. जिल्ह्यातील कार्यरत पदवीधर शिक्षक व मुख्याध्यापक यांना केंद्रप्रमुखपदी पदोन्नती मिळवून देण्यासाठी संघटनेने न्यायालयात जाऊन प्रयत्न केले व शासनाला केंद्रप्रमुख पदोन्नतीसाठी भाग पाडले. अनेक वर्षांपासून रखडलेली पदोन्नती मिळवून देण्यासाठी पदवीधर संघटनेने प्रशासनाला वेळप्रसंगी निवेदन देत सदरच्या विषयावर प्रकाशझोत टाकत सहकार्यसुद्धा केले व संबंधिताना पदोन्नती मिळवून दिली. हे पदवीधर संघटनेचे मोठे यश असून, नवनियुक्त केंद्रप्रमुख यांनी आपल्या पदाचा व अधिकाराचा वापर करीत दिंडोरीच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी निष्ठेने प्रयत्न करावे, असे आवाहन व शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पदवीधर संघटनेचे जिल्हा नेते एकनाथ अहिरराव, उपाध्यक्ष विजय निकम, कार्याध्यक्ष गोविंद ढेपले, कोषाध्यक्ष रमेश पवार, संघटक मंगलदास गवळी, तुषार भदाणे, विश्वास पाटोळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयदीप गायकवाड यांनी केले तर आभार मंगलदास गवळी यांनी मानले.



# आरोग्य विभागाची देवळालीतील उपाहारगृहांवर कारवाई

## १५ हजारांचा दंड केला वसूल; काही उपाहारगृहांत आढळले एक्स्पायरी मसाले, पदार्थ

**देवळाली कॅम्प : प्रतिनिधी**

येथील नागरिकांसह बाहेरूनही खाण्यासाठी येथे येणाऱ्या एका सुप्रसिद्ध उपाहारगृहासह लामरोडवरील अन्य थाळी व मिठाईच्या दुकानांची अचानक तपासणी करताना लष्करी व देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या अधिकाऱ्यांना एक्स्पायरी डेट असलेले मसाले व अन्य पदार्थ आढळून आले असून, त्यांच्याकडे असलेले सर्व पदार्थ नष्ट करण्यात आले, तसेच ३ ठिकाणी केलेल्या कार्यवाहीत १५ हजार रु. दंड व नोटीस बजावण्यात आल्याची माहिती कॅन्टोन्मेंट बोर्डाचे आरोग्य अधीक्षक अमन गुप्ता यांनी दिली आहे.



फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस मिठाई स्ट्रीट परिसरात बिर्याणीची विक्री करणाऱ्या दुकानात बारा किलो गोमांस आढळून आले होते. त्यानंतर प्रथमच लष्करी व कॅन्टोन्मेंटच्या आरोग्य पथकाने देवळालीसह लामरोडवरील विविध उपाहारगृहे, मिठाई व खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्या दुकानांची काल बुधवार दि.२४ रोजी अचानक तपासणी करत दोषी आढळलेल्या उपाहारगृहांकडून सुमारे १५ हजार रु. दंड आकारला आहे. येथील बेलतगव्हाण रोडवरील आमची माती आमची माणसं या उपाहारगृहांमध्ये स्टेशन हेल्थ ऑफिसरचे आरोग्य अधीक्षक संजय ठुबे, कॅन्टोन्मेंट बोर्डाचे आरोग्य अधीक्षक अमन गुप्ता, निरीक्षक अतुल मुंडे, शिवराज चव्हाण, साजेब सय्यद आदींनी तपासणी केली. त्यात विविध मसाले, दोन-तीन किलो हुसळीमध्ये किडे तर काही मसाल्यांसह मेयॉनीज हे देखील एक्स्पायरी देत उलटूनही वापरात असल्याचे दिसून आले. याशिवाय उपाहारगृहामार्फत तयार केली जाणारी कुल्फीत देखील बुरशी आढळून आली. तापसी पथकाने हे सर्व जागीच नष्ट करण्याच्या सूचना केल्या. खाद्यपदार्थ बाहेर देण्यासाठी वापरात असलेले प्लास्टिकचे डबे निकृष्ट दर्जाचे सापडले. त्यामुळे या उपाहारगृहास ५ हजार दंड व कॅन्टोन्मेंट बोर्डाने नोटीस बजावली आहे. त्यासोबत लामरोडवरील

महासागर थाळी व पवन मिल्क सेंटर येथे प्रतिबंधित प्लास्टिक आढळून आल्याने त्यांनाही ५ -५ हजार रु. दंड आकारण्यात आल्याचे कॅन्टोन्मेंट बोर्डाचे आरोग्य अधीक्षक अमन गुप्ता यांनी प्रसिद्धीमाध्यमांशी बोलताना सांगितले.

# व्ही. एन. नाईक महाविद्यालयात निरोप समारंभ

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक येथील क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वाणिज्य विभागाअंतर्गत तृतीय वर्ष वाणिज्य वर्गाचा निरोप व शुभेच्छा समारंभ प्राचार्य डॉ. संजय सानप यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात झाला.



कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिवीर वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाले. याप्रसंगी वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डॉ. धीरज झाल्टे, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. शरद काकड, डॉ. रूपाली सानप, डॉ. अर्चना हत्ते, प्रा. वैशाली वाघ, प्रा. रेश्मा कुटे, प्रा. महेश आव्हाड, प्रा. नवनीतकौर धाडीयल यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. सानप म्हणाले की, आई-वडिलांच्या स्वप्नपूर्तीसाठी विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी ठेवून व परिश्रम करून जबाबदारीने वाटचाल करावी. सोशल मीडियाचा अनावश्यक वापर युवकांनी टाळला पाहिजे. शिक्षकांच्या वतीने डॉ. धीरज झाल्टे यांनी मनोगत व्यक्त करून भावी उज्ज्वल वाटचालीस विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या तसेच विद्यार्थ्यांनी महाविद्यालय विकासास आगामी काळात योगदान देण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या वतीने आरती सांगळे हिने मनोगत व्यक्त करून महाविद्यालयातील आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमाचे बहारदार असे सूत्रसंचालन गीता काळे हिने केले तर आभार आरती पगार हिने मानले.

विद्यार्थीवर्गातर्फे याप्रसंगी महाविद्यालयास पुस्तकांचा संच भेट म्हणून देण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य तसेच वाणिज्य विभागप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली दृष्टी भोज, अनुराग चकोर, गोकुळ काकड, वेदांत पिंगळे, दूर्वेश गडकरी, ऋषिकेश कोठुळे, रोशन सावंत, शंतनू मंडलिक, ऋषिकेश गिते, अश्विनी कांक, कल्पेश कोंडे यांच्यासह विद्यार्थीवर्गाने परिश्रम घेतले.





## वारे निवडणुकीचे..

### राज्यातील नेत्यांमुळेच रखडली खडसेंची घरवापसी



**जळगाव :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने राष्ट्रवादी शरद पवार गटाला मोठा धक्का देत एकनाथ खडसे यांना भाजपमध्ये प्रवेश देण्याचं सांगितलं. एकनाथ खडसेंसारखा ओबीसी नेता पक्षात आणून भाजपने ओबीसी मतदार त्यांच्याकडे कसे येतील याची तयारी केली, जरी ते निवडणूक लढवणार नसले तरी त्यांचं पक्षात असणं हे भाजपमध्ये अत्यंत फायद्याचं ठरु शकतं. पण, एकनाथ खडसे भाजपमध्ये प्रवेश घेणार याला आता जवळपास २० दिवस उलटूनही त्यांचा अधिकृत भाजप प्रवेश काही झालेला नाही. पक्षप्रवेश का आणि कोणामुळे रखडला याचं कारण आता समोर आले आहे. राज्यातील तीन प्रमुख नेत्यांमुळे एकनाथ खडसे यांचा भाजप प्रवेश रखडल्याची माहिती आहे. राज्यात एक कार्यक्रम घेऊन एकनाथ खडसेंना सोबत घ्या, असं केंद्राकडून सांगण्यात आलं आहे. मात्र, तरीही अद्याप एकनाथ खडसे यांच्या भाजप प्रवेशाचा मुहूर्त काही ठरलेला नाही. यादरम्यान, राज्यातील तीन वरिष्ठ नेते खडसेंच्या भाजप प्रवेशाबाबत उदासीन असल्याची माहिती आहे. एकनाथ खडसेंना आताच भाजपमध्ये घेतलं तर निवडणुकांमध्ये गटातटाचं राजकारण सुरु होईल. त्यामुळे लोकसभा निवडणुकीनंतर त्यांचा भाजप प्रवेश व्हावा, अशी भूमिका राज्यातील भाजपच्या नेत्यांनी घेतल्याची माहिती आहे. खडसेंच्या भाजप प्रवेशाबाबत कोणाचीही आडकाठी नाही, असे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. केंद्राने जर निर्णय केला आहे, तर त्यामध्ये राज्य काहीही आडकाठी करत नाही, केंद्र समिती अंतिम निर्णय घेईल., त्या समितीच्या बैठकीनंतर पक्ष प्रवेशाचा निर्णय होईल.

# काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात प्रियंका गांधी रिंगणात



स्वतंत्र भारताच्या पहिल्या निवडणुकीपासून म्हणजे १९५२ पासून रायबरेली लोकसभा मतदारसंघ गांधी घराण्याचा परंपरागत मतदारसंघ असल्याचे दिसून येते. आता २०२४च्या लोकसभा निवडणुकीत रायबरेली लोकसभा मतदारसंघातून काँग्रेस पक्षाकडून पुन्हा एकदा गांधी घरातील सदस्याला उमेदवारी देण्याची शक्यता आहे. गेली अनेक वर्षे सोनिया गांधी यांनी रायबरेली मतदारसंघाचे नेतृत्व केले आहे. यावेळी मात्र त्यांनी लोकसभेऐवजी राज्यसभेतून संसदेत जाण्याचा निर्णय घेतला. आता उत्तर प्रदेशमधील जागा वाटपात रायबरेलीची जागा काँग्रेसकडे राहिल्याने या मतदारसंघातून कोणाला उमेदवारी दिली जाते, याची उत्सुकता लागली आहे.

लोकसभा निवडणुका जाहीर होण्याच्याआधी रायबरेलीतून राहुल गांधींच्या नावाची चर्चा होती. पण त्यांनी वायनाड मतदारसंघ कायम ठेवला. नंतर भाजपने उमेदवारी नाकारलेले पिलभीतचे खासदार वरुण गांधी यांच्या नावाची देखील चर्चा झाली. आता काँग्रेसकडून महासचिव प्रियंका गांधी रायबरेलीतून निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. लवकरच त्यांच्या उमेदवारीची घोषणा होणार असून, त्या १ ते ३ मेपर्यंत आपला उमेदवारी अर्ज भरण्याची शक्यता आहे. त्यामुळे गांधी घराण्यातील आणखी एक सदस्य निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याची शक्यता आहे.

रायबरेली अणि गांधी घराण्याचं नातं गेली अनेक वर्षे असून, गेली अनेक वर्षे या मतदारसंघातून गांधी परिवारातील सदस्य निवडून येत आहे. १९५२ साली स्वतंत्र भारताच्या पहिल्या लोकसभा निवडणुका पार पडल्या होत्या. १९५२ साली फिरोज गांधी यांनी या मतदारसंघातून पहिल्यांदा निवडणूक लढून ते जिंकून आले होते. तेव्हापासून हा मतदारसंघ गांधी घराण्याचा पारंपरिक मतदारसंघ राहिला आहे.

अशा प्रकारे फिरोज गांधी १० वर्षे, इंदिरा गांधी १० वर्षे आणि सोनिया गांधी २० वर्षे असं गेल्या ७६ वर्षांमध्ये ४० वर्षे रायबेली मतदारसंघावर गांधी घराण्याचं वर्चस्व राहिलं आहे. आणि आता प्रियंका गांधी या मतदारसंघातून नशीब अजमावण्याची शक्यता आहे. रायबरेली मतदारसंघावर सध्या काँग्रेसचं वर्चस्व आहे, पण आता स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणं खूप बदलली आहेत. त्याला कारण म्हणजे मोठ्या प्रमाणात झालेली पक्षांतरे. गेल्या ५ वर्षांत अनेक मोठ्या नेत्यांनी काँग्रेस पक्ष सोडला आहे.

सध्या या मतदारसंघावर भारतीय जनता पक्षाने मोठी पकड बनवली आहे. या ठिकाणच्या काँग्रेसच्या एकमेव आमदार अदिती सिंह यांनी सुध्दा मागच्या विधानसभा निवडणुकीत भाजपमध्ये प्रवेश केला. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत अदिती सिंह यांच्या एकमेव विधानसभा मतदारसंघातून सोनिया गाधींना आघाडी होती. पण या ५ वर्षांत पुलाखालून बरंच पाणी गेलं आहे. सध्या काँग्रेसचा एकही आमदार या लोकसभा मतदारसंघात नाही. आता प्रियंका गांधी यांना उमेदवारी मिळते का? आणि जर मिळाली तर त्यांच्यासाठी ही लढाई किती सोपी असेल हे पाहावं लागणार आहे.

१) फिरोज गांधी - १९५२ ते १९६२
२) इंदिरा गाधी - १९६७ ते १९७७
३) सोनिया गांधी - २००४ ते २०२४.











### जिल्हाधिकारी कार्यालयातील कक्ष सज्ज

**लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीतील महत्त्वाचा टप्पा असलेल्या उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला आजपासून प्रारंभ होत आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात जय्यत तयारी प्रशासनाने केली आहे. स्वागत कक्ष, माहिती कक्ष आणि सज्ज असलेला जिल्हाधिकारी कार्यालयातील परिसर. (सर्व छायाचित्रे : रविकांत ताम्हणकर)**

### ग्रामीण भागात प्रचाराचा धडाका

**नाशिक : प्रतिनिधी** नाशिक शहरासह जिल्हा भरात प्रचाराचा धुरळा उडत असून, महाविकास आघाडीबरोबरच वंचित बहुजन आघाडीनेही आपला उमेदवार जाहीर केल्यामुळे मतदारांच्या गाठीभेटींवर सद्या भर दिला जात आहे. प्रचारासाठी अवघे २५ दिवस उरले आहेत. त्यामुळे सकाळी सातपासूनच उमेदवार प्रचारासाठी बाहेर पडत आहे. त्यातही ग्रामीण भागात दुपारी उन्हामुळे शुकशुकाट दिसून येत आहे. तरीही उमेदवार गावोगावी भेटी देताना दिसत आहेत.

## परभणीत जानकरांकडून मतदारांना पैशांचे वाटप

### महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा आरोप



**परभणी :**

परभणी लोकसभा मतदारसंघात यावेळची निवडणूक पूर्णतः वेगळी आहे. विरोधकांच्या वतीने सुरुवातीला ओबीसी मराठा वाद लावण्याचा प्रयत्न केला. पण ओबीसी-मराठा वाद लावूनही जेव्हा आपला विजय होत नाही हे जानकरांच्या लक्षात आल्यानंतर त्यांच्याकडून आता परभणी लोकसभा मतदारसंघात जोरदार पैशांचे वाटप सुरू करण्यात आले आहे, असा आरोप महाविकास आघाडीचे उमेदवार संजय जाधव यांनी केला आहे.

विरोधकांकडून पैसे वाटप होत असताना पोलीस प्रशासन आणि निवडणूक आयोग मात्र गप्प बसलेले आहे. परभणी जिल्ह्यात लोकशाहीची क्रूर चेष्टाच केली जात आहे, असे म्हणत निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांच्या दावणीला बांधला गेल्याचा गंभीर आरोप महाविकास आघाडीचे उमेदवार संजय जाधव यांनी केला आहे. संजय जाधव म्हणाले, बुधवारी रात्री त्या संबंधित प्रकरणात माझे कार्यकर्ते नव्हते. पण तरीदेखील माझ्या लोकांवर खोटे गुन्हे दाखल करून त्यांना निवडणूक प्रचारापासून अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न विरोधक करत आहेत. माझ्या कार्यकर्त्यांना मोठ्या प्रमाणावर नोटिसा पाठविण्यात येत आहेत. विरोधकांकडून माझ्या कार्यकर्त्यांना त्रास देण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्या प्रकरणाशी माझा कसलाही संबंध नाही. पुढे बोलताना संजय जाधव म्हणाले की, महादेव जानकर म्हणतात की मी फकीर आहे. मी कोठेही झोपतो मग जानकारांकडे एवढा पैसा कुठून आला? आज मतदारसंघात प्रचंड पैशांचा पाऊस पाडला जातोय, जातीजातीत भांडणे लावून काही फायदा होत नाही, असे दिसून आले की आता 'लक्ष्मी' अस्त्राचा वापर केला जात आहे. बुधवारी सायंकाळी सहा वाजता प्रचार संपला. मग रात्री बारा वाजता महादेव जानकर यांची गाडी शहरामध्ये काय करत होती? असा सवाल संजय जाधव यांनी उपस्थित केला.

## काँग्रेस पक्षाचा जाहीरनामा कार्यकर्त्यांनी घरोघरी पोहोचवावा : आकाश छाजेड

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक नाशिक शहर काँग्रेस सेवा दलाच्या वतीने संपूर्ण नाशिक शहरामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने जाहीर केलेला जाहीरनामा प्रत्येक नागरिक व मतदारापर्यंत पोहोचवण्याकरिता काँग्रेस सेवा दलाच्या माध्यमातून चौक सभेचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने बुधवार दि. २४ एप्रिल रोजी नाशिकरोड इथून त्याची सुरुवात होऊन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा नाशिकरोड व वास्को चौक नाशिकरोड येथे चौक सभेला नागरिकांचा मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळाला.




भारतीय जनता पार्टीने गेल्या दहा वर्षांत संपूर्ण देशामध्ये महागाई, बेरोजगारी, जीएसटीच्या नावाखाली सर्वसामान्यांच्या खिशात हात घालण्याचे काम केले असून, त्याचा पर्दाफाश या चौक सभेमधून करण्यात आला. येणाऱ्या दिवसांमध्ये काँग्रेस सेवा दलाचे कार्यकर्ते मतदारांच्या घरापर्यंत जाऊन काँग्रेस पक्षाने जाहीर केलेला जाहीरनामा पाच न्याय प्रत्येक कुटुंबातील गरीब महिलांना वर्षाला एक लाख रुपये, शेतकऱ्यांना कर्जमाफी व हमीभाव डॉ. स्वामीनाथन आयोगानुसार. २५ लाख रुपयांचा आरोग्य विमा, तीस लाख सरकारी नोकरभरती, जातीनिहाय जनगणना अशा ठळक जाहीरनाम्यातील मुद्दे जनतेपर्यंत घरोघरी काँग्रेस सेवा दलाचे कार्यकर्ते पोहचवणार आहे.

चौकसभेप्रसंगी नाशिक शहर काँग्रेस अध्यक्ष आकाश छाजेड, नाशिक शहर काँग्रेस सेवादलाचे अध्यक्ष डॉ. वसंत ठाकूर, माजी नगरसेवक पोपटराव हगवणे, आशाताई तडवी, नाशिकरोड ब्लॉक काँग्रेस सेवादलाचे अध्यक्ष सिद्धार्थ गांगुर्डे, नाशिकरोड ब्लॉक काँग्रेसचे अध्यक्ष दिनेश निकाळे, महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष वंदना पाटील, अनुसूचित जाती जमाती सेलचे अध्यक्ष मुन्ना ठाकूर, धोंडीराम बोडके, सिडको ब्लॉक काँग्रेस सेवादलाचे अध्यक्ष अशोक लहामगे, पंचवटी ब्लॉक काँग्रेस सेवा दलाचे अध्यक्ष संदीप वाघ, मध्य नाशिक ब्लॉक काँग्रेस सेवादलाचे अध्यक्ष अनिल बॅग, ज्ञानेश्वर चव्हाण, अण्णा मोरे, उमेश चव्हाण, प्रा. भालचंद्र पाटील, प्रा. प्रकाश खळे, ॲड. आडके जावेद, इब्राहिम जगदीश वर्मा, कामिल इनामदार, किरण लोखंडे, दशरथ साळवे, अलथमेश शेख, प्रवीण काठे, फारुख मन्सुरी, सदाशिव बोराडे, तोफिक शेख, लहू जाधव, चंदू सोडे, राजन बनसोडे, जहीर अली, कामगार नेते आजीज शेख, बाळासाहेब कासार, अल्ताफ सय्यद, कल्पेश भालेराव, सुहास गांगुर्डे, इजाज शेख, गणेश घोडेराव, संतोष हिवाळे, दत्ता कासार, विनायक ठाकूर, नितीन साळवे, ॲड. सतीश हाके आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# राजकीय निवडणूक जाहीरनामा.... फक्त नावापुरता

राजकीय निवडणुकीचा जाहीरनामा म्हणजे तुम्ही एखादा पक्ष किंवा उमेदवाराला मत का द्यावे ही कल्पना विकण्यासाठी राजकीय पक्षाचा लिखित दस्तऐवज! सद्य परिस्थितीत सांगायचे झाल्यास 'राजकीय जाहीरनामा' हे एक प्रकारचे मार्केटिंग ब्रोशर आहे. परंतु पक्ष/उमेदवार त्यात लिहिलेल्या गोष्टींना बांधील नसतो. लोकांना मतदारांना आकर्षित करण्याची संधी 'जाहीरनामा' देत असतो. आपण (उमेदवार) किंवा पक्ष येणाऱ्या पाच वर्षात काय काय करणार आहोत हे मतदारांना पटवून देण्यासाठी 'जाहीरनामा' हे एक प्रभावी माध्यम होय. तथापि कोणत्याही पक्ष/उमेदवाराच्या 'जाहीरनामा'ला कायदेशीर चौकटीत बांधिलकी नसते.

सत्तेवर येण्यासाठी 'जाहीरनामा'त आश्वासने देण्याचा अधिकार प्रत्येक राजकीय पक्षाला आहे, परंतु ही एक प्रकारची 'रेवडी संस्कृती' आहे (मते मिळवण्यासाठी मतदारांना खुश करणाऱ्या मोफत सेवा-सुविधा देणे). कारण सत्तेवर आल्यानंतर उमेदवार/पक्ष यांनी आश्वासनांची किती पूर्तता झाली याचा हिशेब मतदारांना कोणीही देत नाही.

आपल्या देशात निवडणुका आल्या की, सगळ्याच पक्षांचे 'जाहीरनामा' जाहीर होतात. मात्र, निवडणुकानंतर त्याचं काय होतं? हे गुलदस्त्यातच राहते. मतदारांना राजकीय पक्षाने जाहीर केलेल्या जाहीरनाम्यासंदर्भात जाणून घेण्याचा कायद्याने अधिकार असायला हवा. प्रत्येक निवडणुकीवेळी मागील आश्वासनांसंदर्भात राजकीय पक्षांनी पुढील निवडणुकीत माहिती देणं बंधणकारक करायला हवं. अन्यथा राजकीय निवडणूक जाहीरनामा हा फ़क्त नावापुरताच राहील.

निवडणूक जाहीरनाम्यांचे महत्त्व ओळखून, मा. सर्वोच्च न्यायालयाने भारतीय निवडणूक आयोगाला जाहीरनाम्यांचे स्वरूप ठरविणारी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यासाठी निर्देशित केले होते. भारतीय निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांशी सल्लामसलत करून निवडणूक जाहीरनाम्यांबद्दल काही दिशानिर्देश जाहीर केले होते. परंतु आयोगाने या गोष्टीची नोंद घेतली नाही की, मतदाराला निवडणूक जाहीरनाम्यांतील त्या आश्वासनांचे पुढे काय झाले? हे जाणण्याचा अधिकार असणे आवश्यक आहे.

पुढील निवडणूक होण्याआधी राजकीय पक्षाने किंवा उमेदवाराने दिलेल्या त्याच्या मागच्या निवडणूक जाहीरनाम्यातील आश्वासनांचे नक्की काय झाले? हे उघड न केल्याने मतदार त्याची माहिती मिळवण्याच्या हक्कापासून वंचित राहतो व त्याची योग्य निर्णय घेण्याची क्षमता हिरावून घेतली जाते.

निवडणूक जाहीरनाम्याचा मसुदा हा राजकीय पक्ष व त्यांचे उमेदवार हे सामान्यत: आगामी निवडणुका डोळ्यांसामोर ठेवून बनवितात आणि त्याला प्रसिद्धी देखील करतात. राजकीय पक्ष व उमेदवार हे निवडणुकीत मतदारांना आश्वासने देऊन मत मिळवतात. परंतु ती आश्वासने कितपत पूर्ण झाली याबद्दल मात्र मतदारांना अंधारात ठेवतात. राजकीय पक्ष व उमेदवार यांना त्यांचा निवडणूक जाहीरनाम्यातील प्रत्येक न पूर्ण केलेल्या आश्वासनासाठी जबाबदार धरणे कठीण आहे. परंतु सद्य निवडणुकीला सामोरे जाताना त्यांनी मागच्या निवडणुकीच्यावेळी केलेल्या आश्वासनांचे नक्की काय झाले? हे जाहीर करायला हवे.

आत्तापर्यंत उमेदवार ते संबंधित असलेल्या राजकीय पक्षाच्या जाहीरनाम्याचा प्रचार करत असत. परंतु गेल्या काही निवडणुकांपासून वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे उमेदवार हे त्यांच्या मतदारसंघातील समस्यांना ध्यानात घेऊन त्यांचा स्वतःचा जाहिरनामा प्रसिद्ध करीत असतात. ते जर निवडून आले तर मतदारसंघातील समस्या ते कशा प्रकारे सोडवतील? या गोष्टींचा ऊहापोह अशा जाहीरनाम्यात केला जातो. कोणताही पक्ष व उमेदवार त्यांचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यापूर्वी मतदार स्वतः कारणमीमांसा करतील. ज्यामुळे निव्वळ मत मिळवण्यासाठी दिलेल्या खोट्या




आश्वासनांवर आळा बसेल. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९(१)(अ) मध्ये मतदारांना त्यांच्या उमेदवाराविषयी माहिती असणे आणि कोणत्याही नागरिकाने त्याचा मताधिकार वापरण्यापूर्वी उमेदवाराच्या कार्यकाळातील कामगिरीबद्दल जाणून घेण्याचा हक्क समाविष्ट आहे. तसे पाहू गेले तर निवडून आलेला पक्ष म्हणजेच सत्ताधारी यांनाच निवडणुकीआधी आपल्या मतदारांना जाहीरनामात दिलेल्या आश्वासनांची नैतिक काळजी करण्याची गरज असते. कारण हरलेला पक्ष किंवा उमेदवार यांचेवर ती जबाबदारी तशीही राहत नाही.

निवडणूक आयोगाने नुकतेच जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार आगामी लोकसभा निवडणुकीत ९६.८८ कोटी लोकांनी मतदानासाठी नोंदणी केली आहे. भारतीय निवडणूक आयोगाच्या २३ मार्च २०२४ च्या नवीनतम प्रकाशनानुसार आणि त्यानंतरच्या अधिसूचनानुसार आपल्या देशात जवळपास २७६४ राजकीय पक्ष आहेत. त्यामध्ये ६ राष्ट्रीय पक्ष व ५७ राज्यस्तरीय पक्ष आहेत. निवडणूकांच्या वेळी प्रत्येक पक्ष आपले जाहीरनामे प्रसिद्ध करत असतात. सध्या भाजप हा सगळ्यात मोठा पक्ष असून, त्यानंतर काँग्रेस हा पक्ष आहे. त्यामुळे या दोन्ही पक्षांच्या निवडणूक जाहीरनामांची दखल सगळ्यांनाच घ्यावी लागते. परंतु गेल्या दहा वर्षात महागाई, शेतकऱ्यांचे दुप्पट उत्पन्न, बेरोजगारी तसेच ईपीएफ्फ ९५ च्या निवृत्ती धारकांच्या निवृत्तीवेतनात वाढ करण्याचे आश्वासन दिले होते ते अपूर्णच आहे. तसेच देशातील मोठी शहरे स्मार्ट सिटी बनवण्यासारखे अनेक आश्वासने भाजपकडून अद्याप परिपूर्ण झालेले नाही. काँग्रेसने सुद्धा आपल्या जाहीरनाम्यात उजव्या विचारसरणीवर मात करणारा कार्यक्रम मांडला आहे. तरुणांना सरकारी नोकऱ्या, शेतकऱ्यांना कर्जमाफी अशी काही महत्त्वाची आश्वासने दिली आहेत. गरिबी हटावचा नारा काँग्रेसने पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपासून दिले.

**संजय जोरे**

आपल्या देशात निवडणुका आल्या की, सगळ्याच पक्षांचे 'जाहीरनामा' जाहीर होतात. मात्र, निवडणुकानंतर त्याचं काय होतं? हे गुलदस्त्यातच राहते. मतदारांना राजकीय पक्षाने जाहीर केलेल्या जाहीरनाम्यासंदर्भात जाणून घेण्याचा कायद्याने अधिकार असायला हवा. प्रत्येक निवडणुकीवेळी मागील आश्वासनांसंदर्भात राजकीय पक्षांनी पुढील निवडणुकीत माहिती देणं बंधणकारक करायला हवं. अन्यथा राजकीय निवडणूक जाहीरनामा हा फक्त नावापुरताच राहील.

परंतु अद्यापही देशातील गरिबी हटलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. अगदी ताजे उदाहरण द्यायचे झाल्यास नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारने २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत दिलेल्या काही आश्वासनांपैकी पूर्ण न झालेली महत्त्वाची आश्वासने खालील प्रमाणे सांगता येतील. देशातील सर्व शेतकऱ्यांना किसान सन्मान निधीचा लाभ. देशातील सर्व दुकानदारांना छोट्या दुकानदारांना पेन्शन देणार. प्रादेशिक विकासातील असंतुलन संपवणार. २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार. २०२४ पर्यंत नल पेजल ही योजना सुरू करणार. सर्व महिला मुलींना एका रुपयात सॅनिटरी पॅडचे वितरण करणार. संसदेत तसेच राज्यातील विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळणार इत्यादी.

तथापि मोदी सरकारने २०१९ च्या निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांपैकी राम मंदिर बांधकाम पूर्ती, तीन तलाक व निकाह हलाल यासारख्या प्रथेचे निर्मूलन करण्यासाठीचा आवश्यक तो कायदा, मुद्रा योजनेंतर्गत नव उद्योजकांना आर्थिक मदत, जम्मू काश्मीरमधील वादग्रस्त ३७० कलम रद्द करणे यासारखी महत्त्वाची आश्वासने पूर्ण केलेली आहेत.

आपल्या देशात कोणताही राजकीय पक्ष आरटीआय अंतर्गत माहिती उघड करण्यास उत्तरदायी नाही. अशा परिस्थितीत देशातील नागरिकांना जाहीरनाम्यांतील आश्वासनांच्या पूर्ततेची सद्य स्थिती जाणून घेण्यास कोणताही पर्याय उरलेला नाही. समावेशक लोकशाहीचे स्वरूप टिकविण्यासाठी मतदारांचे योग्य पद्धतीने प्रबोधन होणे आवश्यक आहे. हे अत्यंत महत्त्वाचे आहे की, नागरिकांनी कोणत्याही असंबद्ध कारणांनी प्रभावित न होता उमेदवाराला व्यवस्थित पारखल्यावरच मतदान करणे हे देश हिताचे ठरेल!

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

■ www.gavakari.online ■ gavakari.in ■ gavkarinews.com

■ नाशिक, शुक्रवार, दि. २६ एप्रिल २०२४



■ बळीराजाला यंदा दमदार पावसाची अपेक्षा ▸▸ पान ६



■ आरोग्य विभागाची देवळालीतील उपाहारगृहांवर कारवाई ▸▸ पान ६

# आजपासून उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ

## जिल्हा प्रशासन सज्ज

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक व दिंडोरी लोकसभा निवडणुकीसाठी आज शुक्रवार दि. २६ पासून अर्ज भरण्यास प्रारंभ होणार असून, त्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज असल्याची माहिती जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब पारधे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. शशिकांत मंगरूळे उपस्थित होते.

नाशिक लोकसभा निवडणुकीसाठी शुक्रवार दि. २६ पासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास प्रारंभ होणार असून, शुक्रवार दि. ३ मे पर्यंत सार्वजनिक सुटीचे दिवस वगळता उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत असणार आहे. या कालावधीत ११ ते ३ या वेळेत निवडणूक निर्णय अधिकारी अर्ज दाखल करून घेतील. तर अर्जाची छाननी शनिवार दि. ४ मे सकाळी ११ वाजेपासून निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात होणार आहे. तर उमेदवारी मागे घेण्याची तारीख सोमवार दि. ६ मे ११ ते ३ वेळेपर्यंत घेता येणार आहे. तर नाशिक लोकसभेसाठी २० मे रोजी मतदान होणार आहेत तर ४ जून रोजी केंद्रीय वखार महामंडळ गोदाम, अंबड येथे मतमोजणी होणार आहे. दिंडोरी मतदारसंघात १८ लाख ५१ हजार ९७२ मतदार आहेत. नाशिक मतदारसंघात २० लाख २४ हजार ८५ मतदार आहेत. दिंडोरी मतदारसंघातील १९२२ मतदान केंद्रांवर १८२ क्षेत्रीय अधिकारी व ११ हजार ७७६ मतदान अधिकारी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. तर नाशिक लोकसभा मतदारसंघाकरिता १६८ क्षेत्रीय अधिकारी व १२ हजार ६१८ इतके मतदान अधिकारी, कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.



### आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी भरारी पथके

नाशिक व दिंडोरी मतदारसंघात प्रत्येकी २२ भरारी पथके असणार आहेत. तर तसेच नाशिक मतदारसंघात ३८ स्थायी पथके तर दिंडोरी ४४ स्थायी पथके असतील. त्याचप्रमाणे चलचित्र सर्वेक्षण पथके नाशिक व दिंडोरी मतदारसंघात प्रत्येकी १२ पथके असणार आहेत. तर चलचित्र निरीक्षण पथके नाशिक व दिंडोरीत प्रत्येकी ६ चलचित्र निरीक्षण पथके आहेत. तर नाशिकसाठी आंतरजिल्हा तपासणी नाके ४ तर दिंडोरीसाठी ७ तपासणी नाके असणार आहेत. त्याचप्रमाणे आंतरराज्य तपासणी नाके नाशिकसाठी १ तर दिंडोरीसाठी ४ असणार आहेत.

### इतक्या मतदानयंत्रांच्या आधारे निवडणूक

नाशिक मतदारसंघात २२९० मतदान यंत्रे व २२९० नियंत्रण यंत्र असणार आहेत. तर २४८० व्हीव्हीपॅट तर दिंडोरी मतदारसंघासाठी २३०५ मतदान यंत्र व २३०५ नियंत्रण यंत्र असणार असून, २४९६ व्हीव्हीपॅटच्या आधारे निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. तर ५९८० मतदान यंत्र, ९६६ नियंत्रण यंत्र, ७९९ व्हीव्हीपॅट जिल्हास्तरावर राखीव ठेवण्यात आले आहेत.

### संवेदनशील मतदान केंद्रावर वेबकास्टिंग व पोलीस बंदोबस्त

नाशिक मतदारसंघात १९ संवेदनशील मतदान केंद्र तर दिंडोरी मतदारसंघात ४ संवेदनशील मतदान केंद्र आहेत. या मतदान केंद्रांवर आवश्यक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. तसेच एकूण ५० टक्के मतदान केंद्राचे वेबकास्टिंग करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### वृद्ध व दिव्यांग मतदारांसाठी गृह मतदानाची सुविधा

८५ वर्षे वय असणारे वृद्ध व ४० टक्क्यांपेक्षा अधिक दिव्यांगांसाठी गृह मतदानाची सुविधा देण्यात आली आहे. त्यासाठी ६० पथके विधानसभा मतदारसंघात नेमण्यात आले आहेत. आत्तापर्यंत यासाठी दिंडोरी आणि नाशिक लोकसभा मतदारसंघातील ४ हजार मतदारांनी अर्ज नेले आहेत.





# मन मोहन मुरत तेरी...

## उस्मान मीर यांच्या गायकीची भुरळ



**नाशिक : ठक्कर डोम येथे दीक्षा महोत्सवानिमित्त उभारण्यात आलेल्या राज-गृहनगरीत भक्तीसंध्या मैफलीत गुजराथी भजन सादर करताना गायक उस्मान मीर व वाद्यवृंद.**

**नाशिक : प्रतिनिधी**

मोक्षभूमी धाम नी रे, नगर मे जोगी आया भेद कोई समझ न पाया, मन मोहन मुरत तेरी प्रभु यांसारख्या गुजराथी भजनाने गायक उस्मान मीर व वाद्यवृंदांनी गुरुवार, दि. २५ रोजी दीक्षामहोत्सवानिमित्त ठक्कर ठाम येथे उभारण्यात आलेल्या राजगृहनगरीत आयोजित भक्तीसंध्या या मैफलीत आपल्या सुरेल गायकीने भाविकांना मोहून टाकले. दीक्षामहोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी शहरातील जैन बांधवांनी उभारण्यात आलेल्या राजगृहनगरीला भेट देत मंदिरात लीन झाले. सकाळी ८.३० वाजता प्रवचन झाले. यावेळी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते तर १०.३० वाजता झालेल्या मेहंदीच्या कार्यक्रमात महिलांचा मोठा सहभाग होता.

### वृक्षांवरील विद्युत रोषणाई लक्षवेधी

ठक्कर डोम मैदानाबाहेरील वृक्षांनाही दीक्षामहोत्सवानिमित्त विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. ठक्कर डोम मैदानाबाहेर शहरातील मुख्य मार्ग असल्याने कायमच या मार्गावर वर्दळ असते. त्यामुळे संध्याकाळच्यावेळी वृक्षांना केलेली आकर्षक विद्युत रोषणाई वाहनधारकांचे लक्ष वेधून घेत आहे.

### भाविकांकडून फोटोसेशन

राजगृहनगरीत आकर्षकरीत्या मनमोहन अशा मंदिराची, महलाची प्रतिकृती साकारण्यात आल्या आहेत. या प्रतिकृतींचा फोटो काढण्याचा मोह भाविक टाळू शकत नसल्याचे चित्र आहे.

## महत्त्वाचे

### अशोकनगर शाळेत लोकनेते कै. व्यंकटरावजी हिरे जयंती



**वडाळागाव : प्रतिनिधी**

आदिवासी सेवा समिती नाशिक संचलित समाजश्री डॉ. प्रशांतदादा हिरे माध्यमिक विद्यालय व सौ. स्मिताताई हिरे प्राथमिक विद्यालय अशोकनगर सातपूर नाशिक शाळेत आदिवासी सेवा समिती व महात्मा गांधी विद्यामंदिर या संस्थेचे संवर्धक लोकनेते कै. व्यंकटरावजी हिरे यांना जयंती दिनी विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक प्रवीण हिरे यांनी प्रतिमेचे पूजन केले. अध्यक्षीय भाषणातून लोकनेते यांच्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सविता ताडगे मॅडम यांनी केले. यावेळी माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. नंदिनी आडके, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सोपान निकम तसेच दोन्ही विभागांचे शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### गोविंदनगरला मानव एकता दिनानिमित्त रक्त संकलन



**सिडको : विशेष प्रतिनिधी**

निराकार प्रभूने आम्हाला हे जे मानव जीवन दिले आहे. त्याचा प्रत्यक क्षण मानवतेसाठी समर्पित व्हावा, असा परोपकाराचा सुंदर भाव आपल्या हृदयात उत्पन्न होतो तेव्हा खरं तर अवघी मानवता आम्हाला आपली वाटू लागते, असे उद्गार सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज यांनी मानव एकता दिवस प्रसंगी व्यक्त केले. गोविंदनगर येथील सत्संग भवन येथे आयोजित रक्तदान शिबिरात तीनशे एक भाविकांनी रक्तदान केले. संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने संपूर्ण भारत वर्षात जवळपास २०७ ठिकाणी विशाल रूपात रक्तदान शिबिरांच्या श्रृंखलेचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये सुमारे पन्नास हजार युनिट रक्त संकलित करण्यात आले. सर्व रक्तदान शिबिरांमध्ये रक्तदानापूर्वी आवश्यक असलेल्या सर्व तपासण्या करण्यात आल्या तसेच स्वच्छतेची विशेष काळजी घेण्यात आली होती. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक चारूदत्त शिंदे, पोलिस उपायुक्त किरण कुमार चव्हाण, संदर्भ सेवा रुग्णालयाचे डॉ. पुरुषोत्तम पुरी आदी मान्यवरांनी शिबिरास भेट दिली. संत निरंकारी मंडळ नाशिकचे गुलाब पंजवाणी यांनी मान्यवरांचे स्वागत केले.





# महायुतीच्या जागेचा तिढा आणखी वाढला

## भुजबळांसाठी नाशिकची राष्ट्रवादी आग्रही

**नाशिक : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी नाशिकच्या जागेचा तिढा आणखी वाढला आहे. या जागेसाठी शिंदे गट आग्रही असतानाच केंद्रीय नेतृत्वाकडून ग्रिन सिग्नल मिळूनही उमेदवारी जाहीर न झाल्यामुळे मंत्री छगन भुजबळ यांनी उमेदवारीच्या स्पर्धेतून माघार घेतली. मात्र, यामुळे नाशिकमधील राष्ट्रवादी आणखी आक्रमक झाली असून, काल बैठक होऊन नाशिकच्या जागेवर छगन भुजबळ यांनाच उमेदवारी जाहीर करावी, या मागणीचा ठराव काल करण्यात आला.

नाशिक राष्ट्रवादीची काल राष्ट्रवादी भवन येथे बैठक पार पडली. या बैठकीत उपस्थितांनी नाशिकच्या जागेवर राष्ट्रवादीचाच हक्क असल्याचे सांगत ही जागा राष्ट्रवादीला सोडण्यात यावी, या मागणीचा ठराव करण्यात येऊन ठरावाची प्रत वरिष्ठ नेत्यांना पाठविण्यात आली.

या बैठकीला शहराध्यक्ष रंजन ठाकरे, नाशिक लोकसभा अध्यक्ष विष्णुपंत म्हैसधुणे, आमदार माणिकराव कोकाटे, सरोज अहिरे, माजी खासदार देवीदास पिंगळे, माजी आमदार जयंत जाधव, शिवराम झोले, प्रदेश पदाधिकारी अर्जुन टिले, नानासाहेब महाले, बाळासाहेब कर्डक, गोरख बोडके, निवृत्ती अरिंगळे, संजय खैरणार, प्रेरणा बाळकवडे, योगिता आहेर, अड. गौरव गोवर्धने, अंबादास खैरे, योगेश निसाळ, चिन्मय गाढे, आकाश कदम, अजय खांडबहाळे, कविता कर्डक, नितीन चंद्रमोरे, सलीम शेख, डॉ. सागर कारंडे, आसिफ जाणोरीकर, किशोरी खैरणार, बाळासाहेब गिते, सोमनाथ बोराडे, मनोहर कोरडे, राजाराम धनवटे, मकरंद सोमवंशी, बहिरू मुळाने, जीवन रायते, पांडुरंग नदीम शेख, संतोष कदम, प्रशांत वाघ, निर्मला सावंत, रंजना गांगुर्डे, पुष्पा राठोड, पुष्पा वाघ, सुरेखा पठाडे, पुष्पलता उदावंत, सायरा शेख, रोहिणी रोकडे, वर्षा लिंगायत, सरला सोनवणे, नंदा दोडके, ज्योती भोर, दीप्ती हीरे, संजीवनी गायकवाड उपस्थित होते.

# इंदिरानगर भागात बॅनर व्यावसायिकाचे दीड लाख लुटले

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

उंटवाडी येथील डिजिटल होर्डिंग, बॅनर व्यावसायिकाला रस्त्यात अडवून त्याच्याकडील दीड लाख रुपयांची रोकड बळजबरीने लुटणाऱ्या संशयितांविरुद्ध इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



उंटवाडी येथील खेतवानी लॉन्ससमोरील गाळ्यांमध्ये मुस्तफा डिजिटल बॅनरचे दुकान आहे. मुस्तफा शेख( वय ३५, रा. उदय कॉलनी, पवननगर, सिडको) हे २३ एप्रिल रोजी सकाळी नेहमीप्रमाणे दुकानावर गेले. तसेच फिर्यादी फातिमा शेख या दिवसभराचे काम उरकून सायंकाळी घरी आल्या. मात्र, घरातील कामे उरकून त्या कुटुंबीयांसह झोपण्याच्या तयारीत होत्या. परंतु मध्यरात्र उलटूनही पती मुस्तफा शेख घरी आले नाही म्हणून त्यांची पत्नी फातिमा मुस्तफा शेख यांनी मोबाइलवर संपर्क साधला असता त्यांचा फोन लागला नाही. फातिमा यांचे पती हे कामानिमित्त कधी कधी बाहेरगावी जात असत. कदाचित आजही ते कामानिमित्त कुठे तरी गेले असतील किंवा त्यांच्या फोनची बॅटरी उतरली असेल म्हणून त्यांनी फोन केला नाही, असे समजून त्या झोपी गेल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी पुन्हा त्यांच्या पतीला फोन केला. मात्र, फोन बंदच येत होता.

दरम्यान, फातिमा शेख या काल त्या काम करत असलेल्या व्होडाफोन कंपनीच्या ऑफिसमध्ये असताना त्यांना ८६१७४२९९०७ या क्रमांकावरून फोन आला. समोरून त्यांचे पती मुस्तफा बोलत होते. ते म्हणाले की, २३ एप्रिल रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास कामानिमित्त इंदिरानगर येथे सम्राट स्वीट्स परिसरात गेले होते. त्यावेळी मुस्तफा शेख यांना त्यांच्याच ओळखीचे सुलतान भाई उर्फ सलिम कुरेशी (रा. देवळाली कॅम्प) व त्यांचे मित्र यांनी संगनमत करून मुस्तफा शेख यांना सम्राट स्वीटजवळ अडवून दमदाटी केली. तसेच शेख यांच्याकडे व्यवसायातून आलेली दीड लाख रुपयांची रक्कम बळजबरीने काढून घेतली. त्यानंतर आरोपी हे शेख यांना देवळाली कॅम्पकडे घेऊन जात असताना त्यांनी आरोपींच्या हाताला हिसका देऊन तेथून पळ काढला, असे सांगितले. याप्रकरणी याबाबत फातिमा मुस्तफा शेख (वय ३२, रा. उदय कॉलनी, पवननगर, सिडको) यांनी इंदिरानगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, याप्रकरणी संशयित चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास इंदिरानगर पोलीस करीत आहेत.

# ‘सुपर-५०’ उपक्रमांतर्गत २२ विद्यार्थी जेईई मेन परीक्षा उत्तीर्ण

**नाशिक : प्रतिनिधी**

सन २०२२ -२३ मध्ये नाशिक जिल्हा परिषदेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून सुपर ५० हा नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील ५० विद्यार्थी व विद्यार्थिनींची परीक्षेद्वारे निवड करण्यात आली होती. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना जेईई व जेईई ॲडव्हान्स या परीक्षांसाठी निवासीस्वरूपाचे प्रशिक्षण देण्यात आले. २ वर्षांच्या कठोर परिश्रमातून २२ विद्यार्थ्यांनी जेईई परीक्षा उत्तीर्ण होत यश संपादन केले आहे. यामध्ये १२ विद्यार्थी व १० विद्यार्थिनींचा समावेश आहे. सुपर ५० उपक्रमांतर्गत निवड झालेल्य अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांमधून वृषाली जनार्दन वाघमारे ही विद्यार्थिनी प्रथम आली आहे. तर अनुसूचित जमाती प्रवर्गातून डिंपल अशोक बागूल ही विद्यार्थिनी प्रथम आली आहे.



**कु.डिंपल अशोक बागूल**



**कु. वृषाली जनार्दन वाघमारे**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये उच्चशिक्षणाविषयी प्रचंड इच्छाशक्ति असते, आर्थिक अडचण आणि योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे ग्रामीण भागातील गरीब व गरजू कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी मिळत नाही, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळावी, स्पर्धा परीक्षांसाठी या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील इयत्ता ११ वी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी सुपर ५० उपक्रम हा सुरू करण्यात आला होता, यामध्ये विद्यार्थ्यांना सीईटी, जेईई व जेईई एडवान्स या परीक्षांसाठी मार्गदर्शन देण्यात येत होते. या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केल्यामुळे सर्व स्तरातून विद्यार्थ्यांचे कौतुक केले जात आहे. जून महिन्यात जेईई एडवान्स परीक्षेसाठी हे विद्यार्थी आता प्रविष्ट होणार आहेत.

ममाझे आई वडील हे शेतकरी आहेत त्यामुळे नाशिक शहरात येऊन खाजगी क्लास लावणे मला शक्य नव्हते, सुपर ५० उपक्रमात माझी निवड झाल्यामुळे मला जेईई परीक्षेसाठी मला तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले, सीईओ मॅडम यांनी सुद्धा वेळोवेळी आम्हाला मार्गदर्शन केले, अजून अभ्यास करून आता जेईई ॲडव्हान्स परीक्षेत यश मिळवायचे आहे.



❛ सुपर ५० उपक्रम २०२२-२३ अंतर्गत जेईई मेन परीक्षेसाठी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मी अभिनंदन करते, जसे जेईई मेन परीक्षेत यश संपादन केले तसेच आता विद्यार्थ्यांनी जेईई ॲडव्हान्स परीक्षेत देखील यश मिळवण्यासाठी शुभेच्छा देते.

**- आशिमा मित्तल,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक

# नागापूर-पानेवाडी रस्त्यावर टँकरमुळे अपघाताचा धोका

**मनमाड : प्रतिनिधी**

मनमाड शहरालगत असलेल्या नागापूर-पानेवाडी या ठिकाणी इंडियन ऑइल भारत पेट्रोलियम हिंदुस्तान पेट्रोलियम यांचे इंधन प्रकल्प आहेत. या प्रकल्पात पेट्रोल, डिझेल भरण्यासाठी येणारे टँकर हे मनमाड-नांदगाव महामार्गावरच उभे केले जातात. यामुळे अनेकदा अपघात होऊन अनेक जणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. या तिन्ही कंपनीबाहेरील रस्त्यावर उभे करण्यात येणारे टँकर बंद करावे अन्यथा नागापूर ग्रामपंचायत हद्दीतील बस स्थानकासमोर कुठलीही पूर्वसूचना न देता आंदोलन करण्याचा इशारा ग्रामपंचायत सरपंच राजेंद्र पवार यांनी पत्रकाद्वारे दिला आहे.

मनमाडनजीक असलेल्या नागापूर -पानेवाडी येथे इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम, हिंदुस्थान पेट्रोलियम सत्ता इंडियन गॅस यांची इंधन प्रकल्प आहेत. या कंपन्यांमध्ये इंधन भरण्यासाठी रोज हजारो टँकर येथे येतात, मात्र हे सर्व टँकर मनमाड-नांदगावदरम्यान असलेल्या महामार्गावर उभी करण्यात येतात. या उभ्या टँकरमुळे अपघात होऊन अनेकांचे प्राण गेलेले आहे.

कंपनीने या टँकरसाठी स्वतंत्रपणे पार्किंगची व्यवस्था केलेली असताना काही अधिकाऱ्यांच्या आडमुठ्या धोरणामुळे पार्किंगमध्ये गाड्या लावण्यास अडचणी येतात. तर काही अति हुशार टँकरचालक हे महामार्गावरच टँकर उभे करतात.

याबाबत नागापूर ग्रामपंचायत सरपंच या नात्याने अनेकदा लेखी व तोंडी सूचना दिलेल्या आहेत, मात्र या चारही कंपन्याचे अधिकारी तसेच मनमाड शहर पोलीस याकडे दुर्लक्ष करत आहेत. टँकर रस्त्यावर उभे करणे बंद केले नाही तर नागापूर बस स्थानकासमोर कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता नागापूर-पानेवाडी ग्रामपंचायत ग्रामस्थांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नागापूर ग्रामपंचायतीचे सरपंच राजेंद्र पवार यांनी तहसीलदार यांना दिलेल्या पत्रात दिलेला आहे.



■ १९ मे रोजी स्टार प्रवाहवर 'बाईपण भारी देवा' ▸▸ पान ३

नाशिक आज

# गांवकरी



■ सोन्याचा भाव गडगडला, चांदीची चकाकी उतरली ▸▸ पान ३


■ gavkarinews.com ■ नाशिक, शुक्रवार, दि. २६ एप्रिल २०२४

## महत्त्वाचे

### मोहम्मद रफी गीतांची रविवारी विनामूल्य मैफल

चौथे पुष्प : चौदहवीका चांद हो...

**नाशिक : प्रतिनिधी**



सुरेल गायक स्वर्गीय गायक मोहम्मद रफी यांच्या स्वरांची जादू अजूनही श्रोत्यांना खिळवून ठेवते. नव्या पिढीलाही त्यांची गाणी आवडतात. अशाच लोकप्रिय गीतांची मैफल रविवारी, दि.२८ रोजी आयोजित करण्यात आली आहे. यंदा मोहम्मद रफी यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. जानेवारीपासून सुरू असलेल्या या मालिकेतील चौथे पुष्प चौदहवीका चांद हो...संयोजक घनश्याम पटेल व सूर शारदा म्युझिकल फाउंडेशनतर्फे गुंफण्यात येईल. सायंकाळी ६ वाजता सार्वजनिक वाचनालयाच्या परशुराम सायखेडकर नाट्यगृहात होणाऱ्या चौदहवीका चांद हो... या मैफलीत मुख्य गायक घनश्याम पटेल यांच्याबरोबरच संजय डेरे, मनोहर देवरे, अजय पाटील, नितीन पारेवाल, उमेश मालवी आदी गायक रफींची गाजलेली गाणी सादर करतील. त्यांना अपर्णा देशपांडे, नीता पवार, डॉ. रेखा सोनवणे या स्वरसाथ देणार आहेत. तर शशांक कांबळे सूत्रसंचालन करणार आहेत. सर्व रसिकश्रोत्यांनी या विनामूल्य मैफलीला उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### नाशिकरोडला श्रीमद् देवी भागवत कथेचे आयोजन

**नाशिकरोड : प्रतिनिधी**



शिवसेनेच्या दिवंगत नेत्या व माजी नगरसेविका सत्यभामा गाडेकर यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्ताने सुप्रसिद्ध कथाकर देवी वैभवीश्रीजी यांची श्रीमद् देवी भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. नाशिक रोड येथील गाडेकर मळा, जुना चेहेडी रोड येथे १ ते ९ मे रोजी सायंकाळी सात ते दहा या वेळेत कथा होणार आहे. श्रीमद् देवी भागवत कथेनिमित्ताने १ मे रोजी सायंकाळी पाच वाजेला भव्य शोभायात्रा असून, त्यानंतर श्रीगणेश आणि देवीदेवतांची स्थापना कथा महात्म्य व्रत महिमा, २ मे रोजी सुतजी, शौनक सवांद, व्यसजीची तपचार्य, शंकराचे वरदान, भगवतीची अर्धशक्ती प्रकट, ३ मे रोजी व्यासजींचे नवरात्रीचे वर्णन, श्रीरामाच्या चरित्राचे वर्णन, श्रीराम, ब्रह्मा, विष्णू, महेश यांचे उपवास, ४ मे रोजी श्रीकृष्णाच्या देखव्याची कथा, नंद महोत्सव, प्रदूमनच्या जन्मापर्यंत कथा, ५ मे रोजी भगवती चंद्रिका प्रगटच, महाकाली प्रगट, लक्ष्मी, सरस्वती, शुंभ, निशुंभ, चंड, मुंड, रक्त बीज वध, ६ मे रोजी सत्यव्रत कथा, राजा हरिश्चंद्र वंश कथा, महागौरी, शाकंभरी प्रगट, ७ मे रोजी गंगा उगम, राधाकृष्ण, गंगा कथा, शिव पार्वती विवाह, ८ मे रोजी सत्यवान सावित्रीची कथा, भागवती भुवनेशोरीचे रूप, भगवती लक्ष्मीचे समुद्रातून दर्शन व ९ मे रोजी सदाचारी गृहस्थाचा महिमा, रुद्रक्षाचा महिमा, भस्म गायत्री पूर्वचरण कथा आणि कथा पूर्ण होणार आहे तसेच भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या दोन वर्षांपासून गाडेकर परिवार देशातील महान विभूती कथाकर यांच्या कथांचे आयोजन करीत आहे. पंचक्रोशीतील भाविकांनी या कथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक लक्ष्मण गाडेकर, मनीषा वझरे, योगेश गाडेकर, विशाल गाडेकर यांनी केले आहे.

# वर्गणीच्या हिशेबावरून युवकावर गोळीबार

## सामनगाव रोडवरील घटना, एक जण गंभीर जखमी

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकरोड येथील सामनगाव रोडवरील चाडेगाव रस्त्यावर यात्रोत्सवाच्या वर्गणीच्या हिशेबातून एका सराईताने गोळीबार केला. त्यात एक जण जखमी झाला असून, गोळीबार करणारा सराईत फरार झाला आहे. तसेच जखमी युवकावर नाशिक येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून, गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. संशयिताच्या शोधासाठी पथके तयार करण्यात आली आहेत.

चाडेगाव येथे ग्रामदैवत काशाई देवीच्या यात्रोत्सवानिमित्त काल रात्री गावात नियोजनासंदर्भात वर्गणी गोळा करण्यासाठीची बैठक बोलावण्यात आली होती. मात्र, सध्या गावात हरिनाम सप्ताह सुरू असल्याने यात्रोत्सवाची बैठक रद्द झाली. त्यानंतर गावातीलच सचिन मानकर यांच्यासह चार-पाच जण आणि ज्ञानेश्वर बंडू मानकर हे सोबतच एकत्रितपणे हॉटेलमध्ये गेले होते. त्यानंतर हॉटेलमधून बाहेर आल्यानंतर सिद्धीनाथ हॉटेलच्यापुढे नाल्याच्याजवळ त्यांची यात्रोत्सवाबाबत चर्चा सुरू असताना मागील वर्गणीचे पैसे ज्ञानेश्वर उर्फ बंडू मानकर याच्याकडे जमा होते. याबाबत सचिन मानकर यांनी त्याला विचारणा केली असता दोघांमध्ये वादावादी झाली. याचा राग अनावर होऊन सचिन मानकर याने आपल्याजवळ असलेल्या पिस्तुलामधून ज्ञानेश्वर उर्फ बंडू मानकर याच्यावर गोळीबार केला. त्यात दोन गोळ्यांपासून त्याने बचाव केला. मात्र, एक गोळी त्याला चाटून गेली. तर एक गोळी कमरेला लागल्याने तो जखमी झाल्याचे समजते. दरम्यान, सचिन मानकर याच्यावर गंभीर गुन्हे दाखल झाले आहेत. या गोळीबाराने चाडेगाव परिसरात खळबळ उडाली असून, पोलीस या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

### संशियत अट्टल सराईत

गोळीबार करणारा संशयित हा अट्टल गुन्हेगार असून, त्यावर अनेक गुन्हे दाखल झालेले आहेत.

# सिटीलिंक वाहकांना मेस्मा लागू

**नाशिक : प्रतिनिधी**

**सिटीलिंक बससेवा सुरू झाल्यापासून तब्बल नऊ वेळा सिटीलिंक कर्मचाऱ्यांनी संप पुकारला होता. त्यांच्या संपामुळे नाशिककरांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले. मेस्मामुळे सिटीलिंक वाहक कर्मचाऱ्यांना पुढील सहा महिने कुठलाही संप करता येणार नाही.**



१. राज्य परिवहन महामंडळाच्या धर्तीवर महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परीक्षक अधिनियम (मेस्मा) लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे संप करता येणार नसल्याने नाशिककरांना दिलासा मिळणार आहे. शहरात ८ जुलै २०२१ पासून महानगरपालिकेच्या वतीने शहर वाहतुकीसाठी सिटीलिंक बससेवा सुरू केली. शहरातील ६३ मार्गांवर २५० बसच्या माध्यमातून २७०० बसफेऱ्या सुरू आहेत. मात्र, बससेवा सुरू झाल्यापासून विविध कारणाने सिटीलिंक बससेवा वादाच्या भोवऱ्यात अडकली.

२. कर्मचाऱ्यांनी अनेक वेळा नियमित वेतन अदा न करणे, ग्रॅच्युएटी व भविष्यनिर्वाह निधी रक्कम बँकेत जमा न करणे, कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस देणे, तसेच कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई या कारणांमुळे वाहकांनी नऊ वेळा संप पुकारला. शासनाने परिवहन महामंडळाच्या धर्तीवर सिटीलिंक वाहक, चालकांसह कंत्राटी कर्मचाऱ्यांना मेस्मा लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात कंपनीने शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता.

३. शासनाच्या नगरविकास विभागाने याला मंजुरी दिल्यानंतर आदेशाच्या तारखेपासून पुढील सहा महिने मेस्मा लागू केला आहे. कायद्यानुसार संप करणाऱ्या कर्मचाऱ्यांना विनावॉरंट अटक होऊ शकते.

### असा आहे कायदा

महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परीक्षण अधिनियमन नागरिकांना अत्यावश्यक असलेल्या सेवा मिळण्यासाठी हा कायदा आहे. अत्यावश्यक सेवांमध्ये कर्मचाऱ्यांनी साठेबाजी किंवा संप केला व त्यामुळे सर्वसामान्य जनतेची गैरसोय झाल्यास आंदोलन रोखण्यासाठी हा कायदा लागू केला जातो. परिचारिका तसेच डॉक्टरांच्या संपावेळी मुख्यत्वे या कायद्याचा अधिक वापर होतो.

४. या कायद्यांतर्गत दोषी आढळणाऱ्या कर्मचाऱ्यांना दोन वर्षे कारावास किंवा दोन हजार रुपयांचा दंड अथवा दोन्ही शिक्षा एकाच वेळी केली जाऊ शकते. कायदा लागू झाल्यानंतर सहा आठवड्यांची मुदत असते. तसेच सहा महिन्यांपर्यंतसुद्धा हा कायदा लागू होऊ शकतो. सिटीलिंकसाठी सहा महिन्यांची मुदत निश्चित केली आहे.



# उपनगर येथे श्री हनुमान जयंती उत्साहात साजरी

**उपनगर : वार्ताहर**

मातोश्री मित्रमंडळ व श्रमिक मित्रमंडळाच्या वतीने श्री हनुमान जयंतीनिमित्त महाप्रसाद व एक हजार मोतीचूर लाडूंचे वाटप करण्यात आले. यावेळी शंभर महिलांनी सामूहिक हनुमान चालीसा पठाण केले.

सहभागी महिलांना भेटवस्तू देण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन प्रवीण नवले व मनीष वडनेरे यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे माजी नगरसेवक राहुल दिवे, प्रशांत दिवे, विजय ओहोळ, अनिल ताजनपुरे, रोशन आढाव, राहुल मैंद, विल्यम कॉक्स, अनिल देठे, संजय लोखंडे, मोहन पवार, अनिकेत गांगुर्डे, संजय पूरकर, विजय पगार, जयंत म्हैसधुणे, अक्षय कटारे, मुन्ना तडवी, पंकज पाटील, आशिष लहाणे, सागर सर, पवन धंड, साहेबराब घाडगे, तुषार मुळे, सचिन परदेशी आदी उपस्थित होते. विजय पगारे, मुकुंद बागूल, प्रकाश शर्मा, योगेश नन्नवरे, नेव्हे, मिलिंद सूर्यवंशी, सचिन परदेशी, विकी राजपूत आदींसह परिसरातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंचवटीत हॉकर्स, पथविक्रेत्यांवर कारवाई

**नाशिक : प्रतिनिधी**



नाशिक मनपा हद्दीत दोन विभागांत अतिक्रमण विभागाकडून बुधवारी (दि. २४) देवधर कॉलेज, निलगिरी बाग, रिलायन्स पेट्रोलपंप, तसेच सारडा सर्कल, द्वारका, तिगरानिया रोड, तपोवन, काठे गल्ली इ. परिसरात अतिक्रमण निर्मूलन पथकाने संयुक्त कारवाई केली. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून मनपाचा दैनंदिन पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता.

या कारवाईच्या दरम्यान पंचवटी व नाशिक पूर्व विभागाचे विभागीय अधिकारी तसेच अतिक्रमण विभागाचे पथक प्रमुख प्रवीण बागूल, नाशिक पूर्व विभागाचे अतिक्रमण पथक प्रमुख जीवन ठाकरे व अतिक्रमण कर्मचारी निर्मूलन वाहनांसह उपस्थित होते.

नाशिक पूर्व व पंचवटी विभागामार्फत विभागीय अधिकारी मदन हरिश्चंद्र व राजाराम जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली. पंचवटी विभागातील देवधर कॉलेज, निलगिरी बाग, रिलायन्स पेट्रोल पंप या परिसरात रस्त्यालगत अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवर अतिक्रमण निर्मूलन पथकाने संयुक्त मोहीम राबवून कारवाई केली. या ठिकाणी असलेला वाहतूक मार्ग, पथमार्ग मोकळा करून देण्यात आलेला आहे.

कारवाईदरम्यान लोखंडी कुलूप बंद, मोठे चारचाकांची हातगाडीवरील टपरी, ०१ नग साहित्य जप्त करण्यात आले. नाशिक पूर्व सारडा सर्कल, द्वारका, तिगरानिया रोड, तपोवन, काठे गल्ली या परिसरात रस्त्यालगत अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवर अतिक्रमण निर्मूलन पथकाने संयुक्त मोहीम राबवून कारवाई केली.

सदर ठिकाणी असलेला वाहतूक मार्ग, पथमार्ग मोकळा करून देण्यात आला आहे. कारवाईदरम्यान स्टॅण्ड बोर्ड -०४ नग, लोखंडी बाकडा मोठा ०१ नग, पोल बॅनर-१० नग, जाहिरात बोर्ड -०५ नग इ. साहित्य जप्त करण्यात आले. या कारवाईने त्रस्त नागरिकांनी स्वागत केले आहे.

### जप्त साहित्य ओझरच्या गोदामात

कारवाईत जप्त करण्यात आलेले सर्व साहित्य ओझर येथील मनपाच्या अतिक्रमण विभागाच्या गोडावूनमध्ये जमा करण्यात आले. मनपा कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांना या मोहिमेच्या माध्यमातून जाहीर आवाहन करण्यात येत आहे की, ज्या मिळकती अनधिकृत किंवा विनापरवाना असतील त्यांनी स्वतःहून अनधिकृत बांधकामे काढून घेण्यात यावे. अन्यथा मनपाकडून कडक कारवाई करण्यात येईल, तसेच रस्त्यावर अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवरही दैनंदिन कारवाई करण्यात येईल, असे आवाहन अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त नितीन नेर यांनी केले आहे.

# कडक उन्हात प्रचार करताना नेत्यांनी आरोग्य जपण्याची वेळ

**नाशिक : प्रतिनिधी**




दोन दिवसांपूर्वी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना यवतमाळच्या प्रचारसभेत भोवळ आली. त्यामुळे कार्यकर्त्यांची धावपळ उडाली. गडकरींनी आराम करून दहा मिनिटे अजून भाषण करून सभा पार पाडली. अशा घटनांमधून नेत्यांनाही प्रचाराच्या धामधुमीत आपल्या आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

सध्या लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरू आहे. भरउन्हाळ्यात प्रचार सभा, बैठका, प्रचार रॅली आदींचे आयोजन करण्यात येत आहे. मोकळ्या वाहनातून रॅली, पायी रॅलीत जाताना कडक उन्हाचे चटके नेत्यांसह कार्यकर्त्यांना त्रास सहन करावा लागत आहे. उन्हापासून बचावासाठी टोपी, रुमाल, छत्री आदींचा वापर केला जात असला तरी कडक उन्हाच्या झळांनी अंगाची लाहीलाही होत आहे. वाढत्या तापमानामुळे गुदमरणे, भोवळ येणे आरोग्याच्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे अशा वातावरणात राज्यकर्त्यांसह कार्यकर्त्यांनी, सामान्य नागरिकांनीही उन्हात जाताना काळजी घेणे आवश्यक आहे. प्रचारासाठी विविध राज्यांच्या एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाताना हवाई, वाहन, पायी प्रवासात अचानक येणाऱ्या अडीअडचणीमुळे कधी आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे नेत्यांच्या ताफ्यासोबत आरोग्याच्या सुविधा ठेवलेल्या असतात. तरी पण अचानक तब्येत बिघडणे, अपघात अशा अचानक आलेल्या संकटासाठी तयार राहणे आवश्यक ठरते. जनतेच्या प्रश्नासाठी लढणाऱ्या नेत्यांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

नेतेमंडळी कायम वाहने, घर, कार्यालयात एसीच्या सोयीसुविधेसह वावरत असतात. जनतेसोबत संवाद साधताना त्यांच्या अडीअडचणी जाणून घेताना, नैसर्गिक आपत्तीची पाहणी करताना फिल्डवर जावे लागते. नेतेमंडळी जनतेची काळजी (?) घेता घेता आपल्या आरोग्याची काळजी तितकीशी घेताना दिसून येत नाही. अपवादात्मक नेते सोडल्यास आरोग्याची काळजी व्यस्त दिनचर्येत घेताना दिसून येत नाही.

केजरीवाल यांची मुख्यमंत्री म्हणून निवड झाल्यानंतरच्या दिवसांमध्ये कित्येक दिवस आजारी होते. अचानक सामान्यपासून सुरू झालेला प्रवास जनतेचे प्रश्न, अडीअडचणींसाठी प्रत्यक्ष फिल्डवर जावे लागते. गर्दी, गदारोळ, सभा, रॅली आदींचा सराव, सवय नसल्यामुळे तब्येतीवर परिणाम होण्याची शक्यता असते.

# सुट्ट्यांमुळे सिटीलिंकच्या २५० फेऱ्या होणार कमी

## टप्प्याटप्प्याने सध्या विविध मार्गांवरील ३७ फेऱ्या कमी

**नाशिक : प्रतिनिधी**

**शाळा, महाविद्यालयांना सुट्ट्या लागल्याने सिटीलिंक प्रवाशांची संख्या कमी झाली असून, काही बसफेऱ्या या विनाप्रवासीच होत असल्याने सिटीलिंकला आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. त्या पार्श्वभूमीवर सिटीलिंकच्या शहरातील २५० बसफेऱ्या टप्प्याटप्प्याने कमी करण्यात येत आहेत. सध्या शहरातील निमाणी आणि नाशिकरोडवरून निघणाऱ्या विविध मार्गांवरील ३७ फेऱ्या कमी करण्यात आल्या आहेत.**

सिटीलिंक बससेवा अडीच वर्षांत शंभर कोटींच्या तोट्याचा सामना करत आहेत. शहरात सिटीलिंकने दररोज ८० ते ८५ हजार प्रवासी प्रवास करतात. मात्र शाळा, महाविद्यालयांना उन्हाळी सुट्ट्या लागल्याने प्रतिदिन १० ते १५ हजार प्रवाशांची घट झाली आहे. परिणामी, सिटीलिंकला प्रवासी संख्या कमी झाल्याने तोटा सहन करावा लागत असल्याने ज्या मार्गावर प्रवासी संख्या घटली आहे, अशा मार्गावरील बसफेऱ्या सिटीलिंक प्रशासनाकडून कमी करण्यात आल्या आहेत.



### पासधारकांच्या संख्येत मोठी घट

सिटीलिंक बसचा वापर शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी दैनंदिन प्रवासासाठी करत असतात. त्याचप्रमाणे प्रवास दैनंदिन असल्याने विद्यार्थ्यांकडून सिटीलिंकच्या पास सेवेचा लाभ घेण्यात येतो. मात्र, आता उन्हाळी सुट्ट्या असल्याने पासधारक प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात घटल्याने सिटीलिंकला आर्थिक नुकसान होत आहे.

### नाशिकरोडवरून निघाणाऱ्या बसेस

| मार्ग | बस क्रमांक | कमी करण्यात आलेल्या फेऱ्या |
|---|---|---|
| बारदान फाटा | २०१ | ३ |
| सिम्पबॉयसिस | २०२ | ३ |
| ओझर | २०८ | २ |
| बोरगड | २४३ | १ |
| भैरवनाथनगर | २४८ | १ |
| भुजबळ कॉलेज | २६३ | १ |

### दररोज ४ लाखांचा फटका

प्रवासी संख्या घटल्याने २५० बसफेऱ्या कमी करण्यात येणार असल्याने सिटीलिंकला दिवसाला किमान ४ लाखांचा तोटा सहन करावा लागणार आहे.

### शाळा सुरू झाल्यावर बसफेऱ्या होणार पूर्ववत

शाळा, महाविद्यालय सुरू झाल्यावर बसफेऱ्या पूर्ववत होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

### या मार्गावरील बसफेऱ्या कमी (निमाणीवरून निघणाऱ्या बस)

| मार्ग | बस क्रमांक | कमी करण्यात आलेल्या फेऱ्या |
|---|---|---|
| सिम्बॉयसिस | (१०३) | ३ |
| पाथर्डी गाव | (१०४) | १ |
| ओझर | (१०८) | २ |
| चुंचाळे | (१२८) | २ |
| जयभवानी मार्गे भगूर | (१२९) | २ |
| भगूर | (१३०) | १ |
| गिरणारे | (१३१) | १ |
| सायखेडा | (१३२) | २ |
| सिन्नर | (१४६) | ६ |
| पिंपळगाव | (१५२) | ६ |

### दररोज इतके प्रवासी घेतात लाभ

शहरात ८ जुलै २०२१ पासून नाशिक महानगरपलिकेच्या वतीने शहर बससेवा सुरू केली. शहरात २५० बसच्या माध्यमातून दिवसाला ६३ मार्गांवरून २७०० बसफेऱ्यांच्या माध्यमातून दररोज ८० ते ८५ हजार प्रवासी प्रवास करतात.

## संपादकीय


# टक्का वाढविण्याचे आव्हान

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात १०२ लोकसभा मतदारसंघात मतदान झाल्यानंतर आज २६ एप्रिल रोजी दुसऱ्या टप्प्यात होणार्या ८८ मतदारसंघावर लक्ष वेधले गेले आहे. पहिल्या टप्प्यात झालेल्या मतदानाच्या टक्केवारीची चर्चा देशभरात होत आहे. होत आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार यावेळी मागील २०१९ च्या निवडणुकीच्या तुलनेत मतदानाचा टक्का घसरला. गेल्या दोन (२०१४ व २०१९) लोकसभा निवडणुकाही एप्रिल व मे महिन्यात झालेल्या असतानाही पहिल्या टप्प्यात अधिक मतदान झाले होते. सन २०१९ मध्ये सात टप्प्यांपैकी सर्वाधिक मतदान पहिल्या टप्प्यात ६९.५ टक्के झाले होते. सन २०१४ मध्येही नऊ टप्प्यांपैकी पहिल्या टप्प्यात सर्वाधिक ६९ टकके मतदान झाले होते. मतदान कमी झाल्याचा फटका कोणाला बसणार यावर चर्वितचर्वण होत असताना आता दुसर्या टप्प्यात किती मतदान होणार याकडे लक्ष वेधले गेले आहे. मतदानाचा टक्का वाढावा म्हणून निवडणूक आयोगाने मोठी जनजागृती मोहीम शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, सोशल मीडिया यांच्या माधमातून राबविली आणि राबविली जात आहे. मतदारांसाठी विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहाची सोय, महिला आणि पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, मतदारांना ईव्हीएम कक्षापर्यंत सहज पोहोचता यावे, फूटस्टेप स्टिकर्सही (पाऊलखुणा), शारीरिकदृष्ट्या अपंगत्व आले आहे किंवा काही कारणाने चालण्यास त्रास होतो, अशा मतदारांसाठी व्हीलचेअर, हेल्प डेस्क, दिव्यांची पुरेशी व्यवस्था, मतदान केंद्रे पूर्णपणे शेडने झाकणे इत्यादी सुविधांची निवडणूक आयोगाने तजवीज केली होती. मतदान करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही केले होते. आपल्या पक्षाचा उमेदवार निवडून यावा म्हणून राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी बरीच मेहनत घेतली. इतके सारे होऊनही मतदानाचा टक्का घसरला, यावर निवडणूक आयोग आणि राजकीय पक्ष मंथन करत आहेत. दुसर्या टप्प्यात मतदान वाढावे म्हणून निवडणूक आयोगाने बरीच मेहनत घेतली आहे. कमी मतदानाचा फटका बसू नये म्हणून भाजपाने विशेष दखल घेतली आहे. भाजपाने आपल्या पक्षांच्या नेत्यांना जागरुक करुन मतदान कसे वाढविता येईल, यासाठी विशेष मेहनत घेण्यास सांगितले आहे. सन २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत जास्त मतदान (६६ टक्क्यांच्या वर) झाल्याचा



फायदा भाजपाला झाला होता. दुसर्या आणि नंतरच्या सर्व टप्प्यांत तितकेच किंवा त्यापेक्षा अधिक मतदान व्हावे, यावर भाजपाचे विशेष लक्ष आहे. गेल्या निवडणुकीत याच ८८ मतदारसंघात ७०.०९ टक्के मतदान झाले होते. सर्वांत जास्त ८४.१४ टक्के मतदान मणिपूर बाह्य मतदारसंघात, तर सर्वांत कमी ५३.७० टक्के मतदान दक्षिण बंगरुळु मतदारसंघात झाले होते. उष्णतेची लाट, लग्नसराई, उत्साहाचा अभाव इत्यादी कारणे पहिल्या टप्प्यात मतदान कमी होण्याची सांगितली गेली. यात उष्णतेची लाट हे सर्वांत मोठे कारण असल्याचे मानले जात आहे. दुसर्या टप्प्यात आज मतदान होत असताना हवामान खात्याने उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. तीव्र उष्णतेत शांततामय आणि उचित, न्याय्य वातावरणात निष्पक्ष मतदान होण्यासाठी निवडणूक आयोगाने सर्व प्रकारची तयारी केली आहे. परंतु, तपमानात सातत्याने वाढ होत असल्याने लोकांच्या अंगातून घामाच्या धारा वाहत आहेत. मतदानासाठी बाहेर पडताना मतदारांना अंगाची लाही लाही करणार्या उन्हाचा सामना करावा लागणार आहे. येत्या पाच दिवसांत पश्चिम बंगाल, ओडिशा, बिहार, झारखंड, आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक आणि उत्तर प्रदेशातील काही भागात गरम हवा वाहण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने पश्चिम बंगाल आणि ओडिशात र् रेड अलर्ट, तर बिहार और कर्नाटकाच्या काही भागात ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. याशिवाय महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि छत्तीसगढमधील काही भागात जोरदार वाऱ्यासह हलकासा पाऊस आणि तुफानी वादळवाऱ्याची शक्यता वर्तविली आहे. उष्णता, पाऊस, वादळवारा यांचा ज्या भागांत इशारा देण्यात आला आहे. त्यापैकी केरळमधील सर्व २०, कर्नाटकमधील १४, राजस्थानमधील १३, उत्तरप्रदेशातील ८, मध्यप्रदेशातील ६ मतदारसंघात मतदान आहे. त्याशिवाय, आसाम आणि बिहारमधील प्रत्येकी ५, पश्चिम बंगाल आणि छत्तीसगडमधील प्रत्येकी ३ जागांवर मतदान होईल. मणिपूर, त्रिपुरा आणि जम्मू-काश्मीरमधील प्रत्येकी १ मतदारसंघात मतदान आहे. उष्णता आणि पाणीटंचाईचा सामना करणार्या विदर्भ आणि मराठवाड्यातील काही मतदारसंघात उष्णतेची लाट असून, सोबत पाणीटंचाईही आहे. विदर्भात, तर कमाल तापमान ४४ ते ४६ अंश सेल्सियसच्या आसपास आहे. याच भागातील बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या लोकसभा मतदारसंघात मतदानाचा दुसरा टप्पा आहे. विदर्भात, तर कमाल तापमान ४४ ते ४६ अंश सेल्सियसच्या आसपास आहे. याही परिस्थितीत मतदानाचा टक्का वाढावा म्हणून नांदेड येथील जाहीर सभेत मोदींनी मतदान करण्याचे आवाहन केले. मतदान ही लोकशाहीची सर्वात मोठी ताकद आहे, असे ते म्हणाले. कोणालाही मत द्या, पण नक्की मतदान करा... खूप उष्णता आहे, समस्या आहेत, लग्नं आहेत, हे खरं आहे. अशी काही क्षेत्रे आहेत जिथे शेतकरी काम करत आहेत. पण, कुठल्याही हवामानात सीमेचं रक्षण करणाऱ्या जवानांकडे बघा,असे आवाहन केले. मतदान करून ते कोणावरही उपकार करणार नाहीत. ते आपल्या मताने देशाचे भवितव्य सुरक्षित करतील, असेही मोदी यांनी म्हटले आहे. सन २०१९ च्या निवडणुकीत या ८८ मतदारसंघांपैकी ५२ जागा भाजपाने जिंकल्या होत्या. काँग्रेसला १८, तर शिवसेना आणि जनता दल संयुक्त या पक्षांना प्रत्येकी चार जागा मिळाल्या होत्या. अन्य पक्षांना १० जागा मिळाल्या होत्या. आपापल्या पक्षांच्या उमेदवारांचा विजय निश्चित करण्यासाठी उन्हातान्हाची पर्वा न करता कार्यकर्ते आणि नेते मंडळीसमोर मतदारांना बाहेर काढण्याचे एक मोठे आव्हान आहे.

## विचारधन



### संतांनीच भगवंताला सगुणात आणले

सर्वांत अर्पणभक्ती श्रेष्ठ आहे. पूजा करताना 'मी तुझा दास आहे' असे म्हणावे, म्हणजे प्रेम येते. यात लाज वाटायचे काहीच कारण नाही. आधी भगवंताचे दास व्हावे आणि मग पूजा करावी. आम्ही इतर कित्येकांचे दास होतो आणि इतक्यांतून उरेल तेव्हा भगवंताचे दास होणार; मग पूजेत अर्पणभक्ती कशी येणार? आपल्याला जे जे आवडते ते ते मनाने भगवंताला अर्पण करावे. इथे सर्व काही मनानेच करायचे असते. नुसते शरीराने काबाडकष्ट केले म्हणजे प्रेम येतेच असे नाही. चित्त विषयाकडे ठेवून भगवंताची सेवा करणे म्हणजे अंगचोरपणा आला. असा अंगचोरपणा करू नये. भगवंताकडे मन लागायला सगुणोपासना उत्तम होय. सर्व लोक या ना त्या रूपाने सगुणाचीच उपासना करणारे असतात. ठरलेली वेळ आणि ठरलेले साधन असावे, म्हणजे त्यामध्ये प्रेम येते. आपण ज्याची उपासना करतो तो तरी सगुणामध्येच असतो ना? म्हणून त्यालासुद्धा मग ती सवय लागते. आपण ज्या मूर्तीची उपासना करतो त्या मूर्तीमध्ये तेज वाढत असते. ज्या मूर्तीची उपासना एखाद्या साधूने केलेली असेल त्या मूर्तीमध्ये फार तेज असते आणि ते पुष्कळ काळ टिकते. शिवाय ते इतरांनाही उपयोगी पडते. जगाचे खरे स्वरूप कळण्यासाठी सगुण उपासनाच कारणीभूत आहे. सर्व भोग भोगून काळजी नसणे हे उपासनेचे खरे मर्म आहे. उपासनेचे तेज कसे झळकले पाहिजे! हे तेज फार विलक्षण असते. पैशाचे किंवा विद्वतेचे तेज तितके नसते. ज्याच्या मागे उपासनेचा जोर आहे तोच जगात खरे काम करतो. एक बाई डोळे झाकून बसली म्हणजे तिला एक देवी दिसे. त्या बाईशी देवी बोलत असे आणि प्रपंचातल्या वगैरे सर्व गोष्टी कशा कराव्यात हे सांगत असे. परंतु बाईने ध्यान करणे सोडून दिल्याने तिला देवी दिसणे बंद झाले. तसेच एक मुलगा डोळे झाकून बसला म्हणजे त्याला पांढरी दाढी असलेला एक साधू दिसे. कसे वागावे, काय करावे वगैरे सर्व गोष्टी तो त्या मुलाला सांगत असे. परंतु मुलाने ध्यान करणे सोडून दिले आणि तो दाढीवाला दिसेनासा झाला. या गोष्टींचा अर्थ असा की, आपल्याला सांभाळणाऱ्या शक्ती आपल्या मागे असतात, त्यांची उपासना आपण सोडू नये. भगवंताला सगुणामध्ये आणला हा संतांचा आपल्यावर फार मोठा उपकार आहे. संतांनी आपल्याला सांगितले की, 'ही दृश्य मूर्ती तुझी आहे, तुला हव्या असणाऱ्या सर्व वस्तू देणारा भगवंत तोच आहे,' ही जाणीव आणि कल्पना आपल्या ठिकाणी वाढत गेली तर त्यामुळे 'भगवंत दाता आहे' ही जाणीव उत्पन्न होईल.

# कुशाग्र बुद्धिमत्ता : आपली अमूल्य संपत्तीच!

**आज जागतिक बौद्धिक संपदा दिन आहे. जसे सोने, दागिने, मालमत्ता ही जशी संपत्ती असते, त्याचप्रमाणे स्वतः ची बुद्धिमत्ता हीदेखील संपत्ती म्हणून ओळखली जाते. त्या संपत्तीचेही संरक्षण, संवर्धन आणि उपयोजन नीटपणे केले पाहिजे.**

जागतिक बौद्धिक संपदा दिवस दरवर्षी २६ एप्रिल रोजी पेटंट, कॉपीराइट आणि ट्रेडमार्कबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी साजरा केला जातो. जागतिक बौद्धिक संपदा संघटना- डब्ल्यूआईपीओद्वारे सन २००० साली या दिवसाची स्थापना करण्यात आली. जागतिक बौद्धिक संपदा दिवस आम्हाला कल्पकता आणि सर्जनशीलता साजरे करण्यास मदत करतो. ज्यामुळे आम्हाला आमच्या जगासाठी निर्माते आणि शोधकांनी केलेले योगदान माहिती होतात. या दिनानिमित्त जगभरात अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. याकडे वेगवेगळ्या प्रकारे पाहिले जाते. कारण लोकांमध्ये भिन्न बौद्धिक गुण असतात जे त्यांच्यासाठी महत्त्वाचे असतात. हे कार्यक्रम सर्व प्रकारचे मूळ कार्य प्रदर्शित करतात, जे पुढील पिढीला विचार करण्यास आणि तयार करण्यास प्रेरित करतात. सर्जनशीलता ही अशी शक्ती आहे, जी समाजाच्या आधुनिकीकरण आणि विकासाकडे नेणारी आहे. नवकल्पनांमुळे आपले जीवन सोपे आणि अधिक आरामदायक बनते.

आज जागतिक बौद्धिक संपदा दिन आहे. जसे सोने, दागिने, मालमत्ता ही जशी संपत्ती असते, त्याचप्रमाणे स्वतः ची बुद्धिमत्ता हीदेखील संपत्ती म्हणून ओळखली जाते. जागतिक बौद्धिक संपदा दिनानिमित्त वाङ्मयचौर्याच्या इतिहासाविषयी काही गोष्टी जाणून घेऊया. वाङ्मयचौर्य म्हणजेच प्लॅजेरिझम होय. प्लॅजेरिझम हा शब्द प्रथमतः पहिल्या शतकामध्ये आलेला आढळतो. मूळ लॅटिन असणारा प्लेजिअरिअस हा शब्द आहे. याचा अर्थ अपहरणकर्ता असा होतो. एखाद्याच्या सृजनात्मक कामाचे अपहरण करणे म्हणजे प्लॅजेरिझम होय. प्लेजिअम म्हणजे चोरी करणे. इंडो-युरोपियन भाषांमध्ये प्लेजचा अर्थ जाळे किंवा सापळा असा होतो. एखाद्याला नकळतपणे

जागतिक बौद्धिक संपदा दिन

कृष्णकुमार निकोडे

७१३२७९६६८३

जाळ्यात पकडले जाते. या अर्थाने प्लेजिअरिअस हे परिष्कृत रूप बनले गेले आणि तसे करण्याची वहिवाट म्हणून प्लेजिअरिझम ही संज्ञा आली असावी. ग्रीक, लॅटीननंतर नंतर १६०१ साली बेन जॉन्सन या नाटककार-समीक्षकाने साहित्यचोराला उद्देशून प्लेजिअरी हा शब्द उपयोगात आणला. इंग्रजीमध्ये प्लेजिअरिझम ही संज्ञा सन १६२०च्या दरम्यान स्वीकारण्यात आली. सॅम्यूएल जॉन्सनने त्याच्या सन १७५५ साली प्रकाशित झालेल्या शब्दकोशात प्लेजिअरीच्या अ थीफ इन लिटरेचर, वन हू स्टील्स दी थॉट्स ऑर रॉईटिंग्ज ऑफ अनादर, दी क्राईम ऑफ लिटररी थीफ्ट अशा व्याख्या दिल्या आहेत. ऑक्सफर्ड शब्दकोशात लॅटिन प्लेजिअरिअस




हा शब्द सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात आल्याचे म्हटले आहे.

बौद्धिक संपदा म्हणजे काय? तर बौद्धिक संपदा- आईपी मनाच्या निर्मितीचा संदर्भ देते, जसे की आविष्कार; साहित्यिक आणि कलात्मक कामे, रचना आणि वाणिज्यमध्ये वापरलेली चिन्हे, नावे आणि प्रतिमा आईपी कायद्यामध्ये संरक्षित आहेत. उदाहरणार्थ, पेटंट, कॉपीराइट आणि ट्रेडमार्क, जे लोकांना त्यांनी जे काही शोध लावले किंवा तयार केले त्यापासून मान्यता किंवा आर्थिक लाभ मिळवण्यास सक्षम करते. नवोन्मेषकांचे हित आणि व्यापक सार्वजनिक हित यांच्यातील योग्य संतुलन साधून, सर्जनशीलता आणि नावीन्यपूर्णता वाढू शकेल अशा वातावरणाला प्रोत्साहन देण्याचे आईपी शासनाचे उद्दिष्ट आहे. जागतिक बौद्धिक संपदा संघटना ही जागतिक बौद्धिक संपदा दिन स्थापन करण्यासाठी जबाबदार असलेली संस्था आहे. संस्था बौद्धिक संपदा धोरण, सेवा आणि सहकार्यासाठी जागतिक मंच म्हणून काम करते. डब्ल्यूआईपीओ ही १९३ सदस्य राष्ट्रांसह स्व-वित्तपुरवठा करणारी संयुक्त राष्ट्रांची संस्था आहे. नॅशनल अल्जेरियन इंडस्ट्रियल प्रॉपर्टी इन्स्टिटयूट-आईएनएपीआईच्या महासंचालकांनी जागतिक बौद्धिक संपदा दिवसाची स्थापना सुरू केली. हा दिवस कॉपीराइट, ट्रेडमार्क आणि पेटंटबद्दल जागरूकता निर्माण करतो. हे कायदे आणि नोंदणी आहेत जे निर्माते आणि नवोदितांच्या मूळ कार्याचे संरक्षण करतात. यामध्ये लेखक, कलाकार, शोधक आणि ब्रँड यांचा समावेश असू शकतो जे निर्मात्यांना त्यांच्या कामाचे अधिकार आहेत, याची खात्री करण्यात मदत करतात. बौद्धिक संपदा नियम अधिक विकासास प्रोत्साहन देतात. मूळ कामाची पायरसी रोखण्यासाठी, निर्मात्यांना त्यांच्या आविष्कारांची पूर्ण मालकी असावी, या कल्पनेला चालना देण्यासाठी बौद्धिक संपदा नियम असणे महत्त्वाचे आहे. बौद्धिक मालमत्तेची चोरी युनायटेड स्टेट्समध्ये दरवर्षी सुमारे २२५ अब्ज ते ६०० अब्ज खर्च करते. हे नियम निर्माते आणि देशाचे आर्थिक नुकसान होण्यापासून संरक्षण करण्यात मदत करतात.

!! जागतिक बौद्धिक मालमत्ता दिनाच्या सर्व भावाबहिणींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# चिन्मय मांडलेकरचा निर्णय चुकला का?

**अनेक चित्रपट आणि मालिकांतून छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका दमदारपणे साकारणारा अभिनेता चिन्मय मांडलेकर याने यापुढे छत्रपती शिवरायांची भूमिका न करण्याचा निर्णय घेतला आहे. सामाजिक माध्यमांवर एक ध्वनिचित्रफित प्रसारित करून हा निर्णय घेण्यामागील आपली भूमिका त्याने मांडली आहे. ही ध्वनिचित्रफित पाहणाऱ्यांकडून सामाजिक माध्यमांवर उलटसुलट प्रतिक्रिया येत आहेत. त्याची पत्नी नेहा जोशी-मांडलेकर हिनेही एक ध्वनिचित्रफित सामाजिक माध्यमांवर प्रसारित करून आपल्या मुलाचे नाव जहांगीर का ठेवले आणि त्या नावाचा अर्थ सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्या ध्वनिचित्रफितीवर लोकांनी प्रतिक्रियांच्या माध्यमातून आपले म्हणणे मांडले आहे. चिन्मय मांडलेकरने आपल्या मुलाचे नाव जहांगीर ठेवल्याने त्याला वेळोवेळी ट्रोलिंगचा सामना करावा लागत आहे. अनेक चित्रपट आणि मालिकांतून छत्रपती शिवरायांची भूमिका साकारूनही लोक आपल्या मुलाच्या नावावरून आपल्याला ट्रोल करत असतील तर यापुढे मी शिवरायांची भूमिका करणार नाही, असे त्याने जाहीर केले आहे.**

जहांगीर हा पर्शियन शब्द असून, जहांगीरचा अर्थ जगज्जेता असा होतो, शिवाय त्यांच्या मुलाचा जन्म २१ मार्च म्हणजे जमशेदी नवरोज या दिवशी झाला असल्याने मुलाचे नाव जहांगीर असे ठेवल्याचे चिन्मयच्या पत्नीने सांगितले आहे. भारतरत्न जमशेदजी टाटा यांचे नावही जहांगीर होते असेही तिने यावेळी म्हटले आहे. तिच्या या उत्तरावरून मांडलेकर उभयता हिंदू असताना मुलाचे नाव ठेवण्यासाठी त्यांना एका पार्शियन दिवसाचा आधार का घ्यावासा वाटला, असेही काही ट्रोलर्सचे म्हणणे आहे. २१ मार्च हा जागतिक वन्यदिनसुद्धा आहे. वनामध्ये विविध प्रकारचे प्राणी, पक्षी, झाडे, फुले आणि वेली असतात. त्यापैकी एखादे सुंदर नाव मांडलेकरांना आपल्या मुलासाठी का बरे सुचले नाही, असाही प्रश्न काहींकडून विचारला जात आहे. जहांगीर नावाचा अर्थ विश्वविजेता असा आहे, तर मांडलेकरांनी मुलाचे नाव विश्वजित ठेवायला हवे होते, असा सल्लाही काही मंडळींकडून दिला जात आहे. जहांगीर हे नाव पर्शियन असले, तरी जहांगीर मोगल सम्राट अकबराच्या मुलाचे नाव होते हे साऱ्या भारतविश्वाला माहीत आहे. सत्तेच्या लालसेपोटी भारतात येऊन मोगलांनी या देशाचे सारे वैभव लुटले. एकेकाळी ज्या देशात सोन्याचा धूर निघत असे त्या देशाला मोघलांनी कंगाल बनवले. तलवारीच्या बळावर येथे प्रचंड लूटमार करवली, बाया बापड्यांच्या अब्रूवर घाला घालून त्यांना आपल्या जनानखान्यात डांबले. येथील नागरिकांवर अनन्वित अत्याचार केले, अनेकांची धर्मांतरने घडवून आणली. धर्मांरीत न होणाऱ्या कित्येकांच्या कत्तली केल्या. हिंदूंचे प्रेरणास्रोत असलेली कितीतरी प्राचीन मंदिरे त्यांनी उद्ध्वस्त केली. अशा मोघलांच्या



वंशातील अकबराचा मुलगा सलीम अर्थात जहांगीर हासुद्धा अत्यंत क्रूर होता. स्त्रियांचा आणि मद्यपानाचा तो शौकीन होता. दिवसभर मद्याच्या

कटाक्ष

जगन घाणेकर

नशेत तो झिंगत असे. जहांगीरच्या मुलाने त्याच्याशी बगावत केली म्हणून त्याने मुलाचे डोळे फोडले. नागरिकांना तो अत्यंत क्रूरपणे शिक्षा देत असे. आपल्याविरोधात बगावत करणाऱ्या मुलाला सहाय्य केले म्हणून शिखांचे पाचवे गुरू अर्जन देव यांना अटक करून त्यांना त्याने फासावर लटकवले. अनेकदा छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारणाऱ्या चिन्मयला मोगल बादशहा जहांगीरचा हा सर्व इतिहास तर नक्कीच ठाऊक असावा. असे असताना त्याने आपल्या मुलाचे नाव जहांगीर ठेवण्याचे धाडस केले म्हणजे भविष्यात त्याला ट्रोलिंगचा सामना करावा लागेल हे ज्ञात असावे, असेही काहींचे म्हणणे आहे. भारताचा पौराणिक इतिहास पाहिल्यास रावण, कंस, शिशुपाल, दुर्योधन, दुःशासन यांसारखे कितीतरी महापराक्रमी राजे-महाराजे भारतभूमीत होऊन गेले; मात्र ही समस्त मंडळी अधर्माने वागल्याने यांची नावे कोणीही हिंदू आपल्या मुलांना देत नाहीत. मुंबईतील परकीय आक्रमकांची, अधिकाऱ्यांची नावे ज्या रेल्वे स्थानकांना दिली गेली आहेत ती बदलण्याची प्रक्रिया सध्या शासन करत आहे. असे असताना आक्रमकांच्या वंशावळीतील जुलमी राजाच्या नावाने आपल्या मुलाचे नाव असणे चिन्मयला रुचते का? सैफ अली खान आणि करीना यांनी आपल्या एका मुलाचे नाव तैमूर आणि दुसऱ्याचे जेह म्हणजेच जहांगीर असे ठेवले तेव्हा त्यांनाही देशभरातून ट्रोल करण्यात आले होते. त्यांनीही आपल्या मुलांच्या नावाचा अर्थ सांगण्याचा प्रयत्न त्यावेळी केला होता, तरी आजही त्यांना या नावांवरून ट्रोल केले जात आहे. जनमानसांत प्रसिद्ध असणाऱ्या प्रत्येकाच्या बारीकसारीक हालचालींची, त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांची, त्यांच्या विधानांची आणि निर्णयांची प्रसिद्धी माध्यमांत बातमी होत असते. त्यामुळे या सर्वांतून आपली प्रतिमा समाजापुढे चुकीच्या पद्धतीने जाणार नाही. याबाबतची काळजी या मंडळींनी घेणे आवश्यक आहे. ती न घेतल्यास सध्या सामाजिक माध्यमांचे युग असल्याने ट्रोलिंगचा सामना हा करावाच लागणार आहे. सेलिब्रिटींचे लग्न, त्यांच्या घरात लहानग्यांचे आगमन होण्याची चाहूल लागणे, त्यांच्या मुलांची समाजासमोरील पहिली झलक या सर्व बाबी समाजमाध्यमांवर प्रसारित होतात. बातम्यांमध्ये प्रसिद्ध होतात त्यावेळी त्यांच्यावर चाहत्यांसह संपूर्ण समाजाकडून अभिनंदनाचा वर्षाव केला जातो.

# लोकसंख्या शिक्षण काळाची गरज

जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात भारताने चीनला मागील वर्षीच मागे सारून अव्वल स्थान प्राप्त केले. तज्ज्ञांनी २०२३ साली भारत चीनला मागे सारून सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनेल, असा अंदाज वर्तवला होता. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंट या जागतिक लोकसंख्येचा अभ्यास करणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघाच्या संस्थेने त्याची पुष्टी केली होती. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने आता जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार आज भारताची लोकसंख्या १४४ कोटींच्या घरात पोहचली आहे. मागील वर्षी भारताची लोकसंख्या १,४२८.६ दशलक्ष आहे तर चीनची लोकसंख्या १,४२५.७ दशलक्ष इतकी आहे. म्हणजेच दोन्ही देशांच्या लोकसंख्येमध्ये २.९ दशलक्ष इतका फरक आहे. अवघ्या एका वर्षात भारताची लोकसंख्या २ कोटींनी वाढली आहे. चीनच्या लोकसंख्यावाढीचा वेग घटत आहे तर भारताचा लोकसंख्या वाढीचा वेग वाढत आहे. हाच वेग कायम राहिला तर लवकरच भारताची लोकसंख्या दीडशे कोटी होईल. आज भारताची लोकसंख्या १४४ कोटींच्या पुढे गेली आहे. देश स्वातंत्र्य झाला तेव्हा आपली लोकसंख्या तीस कोटी होती. याचाच अर्थ मागील पंचाहत्तर वर्षांत आपल्या देशातील लोकसंख्या ११४ कोटींनी वाढली. आज आपण लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचलो आहोत. अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्र असे अनेक प्रश्न उद्‌भवू लागले आहेत. विशेष म्हणजे, देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठा अडसर ठरत आहे. लोकसंख्यावाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून, विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही. ही लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासनस्तरावरून पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही. कुटुंब नियोजनाची मोहीम सरकारी पातळीवर प्रभावीपणे राबवली जात आहे. ही दिलासा देणारी बाब असली तरी मुलगा व्हावा या हट्टापायी तीन ते चार अपत्यांना जन्म देणारे महाभागही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम वेग धरत नाही. लोकसंख्या नियंत्रणात

कटाक्ष

श्याम ठाणेदार

९९२२५४६२९५

आणायची असेल तर नव्या पिढीमध्ये लोकसंख्येविषयी योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी नव्या पिढीला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे. अवघ्या २४ वर्षांत जगाची लोकसंख्या पाच अब्जांनी वाढली तर देशाची लोकसंख्या



पंचाहत्तर वर्षांत ११० कोटींनी वाढली. या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही. त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर काय होईल हे नव्या पिढीला समजावून सांगावे लागेल. देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर सर्वांनाच अडचणींचा सामना करावा लागेल. आपण जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहोत. हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आळा घालावाच लागेल हे नवीन पिढीला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम, निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे.

## जनमनाचे प्रतिध्वनी

### कर्मचाऱ्यांची दिरंगाई जनतेच्या मुळावर

नवी मुंबईच्या घणसोली, ऐरोलीच्या काही भागात विद्युत पुरवठा खंडित होत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांना उकाड्याच्या त्रासाला सामोरे जावे लागत असून, यंदा कधी नव्हे ते उष्णतेची लाट पसरली आहे. एवढ्या उष्णतेचे प्रमाण पहिल्यांदाच जाणवत असल्याने वयोवृद्धांसह लहान बालकांना या उन्हाळ्याची तीव्रता सहन होईनाशी झाली आहे. रात्रीच्या वेळी विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने या भागातील जनतेच्या अडचणी वाढल्या आहेत. या सर्व कारणावरून येथील संतप्त नागरिकांनी महावितरण कार्यालयात शिरून तेथील चीजवस्तूंची नासधूस करून कर्मचाऱ्यांना मारझोड केली आहे. ही घटना निश्चितच समर्थनीय नसली तरी कर्मचाऱ्यांच्या उर्मट वर्तनामुळे आणि या भागांतील लोकप्रतिनिधींचा नाकर्तेपणा, कर्मचाऱ्यांवर नसलेला अंकुश, वचक यामुळे अशा दुर्दैवी घटनेला सामोरे जावे लागते. यावरून लोकप्रतिनिधींचे लक्ष नसल्याचे हे उत्तम उदाहरण म्हणावे लागेल. आपण ज्या सार्वजनिक ठिकाणी सेवा बजावतो तेथे जनतेला प्रामाणिक सेवा देणे हे प्रत्येक कर्मचाऱ्याचे आद्य कर्तव्य आहे, पण हे सर्व बाजूला ठेवून कामामध्ये दिरंगाई, ढिसाळपणा यामध्येच धन्यता मानतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर मारझोडीचे प्रसंग उद्‌भवतात. काही ठिकाणी पैसे घेऊन कामे केली जात असल्याचे जनतेतून बोलले जाते. क्षुल्लक कामासाठी चिरमिरी घेतली जाते. खालून वरपर्यंत ही किड लागल्यामुळे याला नेस्तनाबूत करणे फार जिकिरीचे आहे. त्यामुळे शेवटी जनताच हातात कायदा घेते. मग त्याला पर्याय उरत नाही हेच खरे!

**-राजू जाधव**

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे ध्यासपीठ)

संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस

संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस

मुख्य कार्यालय :'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६

विभागीय कार्यालये :

सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.

मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००

दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.

'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.

e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com

RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### रहस्यमय 'प्रीत अधुरी' चित्रपटाचा अल्ट्रा झकासवर वर्ल्ड डिजिटल प्रीमियर!




**मुंबई : प्रतिनिधी** प्रेमकथा, इच्छा पूर्ण करणारी जादुची वस्तू, दमदार कथानकाला असलेली कसदार अभिनयाची जोड, अनोखा विषय आणि त्याची साजेशी मांडणी अशा अनेक गोष्टींचा सुंदर मिलाफ असणाऱ्या 'प्रीत अधुरी' चित्रपटाचा अल्ट्रा झकास या मराठी ओटीटीवर २६ एप्रिल २०२४ रोजी वर्ल्ड डिजिटल प्रीमियर होणार आहे. चित्रपटाचं कथानक एका अशा वस्तूच्या भोवती फिरतं, जी व्यक्तीच्या तीन इच्छा पूर्ण करू शकते! नायकच्या घरी ती वस्तू येते तेव्हा त्याच्यासाठी आकाश ठेंगणं होतं. आता नायक आणि नायिका या वस्तूचा वापर करून नेमकं काय मागतात आणि त्यातून पुढे कशा घडामोडी घडत जातात, हे चित्रपटात कळणार आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन जिल्हा परिषद शाळेत पेशाने शिक्षिका असणाऱ्या प्रियांका यांनी केलं असून प्रवीण यशवंत आणि प्रीया दुबे या नव्या जोडीच्या भन्नाट केमिस्ट्रीसोबत संजय खापरे, मिलिंद दास्ताने, अरुण नलावडे, शमा निनावे आणि कमलेश सावंत या दिग्गज कलाकारांनी चित्रपटात महत्त्वाच्या भूमिका बजावल्या आहेत. गूढ आणि रहस्यमय कथा नेहमीच प्रेक्षकांना खास आकर्षित करतात, म्हणूनच अशा विषयांवर 'प्रीत अधुरी' सारखे खास चित्रपट प्रदर्शित करून रसिकांचं झकास मनोरंजन करण्याचा आमचा कायम सकारात्मक हेतु असतो. अल्ट्रा झकासचे वेगवेगळ्या विषयांवर आधारित चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत असल्याचा आम्हाला खूप आनंद आहे. असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रा.लिमिटेडचे सी.ई.ओ. श्री. सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले.

### योग्य नियोजनातून अनुभवा मातृत्वाचा आनंद : अभिनेत्री सोनाली कुलकर्णी

**नाशिक :** प्रत्येक महिलेसाठी मातृत्वाचे सुख हा आयुष्यातील महत्त्वाचा प्रसंग असतो. आज वैद्यकीय क्षेत्राने प्रगती साधली असून, काही



कारणांनी मातृत्वापासून वंचित महिलांसाठी आशेचा किरण निर्माण केला आहे. मानसिक तयारी करुन व योग्य नियोजनातून मातृत्वाचा आनंद अनुभवा, असा सल्ला अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी दिला. स्प्राऊटिंग सिड्स आयव्हीएफ आणि टेस्ट ट्यूब बेबी सेंटर यांच्यावतीने आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. मातृत्व योजनेत नोंद झालेल्या जोडप्यांपैकी सहा भाग्यवंतांची निवड सोडतीद्वारे मंगळवारी (२३ एप्रिल) झालेल्या कार्यक्रमात करण्यात आली. यावेळी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी संवाद साधला.मातृत्व योजनेत नोंद झालेल्या जोडप्यांपैकी भाग्यवंत जोडप्यांची निवड सोडतीद्वारे केली जाते. त्यानुसार सहा भाग्यवंतांची निवड केली आहे.

### ऑलेक्ट्राला १०००० इलेक्ट्रिक बसेसची ऑर्डर एका वर्षात

**मुंबई :** महाराष्ट्रात एसटी आणि बेस्ट बरोबरच पुण्याच्या पीएमपीएमलला इलेक्ट्रिक बसेस पुरवणाऱ्या ऑलेक्ट्रा ग्रिनटेक लिमिटेड चा वार्षिक आर्थिक निकाल जाहीर झाला आहे. कंपनीला आर्थिक वर्ष २३-२४ मध्ये एकूण ८,२३२ इलेक्ट्रिक वाहनांच्या ऑर्डर मिळाल्या आहेत, ज्यात ३,००० बसेसच्या मागणीचा समावेश आहे. या वर्षाच्या चौथ्या तिमाहीत , कंपनीने देशात १०,००० इलेक्ट्रिक बसेसच्या ऑर्डर मिळवण्याचा टप्पा पार केला आहे. कंपनीने आत्तापर्यंत १,७४६ इलेक्ट्रिक वाहनांचा पुरवठा केला आहे. चौथ्या तिमाहीत १३१ इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश आहे. १०,९६९ एवढ्या एकूण बसची मागणी आता पर्यंत आहे. मार्च ३१,२०२४ रोजी संपलेल्या संपूर्ण वर्षातील कामगिरीची ठळक वैशिष्ट्ये ार्थीक वर्ष २३-२४ चा महसूल रु.११५४.१४ कोटी, ५.८% वाढ. संपूर्ण वर्षात कंपनीचा EBITDA १८५.५१ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे, जो मागील वर्षाच्या तुलनेत २०.५% जोरदार वाढ दर्शवित आहे. पॅट रु.७६.८३ कोटी आहे, मागील आर्थिक वर्षाच्या रु.६५.५९ कोटींच्या तुलनेत १७.१% यात वाढ झाली आहे. ऑलेक्ट्रा ग्रीनटेक लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक के. व्ही. प्रदीप आमची उत्पादन क्षमता आणि तंत्रज्ञान क्षमता वाढवण्यावर आमचे लक्ष केंद्रित आहे. कंपनीने २४ फेब्रुवारी पासून नवीन सीतारामपूर कारखान्यात आंशिक उत्पादन सुरू केले आहे आणि या बसेसची पहिली तुकडी वितरित झाली आहे.

# सोन्याचा भाव गडगडला, चांदीची चकाकी उतरली




**मुंबई :**

मार्च आणि एप्रिल महिन्यात सोन्या-चांदीच्या दराने विक्रमी उच्चांक गाठला होता. मागच्या २ महिन्यांत सोन्याच्या दराने ६ ते ७ हजार रुपयांनी वाढ झाली. अशातच मागील दोन दिवसांपासून सोन्या-चांदीच्या भावात घसरण झालेली पाहायला मिळाली आहे.

जागतिक बाजारातील घडामोड, भू-राजकीय तणाव, चीनमधील मध्यमवर्गाचे वातावरण यामुळे सोन्या-चांदीच्या भावात वाढ झाली आहे. ऐन लग्नसराईच्या काळात सोन्या-चांदीच्या किमती घसरल्याने ग्राहकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. गुढीपाडव्यापूर्वी सोन्या-चांदीच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती. त्यानंतर दरवाढीचे सत्र सुरुच आहे.

एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपासूनच सोन्याच्या दराचा वाढता आलेख पाहायला मिळाला. आज तब्बल १५ दिवसांनी सोन्याच्या दरात घसरण झाली आहे.

# करण व्ही. ग्रोव्हर म्हणजे जणू ह्युमन सर्च इंजिन : अनुज सचदेवा

**मुंबई :**

सोनी सबवरील 'ध्रुव तारा - समय सदी से परे' मालिकेत प्रेम आणि टाइम ट्रॅव्हलची रोचक गोष्ट सांगितली आहे. या कथानकाची पार्श्वभूमी १७व्या आणि २१व्या शतकाची आहे. अलीकडच्या भागांमध्ये प्रेक्षकांनी पाहिले की, तारा (रिया शर्मा) महालातील पाण्याचा वापर थांबवून पाण्याच्या समस्येला तोंड देणाऱ्या गावकऱ्यांच्या मदतीस उतरली आहे. दरम्यान, सूर्यप्रताप (करण व्ही. ग्रोव्हर) ताराचे प्रयत्न हाणून पाडण्याचा प्रयत्न करतो, तर त्याचा भाऊ मान सिंह (अनुज सचदेवा) महालातील पाण्याच्या प्रतिबंधाबाबत चिंतित आहे.

पडद्यावर हे नाट्य रंगले आहे, ज्यात मान सिंह सतत सूर्यप्रतापला त्याच्या सत्तेवरून खाली खेचण्याची संधी शोधत असतो. परंतु, पडद्याच्या मागे मात्र अनुज सचदेवा, करण व्ही. ग्रोव्हर आणि रिया शर्मा यांच्यात मस्त गट्टी जमली आहे. दोन शॉट्सच्या मध्ये ते एकमेकांच्या संगतीत धमाल करत असतात. करण आणि अनुज या दोघांना अभिनयाव्यतिरिक्त राजकारण, अर्थकारण, आध्यात्मिकता आणि फिटनेस या विषयांवर चर्चा करण्यात खूप रस असतो. सिनेमाविषयीची त्यांची समज देखील सामाईक असल्यामुळे त्यांच्यातील नाते आणखी दृढ झाले आहे. शिवाय, त्यांना सेटवर रियाला चिडवायला आणि तिच्या प्रतिक्रिया बघायला खूप आवडते.

मान सिंहची भूमिका करत असलेला अनुज सचदेवा म्हणतो, मी 'ध्रुव तारा'च्या आधीपासून करणला ओळखतो. त्याच्याशी सूर जुळणे काही तितकेसे सोपे नाही. तो अत्यंत रोखठोक आहे, त्यामुळे असे होऊ शकते की, काही लोकांना प्रथम दर्शनी तो आवडणार नाही. आपण मी सेट्सवर त्याच्याशी बोलू लागल्यानंतर मला हे जाणवले की, तो दिसतो, त्यापेक्षा खूप वेगळा आहे. करण म्हणजे जणू ह्युमन सर्च इंजिन आहे. ज्याच्याकडे सगळ्याला उत्तर असते.




## डिश टीव्हीने आणली 'डिश टीव्ही स्मार्ट+' सेवा

### टीव्ही सबस्क्रिप्शनसह ओटीटी सेवांचाही घेता येणार आनंद

**मुंबई :**

डिश टीव्हीने भारतातील मनोरंजन अनुभव पुन्हा परिभाषित करण्यासाठी एक अग्रगण्य पुढाकार घेतला आहे. या उपक्रमात, आघाडीच्या डीटीएच प्रदात्यांसाठी 'डिश टीव्ही स्मार्ट+' सेवांची अभूतपूर्व ऑफर जाहीर केली आहे. याद्वारे ग्राहकांना कोणत्याही स्क्रीनवर, कुठेही, कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय टीव्ही सबस्क्रिप्शनसह ओटीटी सेवांचाही आनंद घेता येणार आहे. यामुळे सुविधा, लवचिकता आणि सुधारित मनोरंजन सुनिश्चित केले जाणार आहे, ज्यामुळे ग्राहकांचा पाहण्याचा अनुभव आणखी वाढेल.

'डिश टीव्ही स्मार्ट+' सेवा कॉन्टेन्ट, उपकरणे आणि ऑफर्ससह सर्वसमावेशक मनोरंजन इकोसिस्टम प्रदान करेल आणि कोणत्याही स्क्रीनवर, कुठेही प्रवेशयोग्यता सुनिश्चित करेल.

'डिश टीव्ही स्मार्ट+' सर्व्हिसेजसह नवीन आणि विद्यमान ग्राहकांसह सर्व डिश टीव्ही आणि डी२एच ग्राहक त्यांच्या निवडलेल्या टीव्ही सबस्क्रिप्शन पॅकसह लोकप्रिय ओटीटी प्सचा आनंद घेऊ शकतात. 'डिश टीवी स्मार्ट+' सेवा इकोसिस्टम कधीही, कुठेही कोणत्याही स्क्रीनवर वॉचो - ओटीटी सुपरप, सेट-टॉप बॉक्सेससह स्मार्ट डिव्हाइसेस आणि स्मार्ट एंड्रॉयड एसटीबीच्या माध्यमातून तुम्ही मनोरंजनाचा आनंद घेऊ शकता. नवीन ऑफरवर टिप्पणी करताना, डिश टीव्ही इंडिया लिमिटेडचे सीईओ, मनोज डोभाल म्हणाले, 'स्थापनेपासून, डिश टीव्हीने मनोरंजनाच्या उपभोगाच्या लँडस्केपमध्ये बदल केला आहे, ज्यामुळे लोकांना त्यांच्या आवडत्या कॉन्टेन्टचा आनंद घेण्यासाठी अनेक नवीन आणि नाविन्यपूर्ण मार्ग देण्यात आले आहेत. या नवीन ऑफरसह, आम्ही मनोरंजन अनुभवांसाठी एक नवीन बेंचमार्क सेट करून क्रांती घडवण्यासाठी सज्ज आहोत. निवडींनी भरलेल्या बाजारपेठेत, ग्राहक अनेकदा भारावून जातात. आमचा उद्देश सर्वांगीण आणि संपूर्ण मनोरंजन उपाय ऑफर करून त्यांची निवड सुलभ करणे आहे. पारंपारिक टेलिव्हिजन आणि ओटीटी प्लॅटफॉर्म हे दोन्ही आजच्या युगात आवश्यक आहेत यावर आमचा ठाम विश्वास आहे आणि आमच्या प्रस्तावासह, त्यांना समान महत्त्व देण्याचे आमचे ध्येय आहे.

मनोज डोभाल पुढे म्हणाले, डिश टीव्हीवर ग्राहकांच्या समाधानाशी तडजोड केली जाऊ शकत नाही आणि प्रत्येक निर्णय मूल्य आणि सुविधा प्रदान करण्यावर केंद्रित असतो. 'डिश टीव्ही स्मार्ट+' सेवा केवळ आमच्या ग्राहकांना मनोरंजनासाठी अतुलनीय प्रवेश प्रदान करून फायदा देत नाहीत तर त्यांची प्राधान्ये आणि समाधान आमच्या प्रयत्नांमध्ये आघाडीवर राहतील याची खात्री देखील करतात. 'डिश टीवी स्मार्ट+' सेवांद्वारे, आम्ही आधुनिक भारतीय कुटुंबाच्या सर्व गरजा पूर्ण करत आहोत, आमच्या ब्रीदवाक्यानुसार जगत आहोत - 'नए भारत का स्मार्ट कनेक्शन'.

# सुरक्षित डिजिटल बँकिंग पद्धतींबाबत जनजागृती

## एचडीएफसीने दोन लाख नागरिकांना केले जागरूक

**नाशिक : प्रतिनिधी**

एचडीएफसी बँकेने डिजिटल बँकिंग जनजागृती मोहिमेचा भाग म्हणून संपूर्ण भारतात सुरक्षित बँकिंग वर्कशॉप्सच्या सिरीजचे आयोजन केले. बँकेने १६,६०० हून अधिक वर्कशॉप्सचे आयोजन करत २,००,२२४ हून अधिक नागरिकांना सुरक्षित डिजिटल बँकिंग पद्धतींबाबत जागरूक केले.

या वर्कशॉप्सचा शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, कायदा अंमलबजावणी संस्था, वरिष्ठ नागरिक, बचत गट, ग्राहक आणि कर्मचाऱ्यांना जागरूक करण्याचा मनसुबा होता. या परस्परसंवादी सत्रांच्या माध्यमातून सहभागींना सुरक्षित डिजिटल बँकिंग पद्धतींबाबत बहुमूल्य माहिती मिळाली, ज्यामुळे ते सायबर फसवणूकांना बळी पडणार नाहीत.

या वर्कशॉप्समध्ये वास्तविक जीवनातील उदाहरणे, कथा व व्हिडिओजचा समावेश होता, ज्या माध्यमातून सहभागींना फसवणूक करणाऱ्यांकडून वापरल्या जाणाऱ्या



विविध मोड्स ऑपरेंडी आणि अशा फसवणुकीपासून सुरक्षित कसे राहायचे यावरील टिप्स समजण्यास मदत झाली. एचडीएफसी बँक गेल्या चार वर्षांपासून देशभरात विविध ठिकाणी सुरक्षित बँकिंग उपक्रमांतर्गत सायबर फ्रॉड अवेअरनेस वर्कशॉप्स आयोजित करत आहे.

आयएफएडब्ल्यूची पार्श्वभूमी: उपस्थितांना डिजिटल जागरूकतेला समर्थन म्हणून इंटरनॅशनल फ्रॉड अवेअरनेस वीकचे मिशन/भूमिकेबाबत सांगण्यात आले. सायबर फ्रॉड अवेअरनेस : सविस्तर चर्चासत्रांमध्ये विशिंग, फिशिंग, स्मिशिंग, रिमोट डिवाईस ॲक्सेस, सिम स्वॅप आणि यूपीआय फ्रॉड्स अशा सायबर धोक्यांबाबत स्पष्टीकरण करण्यात आले. अधिक सविस्तरपणे समजावण्यासाठी वास्तविक जीवनातील उदाहरणांचा वापर करण्यात आला.

सुरक्षित नेट-बँकिंग आणि शॉपिंग टिप्स : या सत्रांनी सुरक्षित ऑनलाइन व्यवहारांसाठी सर्वोत्तम पद्धतींना दाखवले, तसेच व्हिजिल आण्टीचे महत्त्व दाखवले आणि सुरक्षित ऑनलाइन शॉपिंगसाठी बहुमूल्य टिप्स सांगितल्या.

प्रतिबंधात्मक उपाय : उपस्थितांना ओटीपी, सीव्हीव्ही, डेबिट/क्रेडिट कार्ड क्रेडेन्शियल्स आणि यूपीआय पिन अशी संवेदनशील माहिती न देण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

याबाबत मत व्यक्त करत एचडीएफसी बँकेच्या क्रेडिट इंटेलिजन्स अँड कंट्रोलचे कार्यकारी उपाध्यक्ष श्री. मनीष अग्रवाल म्हणाले, सायबरगुन्हा हा व्यक्ती व कंपन्यांसाठी गंभीर धोका आहे. जागरूकतेच्या अभावामुळे व्यक्ती अशा सायबर फसवणूकांना बळी पडतात. म्हणून, नागरिकांमध्ये याबाबत जनजागृती निर्माण करणे आवश्यक आहे, ज्यामुळे ते गोपनीय बँकिंग डेटा शेअर करणार नाहीत किंवा असत्यापित लिंक्सवर क्लिक करणार नाहीत. या वर्कशॉप्सचा सहभागींना फसवणूक करणाऱ्यांकडून वापरल्या जाणाऱ्या विविध मोड्स ऑपरेंडीबाबत, तसेच त्यांनी फॉलो करणे गरजेचे असलेल्या सुरक्षित बँकिंग पद्धतींबाबत जागरूक करण्याचा उद्देश आहे.

बँक ग्राहकांना खबरदारी बाळगण्याचे आणि डिजिटली व्यवहार करताना सुरक्षित बँकिंग सवयींचा अंगिकार करण्याचे, तसेच इतरांसोबत त्यांची गोपनीय बँकिंग माहिती शेअर करणे टाळण्याचे आवाहन करते. ग्राहकांची ऑनलाइन फसवणूक झाली तर त्यांनी त्वरित बँकेला अनधिकृत व्यवहारांबाबत कळवावे आणि भावी नुकसानांपासून संरक्षणासाठी पेमेंट मोड ब्लॉक करावा. ग्राहकांनी मिनिस्ट्री ऑफ होम अफेअर्सने (एमएचए) सुरू केलेला हेल्पलाइन क्रमांक १९३० वर संपर्क साधत तक्रार देखील दाखल करावी आणि नॅशनल सायबरक्राइम रिपोर्टिंग पोर्टल https://cybercrime.gov.in वर तक्रार सबमिट करावी.

**फसवणूक टाळण्यासाठी अशी घ्या काळजी**

एसएमएस/ईमेल/मॅसेजेसमधील अज्ञात लिंक्सवर क्लिक करू नका, कारण तुमचा डेटा व पैसे चोरण्यासाठी ती फिशिंग लिंक असू शकते.

अज्ञात स्रोतांकडून स्क्रिन शेअरिंग ॲप्स डाऊनलोड करू नका, ते डिवाईसेसमधून डेटा चोरी करण्यासाठी आणि मालवेअर इन्स्टॉल करण्यासाठी वापरले जाऊ शकतात. इतरांसोबत ओटीपी, सीव्हीव्ही, पिन, पासवर्ड आणि कार्ड तपशील यांसारखे वैयक्तिक बँक तपशील शेअर करू नका. बँक किंवा तिचे प्रतिनिधी असे वैयक्तिक तपशील विचारत नाहीत.

पेमेंट करण्याची गरज असेल किंवा तुमचे वैयक्तिक बँकिंग क्रेडेन्शियल्स शेअर करण्याची गरज असेल अशा योजना/नोकरी/सूट/हेल्प ऑफर्सना बळी पडू नका.

रिवॉर्ड्स, गुंतवणूक संधी, अर्ध-वेळ नोकरी, टास्क पूर्ण करण्यासाठी कमिशन्स किंवा सहज पैसे आणि रिमोट वर्क अशा ऑफर्स प्रदान करणारे अज्ञात कॉल्स, एसएमएस, ईमेल, सोशल मीडिया अकाऊंट्स आणि जाहिरातींना बळी पडू नका.

# सोनी सबच्या कलाकारांनी सांगितले डान्सचे महत्त्व



**मुंबई :**

वर्ल्ड डान्स डे म्हणजे आंतरराष्ट्रीय नृत्य दिन हा जगभरात दर वर्षी २९ एप्रिल रोजी साजरा केला जातो. एक कलाप्रकार म्हणून डान्समधले वैविध्य आणि सौंदर्य साजरे करून त्याची सांस्कृतिक लक्षणीयता अधोरेखित करणे हा या दिवसाचा उद्देश आहे. या निमित्ताने डान्सर्स, कोरिओग्राफर्स आणि नृत्य रसिकांनी प्राप्त केलेल्या सिद्धीची दखल घेतली जाते आणि नृत्य वारशाचे जतन आणि त्याचा प्रचार केला जातो. या प्रसंगी, सोनी सबवरील कलाकार शुभेच्छा देत आहेत, आठवणी सांगत आहेत आणि आपल्या जीवनावर आणि कारकिर्दीवर डान्सचा किती सखोल प्रभाव आहे हे सांगत आहेत.

**डान्स माझ्या जीवनाचा भाग**

लहानपणापासून डान्स हा माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. माझ्या वडिलांच्या नोकरीमुळे आम्हाला जिथे जिथे राहावे लागले, तेथे मी आधी ही खात्री करून घेत असे की, त्या घरात मला डान्सचा रियाज करण्यासाठी आणि माझ्या म्युझिक सिस्टमसाठी पुरेशी जागा आहे. डान्स मला अपार आनंद देतो, कोणत्याही परिस्थितीत मला शांत ठेवतो आणि आध्यात्मिकतेकडे घेऊन जातो. माझ्या वडिलांच्या सतत होणाऱ्या बदल्यांमुळे माझी जीवनशैली सारखी बदलत असे. पण बॉलीवूडच्या प्रभाव जबरदस्त होता. माझ्या डान्सच्या वेडाला त्यातूनच खत-पाणी मिळाले. प्रत्येकाने नाचले पाहिजे, कारण तो केवळ मनोरंजनाचा एक प्रकार नाही, तर आपल्या भावना अभिव्यक्त करण्याचे ते एक सशक्त माध्यम आहे. डान्सर्सविषयी मला आदर वाटतो आणि कितीही अडचणी असल्या तरी परफॉर्म करण्याची एकही संधी मी सोडत नाही आणि नवीन नवीन शैली शिकत राहते.

**-करुणा पांडे**

**डान्समुळे मिळणारा अपार आनंद**





डान्स ही माझी अत्यंत आवडती गोष्ट आहे. मी अगदी लहान होते तेव्हापासून डान्स हा माझ्यासाठी आनंदाचा ठेवा आहे. मी शाळेतल्या कार्यक्रमांत परफॉर्म करत असे, डान्समध्ये मी अनेक बक्षिसे मिळवली. अशाप्रकारे डान्स हा माझा निरंतर सोबती आहे, ज्याच्यामुळे माझ्या जीवनात एक लय आणि लक्षणीयता आहे. मी कोरिओग्राफीच्या क्षेत्रात जाऊ शकले नाही, पण डान्सचे माझे वेड तसेच राहिले. आज वर्ल्ड डान्स डे च्या दिवशी डान्समुळे मिळणारा अपार आनंद आणि त्यातून जन्मणारी स्वप्नं यापुढे मी नतमस्तक आहे.

**-पल्लवी शर्मा**

**तल्लीन होऊन नाचते**

मला वाटते की, डान्स ही भाव-भावनांची सर्वोत्कृष्ट अभिव्यक्ती असते. मी जेव्हा आनंदी असते, तेव्हा मी पूर्ण जोशात, भान हरपून आणि तल्लीन होऊन नाचते. आणि जेव्हा दुःखाचे ओझे माझ्या मनावर असते, तेव्हा डान्स माझा दिलासा असतो आणि दुःखातून मोकळे होण्यास मला मदत करतो. प्रत्येकाला डान्सच्या माध्यमातून स्वतःमधली ऊर्जा आणि ताकद अनुभवता आली तर काय छान होईल! ही कल्पनाच काय सुंदर आहे! डान्सचे वेड असलेल्या प्रत्येकाला वर्ल्ड डान्स डेच्या शुभेच्छा.

**-नीता शेट्टी**

**नेहमीच थिरकतो**

मी स्वतः प्रशिक्षित डान्सर नसलो, तरीही एक पंजाबी म्हणून भांगडाच्या ठेक्यावर मी आपोआप थिरकतो! लहानाचा मोठा होत असताना भांगडा हा माझ्यासाठी फक्त डान्स नव्हता; तर भांगडा म्हणजे आपला वारसा, त्याच्या प्रत्येक स्टेपमधून ऊर्जेचा संचार होतो. आज देखील, मी जेव्हा ढोलचा ठेका ऐकतो किंवा एखादे ठेकेदार पंजाबी गाणे ऐकतो तेव्हा स्वतःला आवरू शकत नाही. माझे हात आणि पाय आपसूक तो ठेका पकडतात. या डान्स डे ला आणि पुढे भविष्यात देखील तुम्हा सर्वांचे मन डान्सच्या आनंदाने भरून जावो! आणि भांगडाच्या ठेक्यावर आपण सर्व नेहमीच थिरकत राहू!

**माहिर पांधी**





## १९ मे रोजी स्टार प्रवाहवर 'बाईपण भारी देवा'

**मुंबई :**

बाईपण भारी देवा सिनेमाने २०२३ हे वर्ष चांगलंच गाजवलं. फक्त महिला वर्गच नाही तर लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकानेच या सिनेमाला भरभरून प्रेम दिलं. रोहिणी हट्टंगडी, वंदना गुप्ते, सुचित्रा बांदेकर, शिल्पा नवलकर, सुकन्या मोने आणि दीपा परब या मुख्य भूमिका साकारलेल्या सर्व अभिनेत्रींवर कौतुकाचा वर्षाव झाला. मंगळागौर स्पर्धा जिंकण्यासाठी सहा बहिणींची होणारी तारेवरची कसरत आणि ही कसरत करता करता बहिणींमधलं खुलत जाणारं नातं या चित्रपटाची उत्सुकता शेवटपर्यंत ताणून धरतात. बॉक्स ऑफिस गाजवणारा महाराष्ट्राचा हा लाडका चित्रपट महाराष्ट्राच्या नंबर वन वाहिनीवर पहाता येणार आहे. १९ मे रोजी सायंकाळी ७ वाजता स्टार प्रवाहवर 'बाईपण भारी देवा'चा वर्ल्ड टेलिव्हिज प्रीमियर होणार आहे.

तीन वर्षे सातत्याने नंबर वन रहात स्टार प्रवाह वाहिनीने मराठी मनोरंजन वाहिन्यांच्या विश्वात आपलं वर्चस्व सिद्ध केलं आहे. सकस लिखाण, आपलीशी वाटणारी पात्र आणि सोबतीला उत्तम दिग्दर्शन हे स्टार प्रवाहच्या मालिकांचं वेगळेपण. मराठी परंपरा, मराठी प्रवाह हे ब्रीदवाक्य जपत भरभरुन मनोरंजन देण्याचा स्टार प्रवाह वाहिनीने नेहमीच प्रयत्न केला आहे. दर्जेदार मालिकांप्रमाणेच अनेक दर्जेदार चित्रपट पहिल्यांदा स्टार प्रवाह वाहिनीवर पहायला मिळतात. बाईपण भारी देवा चित्रपटाच्या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियरविषयी सांगताना स्टार प्रवाहचे व्यवसाय प्रमुख सतीश राजवाडे म्हणाले, 'सकस मनोरंजन, सर्वांना भावणारा आशय ही स्टार प्रवाहची ताकद आहे. रसिकांना दर्जेदार मालिका आणि चित्रपट देण्याच्या हेतूने बाईपण भारी देवा सारखा सुपरहिट चित्रपट स्टार प्रवाहवर सादर होतोय. आपल्या परंपरेला जोडून मांडलेला हा चित्रपट एक यशस्वी आणि मोठा चित्रपट आहे. हा चित्रपट स्टार प्रवाहवर येतोय याचा आनंद आहे.'

तेव्हा आपल्या संपूर्ण कुटुंबासोबत पाहायला विसरु नका बाईपण भारी देवा चित्रपटाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर रविवार १९ मे रोजी सायंकाळी ७.०० वाजता फक्त स्टार प्रवाहवर.

## आखाडा

### उद्धव ठाकरेंनी अठरा जागा जिंकून दाखवाव्यात बावनकुळे यांचे आव्हान



**मुंबई :** महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीचं वातावरण सध्या खूपच तापले आहे. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये वार-पलटवार सुरूच आहेत. अशातच काल चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांना आव्हान दिले आहे. त्यांनी म्हटले आहे की, उद्धव ठाकरे यांनी २०१९ मध्ये नरेंद्र मोदी यांचे फोटो आणि सभा घेऊन १८ खासदार जिंकले. त्यानंतर आता उद्धव ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीत १८ जागा जिंकून दाखवाव्यात नाही तर ठाकरेंनी राजकीय संन्यास घ्यावा, असे आव्हान चंद्रशेखर बावनकुळे यांनी ठाकरेंना दिले आहे.

### उमराणेत मतदान जनजागृती कार्यक्रम



**उमराणे : प्रतिनिधी**

येथील ग्राम शिक्षण समिती संचलित श्री छत्रपती शिवाजी मराठा हायस्कूल जि. प. प्राथमिक शाळा उमराणे अंगणवाडी आशा सेविका ग्रामपंचायत कर्मचारी गावातील विविध शासकीय कार्यालयातील कर्मचारी विद्यार्थी व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत संपूर्ण गावातून भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. लोकसभा निवडणुकीत मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध घोषवाक्याचे फलक हातात घेऊन मतदारराजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो! माझे मत माझा अधिकार! गावातील आई बाई मतदानासाठी कर घाई! उमराण कर मतदान कर! असे फलक घेऊन गावातील मतदारांचे लक्ष वेधून घेतले तसेच २० मे रोजी होणाऱ्या मतदानाची वेळ काढा व आपली जबाबदारी पार पाडा अशा घोषणा देत मतदानाविषयी जनजागृती केली. याप्रसंगी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक मराठा हायस्कूलचे मुख्या. पी. के. सूर्यवंशी, उपमुख्या. एस. के. पगार, पर्यवेक्षक जि. प. शाळा उमराणे मुख्या. हिरे, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, अंगणवाडी, आशा सेविका, गावातील शासकीय कार्यालयांचे प्रतिनिधी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दानवेंच्या संपत्तीत वाढ

**जालना :** लोकसभा निवडणुकीच्या रिंगणामध्ये उतरलेले जालन्यातील महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे यांच्या संपत्तीबाबत मोठी बातमी समोर आली आहे. सहाव्यांदा लोकसभेची निवडणूक लढवत असलेल्या रावसाहेब दानवे यांच्या संपत्तीत तब्बल ९ कोटींनी वाढ झाली आहे. रावसाहेब दानवे दाम्पत्याकडे एकूण ४२ कोटी ६० लाख ३० हजार रुपयांची संपत्ती असल्याची माहिती शपथपत्रातून समोर आली आहे. तर रावसाहेब दानवे यांच्याविरोधात उभे राहिलेले महाविकास आघाडीचे उमेदवार कल्याण काळे यांच्यासह त्यांच्या पत्नीकडे २७ कोटी १२ लाखांची संपत्ती असल्याची माहिती समोर आली आहे.

## तोल मोल के बोल



जो माणूस घरातल्या मंगळसूत्राची प्रतिष्ठा ठेवू शकत नाही त्यांनी इतरांची उठाठेव करू नये. पंतप्रधान मोदी यांनी मंगळसूत्राबद्दल बोलणे हाच मोठा जोक आहे. मोदींच्या काळात महागाई, गॅसचे भडकलेले दर आणि नोटबंदीमुळे अनेकांना मंगळसूत्र विकावी लागली.

**- संजय राऊत, खासदार**

## शालजोडे

मतपेटीत बंद करून
उमेदवारांचे भवितव्य
मतदार होतो निर्धास्त !
बेचैन उमेदवार मात्र
हुरहूर, उत्कंठा लागून
अस्वस्थतेने होतो चिंताग्रस्त!!

■ विजय भदाणे

# पंकजा मुंडे यांनी बीडकडे लक्ष द्यावे; मंत्री छगन भुजबळ यांचा टोला



**नाशिक : प्रतिनिधी**


बीडमध्ये झालेल्या सभेत पंकजा मुंडे यांनी प्रीतमताईंना नाशिकमधून उमेदवारी देऊन पुनर्वसन करू, असे वक्तव्य केल्यानंतर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना मंत्री छगन भुजबळ यांनी पंकजाताईंनी बीडकडे लक्ष द्यावे, असा टोला लगावला आहे.

नाशिक लोकसभा मतदारसंघातून मंत्री छगन भुजबळ यांना भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने उमेदवारी करावी, असा आग्रह धरला होता. मात्र, तीन आठवडे उलटूनही उमेदवारी जाहीर केली जात नव्हती. उमेदवारी जाहीर होत नसल्याने मंत्री छगन भुजबळ यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन महायुतीत आपल्यामुळे मिठाचा खडा पडायला नको, म्हणून आपण उमेदवारीच्या स्पर्धेतून माघार घेत असल्याची घोषणा त्यांनी केली होती. मात्र, आपण उमेदवारीच्या स्पर्धेतून माघार घेत आहोत पण उमेदवारीवरील राष्ट्रवादीचा हक्क सोडलेला नाही, असे ते म्हणाले होते. नाशिकमध्ये उमेदवारी नेमकी कुणाला मिळणार, याबाबतचा निर्णय अजूनही झालेला नाही.

भुजबळ यांनी माघार घेतली असली तरी समता परिषद भुजबळांनीच उमेदवारी करावी, यासाठी आक्रमक झाली आहे. तर शिंदे गटाकडूनही हेमंत गोडसे हे उमेदवारी मिळावी म्हणून मुंबईच्या वाऱ्या करीत आहेत. कधी अजय बोरस्ते यांच्या नावाची तर कधी माणिकराव कोकाटे यांच्या नावाची चर्चा सुरू आहे.

उमेदवारीचा हा तिढा सुटत नसतानाच पाच वर्षे विजनवासात असलेल्या पंकजा मुंडे यांना भाजपाने बीड लोकसभेची उमेदवारी दिली. तेथील विद्यमान खासदार प्रीतमताई मुंडे यांच्याऐवजी पंकजा यांना उमेदवारी दिल्याने प्रीतम मुंडेंचे काय होणार? असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच शक्तिप्रदर्शन करताना पंकजा यांनी प्रीतमताईंना नाशिकमधून उमेदवारी देऊ, अशी घोषणा केल्याने नाशिकमधील इच्छुकांच्या भुवया ताणल्या गेल्या आहेत. नाशिकमध्येच एवढी सर्व मंडळी उमेदवारीसाठी देव पाण्यात बुडवून बसलेली असताना नाशिक हे सासर असलेल्या प्रीतमताईंना नाशिककर स्वीकारतील का? असा प्रश्न यानिमित्ताने चर्चिला गेला आहे.

यावर छगन भुजबळ यांनीही आपली भूमिका स्पष्ट करताना नाशिकमध्ये आमच्याकडे



अनेक उमेदवार आहेत. त्यामुळे पंकजाताईंनी त्यांच्या बीडकडे लक्ष द्यावे, असा टोला लगावला आहे.




# वाजे, भगरे सोमवारी भरणार उमेदवारी अर्ज

## शालिमार ते जिल्हाधिकारी कार्यालय महारॅली

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक लोकसभा मतदारसंघात उमेदवारी कुणी करावी, याबाबत महायुतीत संघर्ष सुरू असतानाच दुसरीकडे मात्र महाविकास आघाडीच्या नाशिक आणि दिंडोरीच्या उमेदवारांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली असून, सोमवारी दि.२९ एप्रिलच्या शुभ मुहूर्तावर नाशकातून शिवसेना ठाकरे गटाचे राजाभाऊ वाजे तर दिंडोरीतून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे भास्करराव भगरे आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी भव्य रॅलीद्वारे मोठ्या प्रमाणात प्रदर्शनही केले जाणार असल्याचे महाविकास आघाडीच्या सूत्रांतर्फे सांगण्यात आले.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या नियोजनासाठी शिवसेना जिल्हा मध्यवर्ती कार्यालय (शालिमार) येथे नाशिक लोकसभा मतदारसंघातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची बैठक झाली. जोरदार शक्तिप्रदर्शनाद्वारे आपली ताकद दाखवून देण्याचा निर्धार त्यात व्यक्त करण्यात आला. शिवसेना कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालय अशी भव्य रॅली काढण्याचा निर्णयही त्यात व्यक्त करण्यात आला. नाशकात महाविकास आघाडीच्या उमेदवाराची घोषणा होऊन कित्येक दिवस झाले. प्रचाराच्या अनेक फेऱ्याही झाल्या. मात्र, नाशिकसाठी महायुतीचा उमेदवार अजून ठरत नाही हे दुर्दैवच म्हणावे लागेल. प्रत्येक पक्ष हट्टाला पेटला आहे. रोज नवनवीन नावे पुढे येत आहेत. परंतु एकाही नावावर शिक्कामार्तब मात्र होत नाही.

वाजेंच्या उमेदवारीचा विरोधकांनी किती धसका घेतला आहे, याचेच हे मूर्तिमंत उदाहरण म्हणावे लागेल, असा टोला शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांनी लगावला. सहसंपर्कप्रमुख दत्ता गायकवाड, महानगरप्रमुख विलास शिंदे, माजी आमदार वसंत गिते यांनी २९ ला निघणारी रॅली महायुतीच्या उरात धडकी भरवणारी असेल, असा विश्वास व्यक्त करून रॅलीत महाविकास आघाडीच्या सर्व घटक पक्षांच्या अधिकाऱ्याने कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले.

बैठकीस माजी महापौर विनायक पांडे, डी. जी. सूर्यवंशी, उपजिल्हाप्रमुख जगन आगळे, देवानंद बिरारी, महेश बडवे, युवासेना जिल्हाधिकारी राहुल ताजनपुरे, बालम शिरसाठ, विधानसभाप्रमुख बाळासाहेब कोकणे, शैलेश सूर्यवंशी, सुभाष गायधनी, संजय चव्हाण, मुशीर सय्यद, महानगर संघटक राहूल दराडे, विधानसभा संघटक मसूद जिलानी, म.आ. इगतपुरी, देवळाली विधानसभा सपर्कप्रमुख रिटा वाघ, म.आ.पूर्व विधानसभा सपर्कप्रमुख रचना पाटील मा.जि.संघटक मंदा दातीर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी नवनियुक्त पदाधिकारी लोकसभा समन्वयक निवृत्ती जाधव, उपजिल्हाप्रमुख केशव पोरजे, निवृत्ती लांबे, रमेश धांडे, तालुकाप्रमुख राजाभाऊ नाठे, समाधान बोडके, नितीन लाखन, विधानसभाप्रमुख संपत चव्हाण, कचरू डुकरे, विधानसभा समन्वयक देवीदास जाधव, विधानसभा उपप्रमुख सोमनाथ जोशी यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन महानगर संघटक सचिन बांडे यांनी केले.

# दिंडोरी मतदारसंघात कांद्याभोवतीच फिरतोय प्रचार

**नाशिक : प्रतिनिधी**

दिंडोरी लोकसभा मतदारसंघाची निवडणूक अतिशय रंगतदार अवस्थेत आली आहे. दिंडोरी, निफाड, चांदवड, देवळा या तालुक्यांत कांदा उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. केंद्र सरकारने एकीकडे कांद्याची निर्यातबंदी केलेली असतानाच लेव्हीचा प्रश्न, हमाल, मापारी आणि व्यापारी या सर्वांमुळेच कांद्याचे लिलाव बंद आहेत. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी कमालीचा त्रस्त झाल्याचे पाहावयास मिळत आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपा उमेदवार प्रचारासाठी गावोगावी जात असताना शेतकरी कांदा निर्यातबंदीवरून खडे बोल सुनावत असल्याने उमेदवारांनाही शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देताना नाकीनऊ येत आहे.

दिंडोरी लोकसभा मतदारसंघात भाजपाच्या उमेदवार भारती पवार आणि महाविकास आघाडीचे उमेदवार भास्कर भगरे यांच्याबरोबरच अपक्ष हरिश्चंद्र चव्हाण आणि माकपाचे जिवा पांडू गावित हे देखील निवडणूक लढविण्याची शक्यता आहे. अर्थात अजून अर्ज भरणे आणि माघारीला वेळ असल्याने तोपर्यंत बऱ्याच घडामोडी घडणार आहेत. परंतु सध्याच भाजपा उमेदवार भारती पवार यांना कांदा उत्पादकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. गावोगावी प्रचारासाठी गेल्यावर निर्यातबंदी कधी उठविणार? तुम्ही आवाज का उठविला नाही, अशा प्रश्नांची सरबत्ती होत आहे.

कांद्याने यापूर्वी भाजपाचा वांधा केलेला होता. त्यामुळे ग्राहकांना खुश करण्यासाठी केंद्र सरकारने निर्यातबंदी केली असली तरी त्यामुळे शेतकरी वर्ग कमालीचा दुखावला गेला आहे. निफाड, दिंडोरी, चांदवड, येवला या तालुक्यात कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. कांदा उत्पादक शेतकरी निर्यातबंदीच्या मुद्यावरून कमालीचा नाराज आहे. या नाराजीचा फटका बसू नये, याची काळजी भाजपा घेत असले तरी कांदा उत्पादक मात्र केंद्राच्या निर्णयाबद्दल नाराजी व्यक्त करीत आहेत. त्यामुळेच दिंडोरी लोकसभा मतदारसंघामध्ये कांद्याचा प्रश्न चांगलाच गाजत आहे.

दिंडोरी लोकसभा मतदारसंघात सर्वच आमदार महायुतीचे आहेत. त्यामुळे या आमदारांना भारती पवारांसाठी जास्तीत जास्त लिड मिळवून देण्याची जबाबदारी पक्षाने सोपविली असली तरी महाविकास आघाडीची मंडळीही भास्कर भगरे यांच्यासाठी जोर लावत आहेत. महाविकास आघाडीचा दिंडोरी मतदारसंघात एकही आमदार नसला तरी सामान्य शेतकऱ्यांबरोबरच निफाडमधून माजी आमदार अनिल पा. कदम यांनी चांगलाच जोर लावला आहे. येवल्यात दराडे बंधू तर दिंडोरी, चांदवड या भागातूनही शरद पवार यांना माननारा मोठा वर्ग आहे. त्यामुळे आमदार जरी महायुतीचे असले तरी महाविकास आघाडीची ताकदही या मतदारसंघात मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळेच कांद्याभोवती दिंडोरीचे राजकारण फिरत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

# विनोद पाटलांची माघार, पण पाठिंब्याबाबत साशंकता

## महायुतीच्या उमेदवारापुढे अडचणी कायम

**छत्रपती संभाजीनगर :**

संदीपान भुमरे यांना महायुतीची उमेदवारी दिल्यानंतर नाराज झालेल्या विनोद पाटलांची भेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली. महायुतीकडून तिकीट न मिळाल्याने लोकसभा निवडणुकीतून माघार घेत आपण कुणालाही पाठिंबा देणार नसल्याचे विनोद पाटील यांनी जाहीर केले होते. त्यामुळे आता मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर विनोद पाटील हे शिंदेंचे उमेदवार असलेल्या संदीपान भुमरे यांना पाठिंबा देणार का, याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

विनोद पाटील हे छत्रपती संभाजीनगरमधून महायुतीकडून लोकसभा निवडणूक लढवण्यास इच्छुक होते. मात्र, या ठिकाणी महायुतीकडून संदीपान भुमरे यांना उमेदवारी देण्यात आली. त्यानंतर विनोद पाटलांनी निवडणुकीत माघार घेत असल्याचे जाहीर केले. मात्र, आपण कुणालाच पाठिंबा देणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यामुळे याचा फटका महायुतीच्या उमेदवाराला बसण्याची शक्यता वर्तवण्यात येते.

विनोद पाटील हे मराठा आरक्षण याचिकाकर्ते असून, मराठा समाजाला टिकणारे आरक्षण मिळावे यासाठी गेली अनेक वर्षे ते प्रयत्न करीत आहेत. मनोज जरांगे यांनी सुरू केलेल्या आंदोलनानंतर राज्य सरकारने मराठा समाजाला आरक्षण जाहीर केले. पण ते न्यायालयात कितपत टिकेल, असा प्रश्न विचारला जात आहे. मनोज जरांगे यांनी ओबीसीतून मराठ्यांना आरक्षण द्यावं, अशी मागणी केली असताना राज्य सरकारने मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण दिले. त्यामुळे राज्य सरकारने आपली फसगत केल्याचा आरोप मनोज जरांगे यांनी केला आहे.

मनोज जरांगे यांच्या भूमिकेमुळे मराठवाड्यात महायुतीच्या उमेदवारांना फटका बसू नये याची काळजी घेण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणून एकनाथ शिंदे यांच्याकडून मराठा आरक्षण याचिकाकर्ते विनोद पाटलांना उमेदवारी देण्यात येणार असल्याची चर्चा सुरू झाली. पण आता शिंदेंकडून संदीपान भुमरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगरमधून निवडणूक लढवावी लागेल असं मुख्यमंत्र्यांनीच सांगितले होते. मात्र, शहरातील दोन आमदार आणि एका खासदाराने टोकाचा विरोध केला. निवडणुकीला उभा राहिलो असतो तर निवडून आलो असतो, असं वक्तव्य करत विनोद पाटलांनी निवडणुकीतून माघार घेतली होती.

आपली उमेदवारी मागे घेताना विनोद पाटलांनी आपण महायुती वा



महाविकास आघाडी, या दोघांनाही पाठिंबा देणार नाही, अशी भूमिका घेतली. विनोद पाटलांच्या भूमिकेचा फटका हा महायुतीच्या उमेदवाराला बसण्याची शक्यता आहे, अशी चर्चा आहे. त्याचमुळे एकनाथ शिंदे यांनी विनोद पाटलांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केल्याची माहिती आहे.

# सोशल अकाउंटची माहिती देणेही बंधनकारक

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक आणि दिंडोरी लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला आजपासून प्रारंभ होत आहे. उमेदवारी अर्जासोबत सर्व प्रकारची माहिती देतानाच आता उमेदवाराचे सोशल मीडियावरील अकाउंटची माहिती देणेही बंधनकारक करण्यात आले आहे. अनेक उमेदवार अर्ज भरताना पुरेशी माहिती देत नाहीत. त्यामुळे त्यांचा अर्ज बाद होतो. त्यामुळे अर्ज भरताना सर्व माहिती देणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. शपथपत्र देताना शैक्षणिक अर्हता, बँक खाते, कर्ज, मालमत्ता या सर्वांची माहिती देण्याबरोबरच आता उमेदवारांना सोशल मीडियावरील फेसबुक, इस्टाग्राम, एक्स (ट्विटर), स्नॅपचॅट, व्हॉट्सॲप आदी सोशल अकाउंटची माहिती द्यावी लागणार आहे. उमेदवार आता प्रचारासाठी माहिती पत्रकांसोबतच सोशल मीडियाचाही मोठ्या प्रमाणात वापर करतात. त्यामुळे आता निवडणूक आयोगाने सोशल मीडियावरील प्रचारावरही करडी नजर ठेवलेली आहे. उमेदवार प्रचार करताना आता मोठ्या प्रमाणात रिल्स, व्हिडिओचा आधार घेत आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातून केला जाणारा प्रचार अधिक प्रभावी आणि लोकांपर्यंत तत्परतेने पोहोचतो. त्यामुळेच सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रचारावर आता प्रत्येकजण भर देताना दिसून येतो आहे. सोशल मीडियावरील वाढता प्रचाराचा फंडा पाहून सरकारी यंत्रणेनेही सोशल मीडियाच्या अकाउंटची माहिती देणे उमेदवारांना बंधनकारक केले आहे.

# अपेक्षित गर्दी न जमल्याने नाराजीची चर्चा

## महायुतीचा प्रचार शुभारंभ ऐनवेळी रद्द

**दिंडोरी : प्रतिनिधी**

दिंडोरी लोकसभा निवडणुकीत दिवसेंदिवस चुरस वाढत आहे. महायुतीच्या उमेदवार डॉ. भारती पवार यांचा दिंडोरी येथे प्रचार शुभारंभ आयोजित करण्यात आला होता. स्थानिक कार्यकर्त्यांकडून जय्यत तयारीदेखील करण्यात आली. परंतु अचानक प्रचार शुभारंभ रद्द करून नियोजित हॉलमध्ये तात्पुरता मेळावा घेऊन कार्यक्रम आटोपता घेतला. यामुळे तालुक्यात तर्कवितर्क लढविले जात असून, प्रचार शुभारंभासाठी आवश्यक गर्दी न जमल्याने प्रचार शुभारंभ रद्द केल्याची चर्चा दिंडोरीत चालू आहे. दिंडोरी लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार डॉ. भारती पवार यांच्या प्रचाराचे नारळ शुभारंभ काल दुपारी१२ वाजता दिंडोरी शहरातील गढी गणपती मंदिरात करण्याचे आयोजन केले होते.

त्यानंतर जाहीर मेळावा आयोजित करण्यात आला होता. प्रचार शुभारंभाचे बॅनर तसेच संदेश सोशल मीडियावर झळकले. त्याचबरोबर मित्रपक्ष व स्वपक्षाच्या कार्यकर्त्यांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन देखील करण्यात आले होते. परंतु, जेमतेम पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित राहिले. प्रचाराचा शुभारंभ असतानादेखील आवश्यक गर्दी जमत नसल्याने मेळाव्याच्या ठिकाणी उमेदवाराची वाट बघत कार्यकर्त्यांना बसावे लागले. उशिराने उमेदवार मेळाव्याच्या ठिकाणी आल्या व अपेक्षित उपस्थित संख्या नसल्याने प्रचाराचे नारळ शुभारंभ पुढे ढकलण्यात आल्याची सर्वत्र चर्चा आहे.

यावेळी व्यासपीठावर महायुतीच्या उमेदवार डॉ. भारती पवार, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, माजी आमदार धनराज महाले, शिवसेनेचे लोकसभा संपर्कप्रमुख सुनील पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष प्रा. सुनील बच्छाव, ज्येष्ठ नेते सुरेश डोखळे, श्याम बोडके, नरेंद्र जाधव, चंद्रकांत राजे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजेंद्र उफाडे, शिवसेना तालुकाप्रमुख अमोल कदम, भाजप तालुकाध्यक्ष श्याम मुरकुटे, महिला तालुकाध्यक्षा उज्ज्वला उगले यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम आटोपल्यानंतर प्रचार नारळ शुभारंभासाठी अपेक्षित गर्दी न जमल्याने पदाधिकारी व कार्यकर्त्यांवर नाराजी व्यक्त केली असल्याची चर्चा आहे. प्रचार शुभारंभ आयोजित करूनदेखील तो रद्द करण्याची वेळ आल्याने मतदारसंघात तर्कवितर्क लढविले जात आहे. सूत्रसंचालन शहराध्यक्ष नितीन गांगुर्डे यांनी केले तर आभार रणजित देशमुख यांनी मानले.

महायुतीच्या उमेदवार डॉ. भारती पवार यांचा प्रचार नारळ शुभारंभ दिंडोरी येथे आयोजित करण्यात आला होता. यासाठी सर्व मित्रपक्षांना आमंत्रित करण्यात आले होते. परंतु रिपाइंने मात्र या कार्यक्रमास पाठ फिरवली. पाच वर्षांत आमची कधी आठवण आली नाही, आता मतांसाठी आमची आठवण आली का? असा सवाल रिपाइंचे युवा तालुकाध्यक्ष सागर गायकवाड यांनी केला आहे. गेल्या पाच वर्षांत महायुतीच्या उमेदवारांना कधीही रिपाइंच्या कार्यकर्त्यांची आठवण आली नाही. आम्ही कार्यक्रमांना आमंत्रित करूनसुध्दा कधीही त्यांनी हजेरी लावली नाही. रिपाइंच्या कार्यकर्त्यांच्या अडीअडचणी देखील जाणून घेण्याचा प्रयत्न केला नाही. परंतु आता निवडणूक आल्याने व आमच्या मतांची आवश्यकता असल्याने प्रचाराच्या शुभारंभाच्या फलकावर आमचे फोटो टाकून आमच्याबद्दल आत्मीयता असल्याचे दाखवण्यात येत असले तरी त्यामागील सत्य आम्हाला अवगत आहे.